शुभ दीपावली

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार २१ आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+८+४






## सुटीची सूचना

आज दिनांक २१ ऑक्टोबर २०२५ रोजी लक्ष्मीपूजन (दिवाळी) निमित्त जनमाध्यम कार्यालयाला सुटी असल्यामुळे उद्या दिनांक २२ ऑक्टोबर २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.

■ व्यवस्थापक












































जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# बालविवाह : अल्पवयीन मुलगी गर्भवती

## शेंदुरजना घाट हद्दीतील घटना



**अमरावती/प्रतिनिधी:-** शेंदुरजनाघाट पोलीस ठाण्यात बालविवाहानंतर एक अल्पवयीन मुलगी गर्भवती झाल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. १३ वर्षीय मुलीचा विवाह मंदिरात झाल्याचे उघड झाले असून, विवाहानंतर ती पतीसोबत राहू लागली आणि गर्भवती झाली. पोलीसांनी तक्रारीवरून ३२ वर्षीय पतीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, शेंदुरजनाघाट पोलीस प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

प्राथमिक तपासणीसाठी मुलगी जिल्हा रुग्णालयात गेली. तिथे तिच्या अल्पवयीन असल्याची माहिती डॉक्टरांना मिळाली आणि रुग्णालय प्रशासनाने गाडगेनगर पोलीस ठाण्यास तत्काळ कळवले. त्यानंतर हे प्रकरण शेंदुरजना घाट ठाण्यात वर्ग करण्यात आले. याप्रकरणामुळे जिल्ह्यात अजूनही बालविवाहांची प्रथा सुरुच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांना जागरूक राहण्याचे महत्त्व अधोरेखित करते. पालकांनी मुलींना सुरक्षित वातावरण देण्याची गरज आहे, तसेच बालविवाह रोखण्यासाठी तातडीचे उपाय करण्याचे आवाहन केले जाते.

### फेसबुकवर प्रलोभन देऊन लैंगिक अत्याचार

शेंदुरजनाघाट पोलीस ठाण्यातील दुसऱ्या प्रकरणात, २१ वर्षीय महिलेला फेसबुकवर ओळखीच्या २२ वर्षीय व्यक्तीने लग्नाच प्रलोभन देऊन शारीरिक संबंध केले. यानंतर ती गर्भवती झाली. उपचारासाठी रुग्णालयात दाखल झाल्यावर तिने पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# नागपूर ते शिवणगाव मार्गावर अपघात

## दुचाकी स्लीप झाल्याने एसआरपीएफ कर्मचारी जखमी

### -आमदार प्रवीण तायडे ठरले देवदूत

**अचलपूर/प्रतिनिधीः-** नागपूर ते शिवणगाव मार्गावर १९ ऑक्टोबर रोजी रात्री सव्वा बाराच्या दरम्यान दुचाकी वाहन स्लीप झाल्याने एस.आर. पी. एफ मध्ये कार्यरत एक कर्मचारी जखमी झाला होता .यावेळी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे त्या मार्गावर प्रवास करीत असताना या अपघाताची माहिती त्यांना मिळाली .त्यावेळी आ.प्रवीण तायडे यांनी वाहन थांबवून त्या कर्मचाऱ्यांसाठी तत्काळ रुग्णवाहिकेची व्यवस्था केली .तो जखमी व्यक्ती एस.आर. पी. एफ मध्ये कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे.गोंदिया येथून तो कर्मचारी दुचाकी वाहनाने अमरावती येथे जात असताना रात्री दरम्यान शिवणगाव जवळ दुचाकी वाहन स्लीप झाले .यात त्या कर्मचाऱ्याला गंभीर मार लागला.यामुळे मार्गावरच जखमी अवस्थेत तो कर्मचारी बसला होता.

आ.प्रवीण तायडे यांनी तत्काळ त्या घटस्थळी भेट देऊन जखमी व्यक्तीची विचारपूस केली .आणि रुग्णवाहिकेची तत्काळ व्यवस्था केली .यानंतर अमरावती येथे रुग्णालयात उपचारसाठी त्या व्यक्ती खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले .यामुळे तत्काळ उपचाराची सुविधा उपलब्ध झाल्याने त्या कर्मचाऱ्याच्या प्रकृतीत सुधारणा झाली. आ.प्रवीण तायडे त्या व्यक्तीसाठी देवदूत ठरले आहे .यावेळी आ.प्रवीण तायडे आणि धामणगाव रेल्वे चे आ.प्रताप अडसड या दोन्ही आमदारांनी जखमी अवस्थेत असलेल्या व्यक्तीसाठी तातडीने केलेली मदत व उपचाराची सुविधा उपलब्ध झाल्याने सर्वत्र आ.प्रवीण तायडे आणि आ.प्रताप अडसड यांचे कौतुक होत आहे.



# प्रतीक नगरात बिबटने श्वानाच्या पिल्लाला बनविले भक्ष्य

## वनविभागाच्या पथकाकडून शोधमोहीम

**अमरावती/प्रतिनिधी:-** शहरातील प्रतीक नगर परिसरात बिबटाची मुक्तसंचाराची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. आयटीआयच्या मागील भागात बिबटाने एका घराजवळील श्वानाच्या पिल्लाला उचलून नेल्याचे सीसीटीव्हीवर कैद झाले आहे. हा व्हिडिओ पाहून परिसरातील नागरिक सतर्क झाले आहेत.



घटनेनंतर वन विभागाने तपोवन, कॅम्प एरिया, प्रतीक नगर आणि आयटीआय परिसरात बिबट शोध मोहिम हाती घेतली आहे. सुमारे ३० वनकर्मी शोधमोहीमेत गस्त घालत आहेत, तसेच दोन ठिकाणी पिंजरे आणि ट्रॅप कॅमेरे लावून बिबट पकडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. संध्याकाळी नागरिकांनी मुलांना घराबाहेर न पाठवण्याचे ठरवले आहे. विशेषतः कॅम्प परिसर, तपोवन आणि नागरी वस्त्यांमध्ये नागरिक अधिक सावध झाले आहेत. वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप भड यांनी सांगितले, स्थिती नियंत्रणात आहे; बिबट सापडताच पकडण्यासाठी आमचे पथक सज्ज आहे. काही महिन्यांपूर्वीही या परिसरातील बिबट पकडून जंगलात सोडण्यात आला होता. दिवाळीच्या सणाच्या काळात पुन्हा बिबट दिसल्याने नागरिकांची दक्षता वाढली आहे. वन विभागाने नागरिकांना रात्री एकटे फिरू नये, अशी सूचना केली आहे.

# नफा मिळण्याचे आमिष देऊन ४९.२० लाखाने गंडविले

## आरोपींविरुद्ध चांदुरबाजार ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधी:-** चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक गंभीर फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे. राम भट्ट प्लॉट येथील ३३ वर्षीय महिलेला तेलाच्या व्यवसायात चांगला नफा मिळेल असे सांगून आरोपींनी एकूण ४९ लाख २० हजार रुपयांची फसवणूक केली.

तक्रारीनुसार, साजिद इकबाल शेख इमाम टेलर (४२, धर्मालपुरा), जावेद इकबाल (४३), मोहम्मद वाजिद (४३) आणि इतर आरोपींनी एका महिलेसह तिच्या कुटुंबियांना तेलाचा व्यवसाय एकत्र सुरू करण्याचे आमिष दिले. व्यवसायासाठी सुरुवातीला ९४ लाख ३८ हजार २०० रुपये घेण्यात आले, त्यापैकी ४५ लाख १८ हजार रुपये महिला व तिच्या कुटुंबियांना कमिशन म्हणून परत देण्यात आले. मात्र उरलेले ४९ लाख २० हजार रुपये आरोपी परत देण्यास टाळाटाळ करत आहेत. तसेच, महिलेला खोट्या प्रकरणात अडकवण्याची धमकी देखील दिली गेली होती. महिलेकडून तक्रार नोंदवल्यानंतर चांदूर बाजार पोलीसांनी ६ आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. पोलीस प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

# नवसारी रिंग रोडवर कचऱ्याच्या विरोधात चक्का जाम

## स्वच्छ अमरावती सुंदर अमरावती फक्त नावासाठी


**अमरावती** : नवसारी रिंग रोडवर अनेक दिवसांपासून रस्त्याच्या कडेला फेकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे परिसरातील नागरिक संतप्त झाले आहेत. मनपा प्रशासनाकडून समस्ये कडे कायमच दुर्लक्ष केल्याने सोमवारी सकाळी नागरिकांनी रस्त्यात कचरा टाकून सुमारे २ ते ३ तास चक्का जाम केला. नागरिकांची मागणी आहे की, रस्त्याच्या कडील कचरा कायमस्वरूपी दुसऱ्या ठिकाणी हलवावा आणि या समस्येचा स्थायी उपाय करण्यात यावा. चक्का जाम आंदोलनात परिसरातील शेकडो वृद्ध, युवक, महिला व मुलं सहभागी झाली. अखेर मनपा प्रशासनाने कचरा उठवल्यानंतरच नागरिकांनी आंदोलन मागे घेतले.



# दिवाळी सणाच्या पूर्वसंधेला येवदा बस स्टॅन्डवरील दुकानाला भीषण आग


**खल्लार/प्रतिनिधीः-** येवदा येथील बस स्टॅन्ड वरील नरसिंग देवीसिंग रघुवंशी यांच्या कटलरी जनरलच्या दुकानाला सायंकाळी साडेसहाच्या दरम्यान अचानक आग लागली. या भीषण आगीत दुकानातील सर्व साहित्य जळून राख झाले.

सोमवार (दि. २०) सायंकाळी शॉर्ट सर्किट मूळे अचानक दुकानाला आग लागली. पाहता पाहता आगीने रुद्र स्वरूप धारण केले होते. त्या दुकानांमधील कम्प्युटर, लॅपटॉप, फ्रीज, कटलरीचे सामान जळून खाक झाल्याने रघुवंशी यांचे ऐन दिवाळीच्या तोंडावर तीन ते चार लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे . सुदैवाने नरसिंग रघुवंशी यांनी आपला जीव मुठीत घेऊन दुकानाच्या बाहेर पळ काढल्याने त्यांचा जीव वाचला. त्यामुळे कुठलीही जीवितहानी झाली नाही. रघुवंशी हे जेष्ठ नागरिक असून यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालत होता. दिवाळीत त्यांच्या समोर उदरनिर्वाहाचे संकट उभे राहिल्याने नागरिकांत हळहळ व्यक्त केल्या जात आहे.



सदर आग बघण्याकरिता लोकांची गर्दी झाली होती, काहींनी आग विजविण्याचा प्रयत्न केला. परंतु आगिने रौद्ररूप धारण केल्याने ते शक्य झाले नाही. वृत्त लिहिस्तोवर अग्निशामक दलाच्या गाड्या पोहचल्या नव्हत्या.

# हनुमान मंदिरात दिवाळीच्या दिवशी मांजरप्रवेशाने वेधले लक्ष



**नागपूर-/प्रतिनिधी:-** प्रतापनगरमधील शांतिनिकेतन कॉलनी येथील हनुमान मंदिरात अचंबित करणारा प्रकार घडला. दिवाळीच्या मुहूर्तावर सर्वत्र धनवंतरी, लक्ष्मी आणि काली पूजन सुरु असताना अचानक एका भक्त मांजरीने मंदिरात प्रवेश केला.

मंदिरात हनुमानासोबत अन्य देवी-देवतांच्या मूर्तीही आहेत, आणि ही मांजरी देवदर्शनासाठी आलेली असल्याचा अनुमान उपस्थितांमध्ये व्यक्त केला गेला. साधारणपणे, देवतांच्या वाहन-जोडी प्रकारात गणेश-उंदीर, कार्तिकेय-मयूर, देवी-वाघ/सिंह, दत्तात्रय-कुत्रा इत्यादी प्रसिद्ध आहेत. या पार्श्वभूमीवर भक्त मांजरी मंदिरातील वातावरणात स्वतःची उपस्थिती भासवत असल्याचे पाहून उपस्थितांचे लक्ष वेधले गेले. मंदिरातील भक्त आणि स्थानिक नागरिक या अप्रत्याशित घटना पाहून आश्चर्यचकित झाले आणि त्या मांजरीच्या प्रवेशाने मंदिरातील वातावरण आणखी रुचकर झाले.

# मोर्शी व वरुड उपविभागात अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

## ५१ वाहनांवर ९७ लक्ष रुपये दंड

**मोर्शी /प्रतिनिधी:-** मोर्शी व वरुड उपविभागातील अवैध वाळू वाहतुकीवर दि. १ एप्रिल २०२५ ते दि. २० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत कठोर कारवाई करण्यात आली आहे. या काळात ५१ वाहनांवर एकूण रु. ९७,०२,४७७ रुपये इतक्या शास्तीची आकारणी करण्यात आली आहे. त्यापैकी रु. ७६,००,५२९ रुपये वसूल करून शासनखाती जमा करण्यात आले आहे, तर उर्वरित रक्कम उच्च न्यायालयात दाद मागण्याच्या प्रकरणांमुळे प्रलंबित आहे.


वरुड तालुक्याला लागून मध्यप्रदेश राज्याची सीमा असल्याने परराज्यातून वाळूची मोठ्या प्रमाणात वाहतूक येथे होते. नियमानुसार झिरो रॉयल्टी पास न घेता वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्यासाठी उपविभागीय अधिकारी मोर्शीचे प्रदीपकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथके तयार केली आहेत. वरुड तालुक्यातील पुसला येथे तपासणी नाका स्थापन करून वाहनांची तपासणी सतत केली जात आहे. महसूल विभागाच्या या प्रयत्नांमुळे अवैध वाळू वाहतुकीवर अंकुश लावला जात आहे. मोर्शी व वरुड येथील महसूल अधिकारी व कर्मचारी या मोहीमेत सक्रिय आहेत आणि झिरो टॉलरन्स पॉलिसी अवलंबून अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकीवर काटेकोर उपाययोजना राबवत आहेत. ही कारवाई अवैध वाळू वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने राबवली जात आहे आणि उपविभागात नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी ही मोहिम सुरू आहे.



# दिव्यांनी उजळली स्मशानभूमी; अमरावतीच्या वडाळी मोक्षधाममध्ये अनोखा उपक्रम

**अमरावती-** दिवाळीनिमित्त सायंकाळी सर्वत्र लुकलुकत्या दिव्यांचा प्रकाश पडत असताना अमरावती शहरात वडाळी परिसरात असणाऱ्या स्मशानभूमीत रात्री दिव्यांची रांग लुकलुकताना पाहायला मिळत आहे. अनेक पिढ्यांपासून या स्मशानभूमी परिसरातील अनेकांच्या घरातील मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करण्यात आलेत. परिसरातील युवकांनी स्मशानभूमी परिसर स्वच्छ करून सर्व मृत व्यक्तींच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी स्मशानभूमी दिव्यांच्या प्रकाशानं झळाळून टाकली.

पूर्वी नगरपालिका आणि आता महापालिकेच्या हद्दीत वडाळी परिसर असला तरी या परिसराचा उल्लेख गावठाण असाच आहे. चांदूर रेल्वे मार्गावर असणाऱ्या वडाळी गावाच्या स्मशानभूमीची मोठी जागा ही राज्य राखीव पोलीस दलाच्या हद्दीत गेली. जी काही जागा उरली, त्या भागात आज अंत्यसंस्कार विधी होतात. स्मशानभूमीचा ३० टक्के भाग सोडला तर इतर भागात मोठ्या प्रमाणात झुडूप तयार झालीत. पावसाळ्यात दिवसासुद्धा स्मशानभूमीत अंत्ययात्रेसाठी जाणं कठीण झाल्यानं परिसरातील काही युवकांनी चार वर्षांपासून स्मशानभूमीची स्वच्छता मोहीम हाती घेतली. पूर्वी आपली कामं, व्यवसायातून आठवड्यातून एक दिवस वेळ काढत स्मशानभूमी कचरामुक्त करण्याचं काम हाती घेतलं. हळूहळू स्मशानभूमीतील झुडूप काढली. विविध झाडं लावलीत. लोकप्रतिनिधींकडे निवेदन सादर करून आमदार निधीतून स्मशानभूमीत शेड आदी व्यवस्था करून घेतली. आता वेळ मिळेल तेव्हा या युवकांकडून स्मशानभूमीत स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण यासह विविध सुधारणांची काम केली जातात.



स्मशानभूमीच्या मुख्य प्रवेशद्वारासह ज्या भागात अंत्यविधी होतो यासह लोकांना ठाण्याकरिता बांधण्यात आलेले जुने आणि नवीन या प्रतीक्षालयात दिवे लावण्यात आलेत. विशेष म्हणजे दिवे लागल्यावर शांत आलेल्या या परिसरात आनंदानी वातावरण निर्माण झालं. तीन चार वर्षांपासून स्मशानभूमी स्वच्छ सुंदर व्हावी यासाठी सुरू असणाऱ्या प्रयत्नांना परिसरातील नागरिक आणि लोकप्रतिनिधी आणि महापालिका प्रशासनाचा हातभार लागावा अशीच अपेक्षा या तरुणांच्यावतीनं व्यक्त केली जातेय.

विविध वृक्षांची लागवड : स्मशानभूमीच्या प्रवेशद्वातपासून आतमध्ये जाणारा रस्ता सर्वात आधी स्वच्छ आणि चांगला भरण्यात आला. गत दोन-तीन वर्षांत वड, पिंपळ, पेरू, जांभूळ, चिकू यांसह विविध फळ आणि फुलांची झाडं लावण्यात आली. येत्या काळात या स्मशानभूमीत सुंदर उद्यान साकारण्याचा आमचा प्रयत्न आहे. स्मशानभूमीत अनेकजण मृतदेहाला माती देतात आणि त्यांच्या स्मरणात थडगे उभारतात. स्मशानभूमीत जागा कमी आहे. आपल्या भावना कळू शकतात मात्र भविष्याचा विचार करून स्मशानभूमीत थडगे वगैरे कुणी बंधू नये, असं आवाहन या युवकांच्या वतीनं करण्यात येतंय.

# उत्तर आशियाचा दुर्मिळ पाहुणा तपकिरी खाटिक पहिल्यांदाच वर्धेत

**वर्धा /प्रतिनिधी:-** सेवाग्राम येथे १८ रोजी सकाळी मोकळ्या झुडुपाळलेल्या प्रदेशात पक्षी प्रजातींच्या रंजक जगात तपकिरी खाटिक या नव्या निरीक्षणाची भर पडली. तपकिरी खाटिक यालाच इंग्रजीमधे ब्राउन श्राईक तर याचे शास्त्रीय नाव लॅनियस क्रिस्टॅटस असे आहे. हा पक्षी वर्धा जिल्ह्यात पहिल्यांदाच आढळला. पक्षी निराक्षणाकरिता गेलेल्या प्रतिक पाल व राहुल वकारे यांनी पक्ष्याचे छायाचित्र आणि त्याचा कॉल रेकॉर्ड करून नोंद घेतली.

उत्तर आशियाचा दुर्मिळ पाहुणा तसेच मध्यम आकाराचा खाटिक पक्षी, तपकिरी खटिक हा हिवाळी स्थलांतर करणारा पक्षी असून त्याचा प्रवास सायबेरिया, मंगोलिया, चीन आणि जपानहून भारताकडे होतो. साधारण १७ ते २० सेंटीमीटर लांब असलेला या सुंदर पक्ष्याची तपकिरी पाठ व डोके, धवल रंगाची खालची बाजू आणि काळ्या डोळाच्या पट्टीमुळे हा सहज ओळखता येतो.

हा मध्यम पण धाडसी शिकारी पक्षी 'खाटिक' सदृष्य वर्तनासाठी प्रसिद्ध आहे. तो आपल्या शिकार केलेल्या अळ्या, लहान बेडके किंवा सरडे यांना झाड्याच्या काटे किंवा तारांवर बोचून ठेवतो आणि नंतर खातो. ही अनोखी पद्धत त्याला इतर पक्ष्यांपेक्षा वेगळे ठरवते आणि त्याच्या हुशारीचा सुद्धा परिचय देते.



या दुर्लभ नोंदीचा पक्ष्याच्या फोटोंसह जागतिक पक्ष्यांचा महितीसाठा असणाऱ्या ई-बर्ड च्या संकेतस्थळावर नोंद केली गेली असून वर्धा जिल्ह्यातील हि पहिली अधिकृत नोंद म्हणून नोंदवली गेली आहे. या नोंदीमुळे स्थलांतर दरम्यान वर्धा जिल्ह्यातील अनुकूल पर्यावरणीय परिस्थितीची प्रचीती येते.



# जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २१ ऑक्टोंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# दिवाळीच्या धामधुमीत 'खास ' चर्चेने कारंजा रंगले

**■ प्रशांत ठाकरे ■**

**कारंजा लाड : शहरातील राजकीय व सामाजिक वर्तुळात सध्या एकच गोष्ट चर्चेचा विषय बनली आहे – ' ते दोघे कोण? ' सोशल मीडियावरून सुरुवात झालेल्या या चर्चेने आता संपूर्ण शहरात गॉसिपचा धुमाकूळ घातला आहे. राजकीय पार्श्वभूमी असलेले दोन नेते, तेही दोन भिन्न पक्षांचे, एका रासलीलेत अडकले असल्याची जोरदार चर्चा सध्या रंगली आहे.**



शहरातील आणि परिसरातील राजकारण नेहमीच चर्चेचा भाग असतो, पण या वेळी प्रकरण थोडं वेगळं आहे. सोशल मीडियावर गुप्त संदेश आणि इशारे यामधून या कथित 'रासलीले'चा तपशील पुढे येऊ लागला. यातूनच हे स्पष्ट झालं की, या प्रकरणात दोन वजनदार पदावरील नेत्यांचा सहभाग आहे, आणि त्यांचा सामाजिक व राजकीय वजनदार वावर असल्यामुळे ही बाब अधिकच गाजू लागली आहे.

'ते दोघे कोण..?' याबाबत सोशल मीडियावर इशारो इशारो मे ही धुळवड उडालेली आहे. व्हाट्सअँप वर फेसबुक वर 'ब्रेकिंग न्युज ' च्या नावाने सर्वप्रथम हि बातमी प्रसिद्ध झाली. अनेकांनी या प्रकरणावर मेम्स तयार केले आहेत, प्रतिक्रिया व्यक्त केल्यात. काही जणांनी थेट नावं न घेता इशाऱ्याने व्यक्त होणं सुरू केलं आहे. या बातमीने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे, ही बातमी खरी की खोटी याची पुष्टी अद्याप सुद्धा झाली नाही. या बातमीच्या चर्चेमुळे संबंधित दोन्ही पक्षांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. काही स्थानिक पदाधिकाऱ्यांनी या चर्चेला खोटं आणि बदनामीकारक ठरवून प्रतिक्रिया दिली आहे. तर दुसरीकडे, काहींच्या हालचालींवरून ही चर्चा पूर्णपणे निराधार आहे असं म्हणणं धोकादायक ठरू शकतं, असं वाटू लागतंय. सत्य बाहेर येणार...? सध्या ही गोष्ट केवळ चर्चेपुरती आहे, मात्र लवकरच ' साक्षी पुराव्यानिशी ' माहिती बाहेर आणण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे पुढील काही दिवसात या प्रकरणाला नवं वळण मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार कथित रासलिलेच्या प्रकरणांमध्ये आर्थिक उलाढाल होऊन प्रकरण रफादफा झाल्याची माहिती प्राप्त आहे.

कारंजा (लाड) शहर सध्या एका अनोख्या चर्चेच्या भोवऱ्यात सापडलं आहे. या चर्चेच्या केंद्रस्थानी असलेले ते दोघे नेमके कोण? , त्यांचं नातं खरंच 'रासलीला' आहे की केवळ राजकीय द्वेषातून पेरलेलं एक अफवांचं बीज? हे पुढील काही दिवसात स्पष्ट होईल. तोपर्यंत नागरिक, कार्यकर्ते आणि विरोधक यांचं लक्ष एकाच गोष्टीकडे लागलेलं आहे –' ते दोघे कोण? '

वरील बातमीमध्ये उल्लेखलेली माहिती सोशल मीडियावर चालू चर्चांवर आधारित असून, यामागे कोणतीही अधिकृत पुष्टी नाही. सत्यता तपासणं आवश्यक आहे. सत्य परेशान हो सकता है पराजित नही, बघू या..

# लाईनमनकडून शेतकऱ्याच्या शेतातील वडिलोपार्जित लिंबाचे झाड तोडल्याने संताप !

**■ प्रतिनिधी | रिसोड ■**

तालुक्यातील दापूरी खुर्द येथील शेतकरी संतोष वामन भालेराव यांनी आपल्या शेतातील २०वर्षे जुने वडिलोपार्जित लिंबाचे झाड विद्युत वितरण कंपनीच्या लाईन मध्ये मशीनच्या सहाय्याने कापून टाकण्याची तक्रार जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे . ही घटना दिनांक २१सप्टेंबर २०२५ रोजी घडली असून, शेतकऱ्यांने प्रशासनाकडे न्याय मागणी केली आहे.

**घटनेचा सविस्तर तपशील :** संतोष भालेराव हे दापुरी खुर्द गावचे रहिवाशी असून, त्याचे वडील वामन सूर्यभान भालेराव (वय ८० वर्ष) यांच्या नावावर गट क्रमांक ९१ व ९२अशी शेती आहे.

गट क्रमांक ९१ मधील शेतात विद्युत तारे जवळ असलेले मोठे लिंबाचे झाड सुमारे २० वर्षापासून उभे होते. मात्र दिनांक २१सप्टेंबर २०२५ रोजी चंद्रशेखर नावाच्या लाईनमनने, कोणतीही पूर्व सूचना न देता, मशीनच्या सहाय्याने झाड पूर्णपणे तोडून टाकले.

झाड तोडताना शेतात सोयाबीनचे पीक असतानाही, कोणतीही काळजी न घेता झाड येतात पाडण्यात आले. यामुळे पिकाचे नुकसान झाले असून,



## विद्युत वितरण कंपनीच्या लाईनमना विरुद्ध शेतकऱ्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

शेतकऱ्याच्या भावनांनाही धक्का बसला आहे.

**शेतकऱ्याची मागणी :** अर्जदार संतोष भालेराव यांनी जिल्हाधिकारी वाशिम यांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की-

'हे झाड आमच्या कुटुंबाचे वडिलोपार्जित होते. विद्युत वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी कोणतीही पूर्व सूचना न देता झाड कापून आमचे आर्थिक आणि मानसिक नुकसान केले आहे. त्यामुळे चौकशी करून दोषी लाईनमन वर कारवाई करण्यात यावी आणि नुकसान भरपाई मिळावी.'

**स्थानिक ग्रामस्थांचा रोष :** या घटनेनंतर दापुरी खुर्द परिसरात संतापाचे वातावरण असून, ग्रामस्थांनी म्हटले आहे की-'विद्युत विभागाचे कर्मचारी शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय झाडे कापतात, पिकांची हानी करतात. अशा बेफिकीर कामकाजाला आळा बसावा'.

स्थानिकांनी मागणी केली आहे की प्रशासनाने त्वरित चौकशी करून संबंधित लाईन मनवर शिस्त भंग कारवाई करावी.

**प्रशासनाकडून चौकशीची मागणी :** शेतकऱ्याची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाल्यानंतर प्रशासन मात्र मूक आहे. महसूल विभाग आणि विद्युत वितरण कंपनीकडून संयुक्त पंचनामा करून प्रकरणाची सखोल चौकशीची करण्यात आली आहे.

**पर्यावरणीय हानीचा मुद्दा :** तज्ञांच्या मते, अशाप्रकारे परवानगी शिवाय झाडे तोडल्यास पर्यावरणीय नुकसान होते. २० वर्ष जुने लिंबाचे झाड स्थानिक जैवविविधतेसाठी महत्त्वाचे होते, त्यामुळे प्रशासनाने भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी ठोस पाऊले उचलावित, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# दोन गांजा विक्रेते पोलिसांच्या जाळ्यात ; १२ किलो गांजा जप्त



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

गांज्या विक्रीसाठी नेणाऱ्या दोन इसमांवर पोलिसांनी कारवाई करुन त्यांच्याकडून १२ किलो गांजा अंदाजे किंमत १.२० लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई १९ ऑटोबर रोजी करण्यात आली.

याबाबत सविस्तर असे की, पोलिस प्रशासनाला गुप्त माहिती मिळाली की, दोन इसम कारंजा येथून मंगरुळनाथकडे गांजा घेऊन येत आहेत. त्यावरुन स्थागुशा पोलिस निरीक्षक प्रदीप परदेशी यांनी त्वरीत दोन पथक तयार करुन कारंजाकडे रवाना केले. त्यातील एक पथक मंगरुळनाथ रोडवरील वाडा फाटा येथे तैनात करुन एक पथक कारंजा - मंगरुळनाथ रोडवर पेट्रोलिंग करीत होते. या दरम्यान रात्री १.३० वाजता च्या दरम्यान दोन इसम होन्डा शाईन मोटार सायकलवर मंगरुळनाथकडे जातांना दिसले. त्यांचे जवळ असलेल्या बॅग मध्ये काही तरी संशयित इसमाबाबत माहीती देवून त्याचा पाठलाग करीत मंगरुळनाथकडे येत असता यातील संशयीत इसमांना समोर पोलिस असल्याचे दिसताच ते पळून जाण्याच्या तयारीत असतांनाच पोलिसांप प्रसंगावधान राखून त्यांना पकडले व त्यांच्याकडील बॅगची तपासणी केली असता त्यामध्ये गांजा दिसून आला. अधिक चौकशी केली असता त्यांचे नाव ज्ञानेश्वर दयाराम मुखमले रा. गोगरी ता. मंगरुळनाथ व कृष्ण उर्फ कुणाल गजानन पुसाडे रा. शेलुबाजार ता. मंगरुळनाथ जि. वाशीम असे सांगीतले. त्यावरुन पोलिसांनी मंगरुळनाथ पोस्टे येथे विविध कलमान्वये गुन्हे दाखल केला.

सदर कारवाई जिपोअ अनुज तारे यांचे अध्यक्षतेखाली अपर पोलिस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल क्षीरसागर, पोलिस निरीक्षक प्रदीप परदेशी, सपोनि योगेश धोत्रे, पोउपनि शेखर मास्कर, पोहवा गजानन अवगहे, पोहवा आशिष बिडवे, राहुल व्यवहारे, पोअम भुषण ठाकरे, राजकुमार यादव, शुभम चौधरी, अविनाश वाढे, गोपाल चौधरी, चालक सुनील तायडे व संदिप डाखोरे यांनी परिरम घेतले.

# तीन महिन्यांनंतर हरवलेला जयपाल सापडला

## कुटुंबीयांच्या डोळ्यात आनंदाश्रू

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

'आमचा मुलगा गेलाष्ठ' या विश्वासाने तुटलेल्या बिहारमधील एका कुटुंबासाठी वाशिम जिल्ह्यातून आशेचा किरण उजाडला. तीन महिन्यांपासून बेपत्ता असलेला जयपाल अखेर सापडला असून, तो मानोरा वनपरीक्षेत्रात भटकताना आढळल्याने कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद फुलला.

मानोरा वनपरीक्षेत्रातील कर्मचारी नियमित गस्तीदरम्यान जंगल परिसरात एका तरुणाला भटकताना पाहिले. संशय आल्याने त्यांनी संवाद साधला असता, त्याने आपले नाव जयपाल असल्याचे सांगितले. पुढील चौकशीत त्याची मानसिक स्थिती अस्थिर असल्याचे दिसून आले. त्यामुळे वनकर्मचाऱ्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्याला कारंजा शहर पोलिस स्टेशनमध्ये आणले.

कर्तव्यावर हजर असलेले पोलिस शिपाई विजय गंगावणे यांनी संयमाने जयपालशी संवाद साधत त्याच्या मूळ गावीची माहिती मिळवली. थोड्याशा माहितीच्या आधारावर गुगल मॅपच्या मदतीने शोध घेतला असता बिहारमधील बत्तीसअमरा जिल्ह्यातील बजरंग चौक येथील त्याचे गाव सापडले. स्थानिक पान दुकानाच्या संपर्क क्रमांकावरून पोलिसांनी जयपालच्या कुटुंबाशी संपर्क साधला.

व्हिडिओ कॉलद्वारे जयपालला जिवंत पाहताच, तीन महिन्यांपासून मृत समजलेल्या मुलाला पाहून कुटुंबातील सदस्यांचा आनंद अनावर झाला. आई-वडिलांसह संपूर्ण कुटुंब ढसाढसा रडू लागले. उपस्थित पोलिस व नागरिकांच्याही डोळ्यातून अश्रू तरळले.या घटनेत पोलिस निरीक्षक शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी विजय गंगावणे व नागरिक सलमान मेमन यांनी मोठी मदत केली. त्यांनी आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करून जयपालला सुरक्षितपणे बिहारला रवाना केले. मानोरा वनपरीक्षेत्राच्या दक्षतेमुळे आणि पोलिसांच्या प्रयत्नांमुळे हरवलेल्या जयपालचा घरी परतण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## बुधवारी 'दीपोत्सव' बहारदार गीत-संगीताचा सांस्कृतिक कार्यक्रम

**वाशिम :** सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने रसिकांची दिवाळी स्वर संगीताने उजळण्यासाठी शास्त्रीय संगीत, मराठी गीत संगीत व अभंगवाणी 'दीपोत्सव' बहारदार गीत-संगीताच्या सांस्कृतिक व विनामुल्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम विठ्ठलवाडी सभागृहात बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६:४० वाजता ठेवण्यात आला आहे. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड आशिष शेलार यांची संकल्पना व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी (भाप्रसे) यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# अकोटच्या वनपालाची आरामशीन धारकांविरोधात पोलिसांत तक्रार

## अवैध लाकूड जप्तीवेळी दिल्या जीवघेण्या धमक्या

**■ प्रतिनिधी | अकोट ■**

शहरातील हिवरखेड रोडवरील रेल्वे गेटजवळील जोगबन परिसरात कार्यरत असलेल्या आर. के. सॉमिल येथे अवैधरित्या ठेवलेल्या आडजात लाकडांची जप्ती करण्यासाठी गेलेल्या अकोट वन विभागाचे वनपाल सुनील राऊत यांना सॉमिल धारकांनी धमक्या दिल्याने त्यांनी अकोट शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

या प्रकरणाची सविस्तर हकिकत अशी की, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय प्रा. अकोला यांच्या आदेशानुसार दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी अकोट येथील आर. के. सॉमिल (परवाना क्रमांक MH4522AMAK) या ठिकाणी वन विभागाचे पथक तपासणीसाठी गेले होते. या सॉमिलमध्ये निम प्रजातीच्या लाकडाचे अवैध चिराण आढळल्याने संबंधित सॉमिल सिल करण्याची कार्यवाही करण्यात येत होती.

त्या वेळी सॉमिलचे धारक रिजवान खान वहीद खान, वहीद खान सईद खान व जावेद खान सईद खान हे ठिकाणी उपस्थित होते. कार्यवाहीदरम्यान त्यांनी वनपाल सुनील राऊत यांना 'अभी तू वर्दी पे है, वर्दी निकाल के आ फिर तेरोको दिखाते है' अशा शब्दांत जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. तसेच वनरक्षक आतिफ हुसेन यांनाही धमकावण्यात आले.

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, वरील आरोपी अवैध वृक्षतोड प्रकरणांमध्ये सराईत असून त्यांचे काही गुन्हेगारांशी संबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेमुळे वन विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वीही या सॉमिल धारकांविरोधात अवैध व्यवसायासंदर्भात पत्रकार सैय्यद नुरा यांनी माहिती अधिकाराखाली अर्ज दाखल केल्याने त्यांच्यावर हल्ला झाल्याची नोंद असून, त्या प्रकरणाचा न्यायालयीन तपास सुरू आहे.

सदर तक्रारीच्या प्रती उपवनसंरक्षक अकोला, उपविभागीय पोलिस अधिकारी अकोट, सहाय्यक वनसंरक्षक (वने) अकोला व वनपरिक्षेत्र अधिकारी प्रा. अकोला यांना पाठविण्यात आल्या आहेत.आता या तक्रारीच्या आधारे अकोट शहर पोलिस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल होतो की नाही, याकडे नागरिक व पर्यावरणप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# तहसिल कार्यालयावर परिवर्तन शेतकरी संघटनेचे आंदोलन!

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

।यावर्षी सततचा पाऊस व ढगफुटी अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ आणि पिकांचे प्रचंड नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्याच्या हातात काहीच राहिले नाही अन त्यात शासनाने जाहीर केलेल्या मदतीच्या घोषणेमुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जात असल्याने आज दि. २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी लक्ष्मी पूजनाच्या दिवशी रात्री तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांना सोबत घेऊन दिवे लावून दिवाळी करून आंदोलन करणार, असे निवेदन परिवर्तन शेतकरी संघटनेचे अध्यक्ष मनोहर राठोड यांनी तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना दिले आहे.

यावर्षी ऑगस्ट महिन्याच्या अतिवृष्टीच्या पावसामुळे शेती खरडून तर गेलीच पण शेतातील उभे पीक पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांच्या आयुष्यात अंधार पसरले आहे . दिवाळी हा सण लक्ष्मी रुपाने अंधाराला नष्ट सर्वांच्या आयुष्यात प्रकाश (उजेड) आणतो, परंतु यावर्षी शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेला पॉकेज दिवाळीच्या पुर्व संधेपर्यंत एक पैसाही खात्यात न पडल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात ठेवणाऱ्या शासनाच्या तिजोरीत भरभराटी मिळावी म्हणून परिवर्तन शेतकरी संघटनेच्या वतीने आज लक्ष्मी पूजनाच्या दिवशी तहसील कार्यालय समोर दिवे लावून दिवाळी साजरी करण्याचा इशारा परिवर्तन शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत चमक; सुजाता भालेरावचे त्रिकूट सुवर्ण

**■ प्रतिनिधी | रिसोड ■**

केशवनगर येथील बाबासाहेब धाबेकर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. ही स्पर्धा १७ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडली असून, विद्यार्थिनींनी फेक प्रकारात वर्चस्व गाजवले. १७ वर्षे वयोगटात सुजाता मनोहर भालेराव हिने जबरदस्त कामगिरी करत गोळाफेक, थाळीफेक आणि भालाफेक या तिन्ही स्पर्धांमध्ये सुवर्णपदके पटकावली. तिच्या या कामगिरीमुळे तिला 'त्रिकूट सुवर्ण विजेतेपद' प्राप्त झाले. नंदिनी बंडू भालेराव हिने थाळीफेक स्पर्धेत रौप्यपदक मिळवून कौशल्य सिद्ध केले.

१९ वर्षे वयोगटात रोशनी लोखंडे हिने थाळीफेक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत शाळेच्या गौरवात भर घातली. त्याचबरोबर मानसी पंडीत भालेराव हिने गोळाफेक स्पर्धेत रौप्यपदक मिळवले. नियती कांबळे हिने थाळीफेक व भालाफेक या दोन्ही स्पर्धांमध्ये रौप्यपदकांची कमाई केली. या विद्यार्थिनींनी यशाचे श्रेय मुख्याध्यापक सांगळे, शिक्षक राजू पगार आणि पांडुरंग खंदारे यांच्या मार्गदर्शनाला दिले.

# दिवाळीच्या विविध उपक्रमांनी वेदांत पब्लिक स्कूल, पोहा परिसर उजळला



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

ज्ञान, संस्कार आणि सर्जनशीलतेचा संगम असलेल्या वेदांत पब्लिक स्कूल, पोहा येथे दिवाळीचा सण अतिशय उत्साहात, आनंदमय आणि सांस्कृतिक वातावरणात १८ ऑक्टोंबर शनिवार रोजी साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेमध्ये शैक्षणिक आणि कलात्मक उपक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली.

विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि कलेचा सुंदर संगम साधत 'सुवर्ण दुर्ग किल्ला' साकारला. या किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो 'अमृत दुर्गोत्सव चला दुर्ग बनवुया २०२५' या शासनाच्या उपक्रमांतर्गत साकारण्यात आला होता. शाळेने शासनाच्या लिंकवर किल्ल्याचा सेल्फी पाठविल्यानंतर मुख्यमंत्र्यांची स्वाक्षरी असलेले अभिनंदन प्रमाणपत्र प्राप्त झाले असून शाळेच्या या सृजनशील प्रयत्नाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. याशिवाय विद्यार्थ्यांनी तयार केलेले आकर्षक पोस्टर्स, दिवे, आकाशकंदील आणि शुभेच्छापत्रांनी संपूर्ण परिसर दिवाळीच्या सणाने उजळून गेला. रंगीत फुलोऱ्यांनी सजवलेले वर्ग आणि कलाकृतींनी शाळा सणासुदीच्या रंगात न्हालेली दिसून आली. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना भारतीय परंपरा, संस्कृती आणि सणांचे महत्त्व समजून घेण्याची संधी मिळाली.

# 'दिवाळी पहाट' कार्यक्रमात संगीताची रंगतदार मैफील

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

मंत्री चॅरिटेबल ट्रस्ट वाशिम आणि स्वरकुंज संगीत महाविद्यालय वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळीच्या शुभप्रसंगी 'दिवाळी पहाट ' (एक सुरेल सकाळ) या संगीत मैफलीचे नियोजनबद्ध आयोजन वाशीम येथील महेश भवन येथे करण्यात आले.

यावेळी मंचावर उपस्थित कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मंत्री चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष घनश्यामजी गोविंदराम जी मंत्री , तसेच स्वरकुंज च्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई काकडे, तसेच गायक कलाकार श्री धनंजय जोशी, सौ. राधिका मंत्री हे होते . सुरुवातीला दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरू सुरुवात करण्यात आली. त्यानंतर लगेचच मुख्य गायनाच्या कार्यक्रमाला सुरुवात



करण्यात आली. श्री धनंजय जोशी (नांदेड) यांनी राग अहिर भैरव मधील बंदिश ' अलबेला सजन आयो री ' हि पारंपारिक बंदीश सादर केली, त्यानंतर विविध मराठी अभंग तसेच हिंदी भजन सादर केले. कार्यक्रमाची सांगता' कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर' या गाजलेल्या नाट्यगीताने करण्यात आली . त्यांना हार्मोनियम संगत श्री. मिहिर जोशी, व्हायोलिन श्री. पंकज शिरमाते, तबला श्री भार्गव देशमुख तर पखावजची संगत श्री. विश्वेश्वर कोळंबीकर, टाळ संगत संतोष शिंदे यांनी देवून कार्यक्रमाला रंगत आणली. यावेळी वातावरणात सूरांची उधळण झाल्याने दिवाळीच्या आनंदाला सुरांची झालर चढवली गेली, संपूर्ण महेश भवन चे सभागृह सुरमय झाले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरीश बाहेती यांनी केले. तर सूत्रसंचालन श्री प्रवीण जोशी यांनी केले. या प्रसंगी शहरातील मान्यवर, नागरिक, तसेच संगीत रसिक श्रोते प्रचंड संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मनिष घनश्याम मंत्री, अनिल रामकृष्ण सोनुने यांच्या पुढाकाराने करण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन 'कला संस्कार कथ्थक अँड ड्रॉइंग फाउंडेशनच्या संस्था वाशिम ' अध्यक्षा राधिका मंत्री यांनी केले. मंत्री चारिटेबल ट्रस्ट द्वारे दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे अशी प्रेक्षकांकडून मागणी करण्यात आली. तद्वतच ' दिवाळी पहाट' हा कार्यक्रम आपण दरवर्षी घेऊ असे जाहीर करण्यात आले. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली होती. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पियूष मंत्री,प्रतिक मंत्री, शुभम मंत्री, संतोष शिंदे, सुमित खासभागे,ओंकार पाठक, राम बारटक्के, शुभम सोनुने यांनी परिश्रम घेतले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३२२ ■ मंगळवार, २१ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# पालकमंत्री डॉ.भोयर यांनी केली साटोडा व बोरगावच्या पीएचसी केंद्राच्या जागेची पाहणी

## -दोन्ही प्रा.आ.केंद्राचे होणार रविवारी भूमिपूजन

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या विशेष प्रयत्नामुळे वर्धा शहरालगत असलेल्या बोरगाव (मेघे), साटोडा, सालोड, पिपरी (मेघे), सिंदी मेघे या गावामध्ये पाच प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आले आहे. मंजूर करण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी बोरगाव मेघे व साटोडा, सालोड व सिंदी मेघे येथील प्रस्तावित जागेची आज पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पाहणी केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अधियंता शुभम गुंडतवार, शाखा अभियंता नागेश शंभरकर,साटोडाचे सरपंच गौरव गावंडे, सालोडचे उप सरपंच आशिष कुचेवार, जयंत कावळे, सुधाकरराव साटोणे, विजय ताजणे, दिनेश वरटकर,पृथ्वीराज शिंदे आदी उपस्थित होते.



मंजूर करण्यात आलेल्या बोरगाव मेघे व साटोडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ईमारतीचे भूमी पूजन दत्ता मेघे सभागृह सावंगी मेघे येथे २६ ऑक्टोंबर रोजी दुपारी ११.३० वाजता निरामय वर्धा अभियान सन्मान सोहळा प्रसंगी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ई भूमीपूजन संपन्न होणार आहे.

बोरगाव मेघे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ६ कोटी १० लक्ष रुपये व साटोडा येथील ६ कोटी ९ लक्ष रुपये खर्च करण्यात येणार आहे. नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना उपचारासाठी शहरी भागात जाण्याची आवश्यकता पडणार नसून यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या खर्चाची व वेळेची सुध्दा बचत होऊन चांगल्या आरोग्य सेवेचा लाभ या प्राथमिक आरोग्य केंद्रात नागरिकांना मिळणार आहे. असे यावेळी डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.पालकमंत्री डॉ. भोयर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकाम जागेची पाहणी करून संबंधित अधिका-यांना सूचना केल्या.

# दिवाळी फराळाचा पेच:घरगुती की रेडिमेड ?

## -महागाईचा झटका तरीही पारंपरिक चवीला मागणी कायम

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळी दारात आलीय आणि प्रत्येक घरात फराळाचा सुवास दरवळू लागलाय. पण बदलत्या जीवनशैलीमुळे यंदाही घरगुती की रेडिमेड असा द्वंद्व सुरू आहे. महागाई वाढली तरी फराळाच्या पारंपरिक चवीची ओढ मात्र कायम आहे.फराळ बनवण्याची लगबग सुरु अनेक घरांत महिलांनी फराळाच्या तयारीला सुरुवात केली आहे. चकली, लाडू, करंजीचे सुवास पसरले असले तरी वेळेअभावी अनेक कुटुंबांनी यंदा कॉलनीतील आचारी किंवा ओळखीच्या गृहिणींमार्फत फराळ बनवून घेण्याचा पर्याय स्वीकारला आहे.



**साहित्य महागल्याचा फटका**

या सिझनमध्ये शेंगदाणे, बेसन, साखर, तेल आणि रव्याचे दर वाढल्याने घरगुती फराळही महाग पडतोय. तरीही रेडिमेड पेक्षा आपल्या हातच्या फराळाला भावनिक ओढ अधिक असल्याचे अनेक गृहिणी सांगतात.

**वेळेअभावी रेडिमेडकडे ओढा-** काम करणाऱ्या महिलांना फराळाची तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे श्रम आणि वेळ वाचवण्यासाठी अनेकांनी दर्जेदार रेडिमेड फराळाची ऑर्डर देण्यास सुरुवात केली आहे.

**घरगुती चवीची मागणी वाढलीच-** रेडिमेड फराळ बाजारात सहज मिळत असला तरी, घरगुती चवीच्या फराळाला मागणी कायम आहे. छोट्या स्तरावर फराळ बनवणाऱ्या महिला उद्योजिकांकडे मागणी वाढली असून शुद्धता आणि पारंपरिक चव ग्राहकांना आकर्षित करतेय.आचारी बोलावून फराळ तयार करण्याचा ट्रेंड कॉलनी, सोसायटी स्तरावर चार-पाच कुटुंबांनी मिळून आचारी बोलावून फराळ तयार करण्याची प्रथा यंदा वाढली आहे.

# मनसेकडून दिवाळीचा गोडवा : गोरगरिबांमध्ये साखर-रवा वाटपाने आनंदाची लूट

**वर्धा । जनमाध्यम -** गोरगरिबांची दिवाळी साजरी, हिच मनसेची दिवाळी या भावना जपताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे वर्ध्यातील बजाज चौक परिसरात दिवाळी निमित्त साखर, रवा आणि किराणा किटचे वाटप करून नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाची ज्योत पेटवण्यात आली.हा उपक्रम वर्धा जिल्हाध्यक्ष शंकर पोटफोडे व जिल्हा उपाध्यक्ष नितीन अमृतकर यांच्या नेतृत्वाखाली २० ऑक्टोबर रोजी उत्साहात पार पडला.



आपला सण आपल्या माणसांसोबत या ध्येयवाक्यातून मनसे कार्यकर्त्यांनी गोरगरिबांच्या घराघरात दिवाळीचा गोडवा पोहोचवला.या प्रसंगी तालुकाध्यक्ष धर्मदीप हिवरकर, वर्धा तालुका संघटक नितीन परतेकी, तालुका उपाध्यक्ष नितीन पोटफोडे, अतुल नांदुरकर, शहराध्यक्ष ओम क्षीरसागर, शहर उपाध्यक्ष राहुल नागोसे, सर्कल अध्यक्ष शंकर वासनिक, सर्कल अध्यक्ष नितीन दाभेकर, रोहित कल्याणी, उमेश आव्हाड, सतीश कन्नाके, प्रेम नागेश्वर, कार्तिक देसाई आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.फक्त साखर-रवा नव्हे, तर आपुलकीच्या भावनेचं हे वाटप होतं. नागरिकांनी आनंदपूर्वक सहभाग घेत मनसे आहे म्हणून दिवाळीची खरी ऊब जाणवली अशा शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली.

# तुळजापुरात कारने आलेल्या दोघांकडून चाकू दाखवून दहशत

## -दहेगाव गोसावी पोलिसांची धडक कारवाई

**सेलू जनमाध्यम :** गावात मध्यरात्री चाकू दाखवत शिवीगाळ करत दहशत माजवणाऱ्या दोघांना दहेगाव गोसावी पोलिसांनी ताब्यात घेतले. संशयितांकडून एक बटनदार चाकू आणि होंडा सिटी कार असा सुमारे ५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.रविवारी रात्री सुमारे १२ वाजता तुळजापुर गावात दोन इसम होंडा सिटी कार (क्र. एमएच-४९ बी-९२७७) मधून आले. त्यांनी हत्यारासारखे चाकू दाखवत गावकऱ्यांना दमदाटी आणि शिवीगाळ करून दहशत निर्माण केली. या प्रकाराची माहिती स्थानिकांनी पोलीसांना दिल्यावर दहेगाव गोसावी पोलिसांनी तत्काळ गावात धाव घेतली.कारवाईदरम्यान सचिन उर्फ सोनू राजेंद्र कथलकर (३५) व गणेश राजू मोरे (२४) दोन्ही रा. सिंदी रेल्वे, ता. सेलू, जि. वर्धा यांना पोलिसांनी पकडले. त्यांच्याकडून एक बटनदार चाकू (किं. ३०० रू.) आणि होंडा सिटी कार (किं. ५,००,००० रू.) असा माल जप्त करण्यात आला.या प्रकरणी अपराध क्र. २८९/२५, कलम ४,२५ शस्त्र अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईत तुळजापुर ग्रामस्थांनी पोलिसांना मोठे सहकार्य केले.ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद मदन यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. या मोहिमेत पोउपनि होमकांत मशाखेत्री, नंद्रकिशोर द्रवे, आनंद भस्मे, शैलेश टेकाम आणि रुस्तम मुंगल यांनी विशेष भूमिका बजावली.

## गरिब विद्यार्थ्यांना शिक्षणाची नवी दिशा

# आर्वीतील प्राध्यापकांचा मानवतावादी उपक्रम : स्वतःचे विद्यार्थी दत्तक घेत माणुसकीचा नवा आदर्श

**आर्वी जनमाध्यम :** शिक्षणावर सर्वांचा हक्क असला तरी घरातील हलाखीची परिस्थिती अनेकांना अडवते. अशीच जाणीव ठेवून आर्वी येथील कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाने एक हृदयस्पर्शी पाऊल उचलले आहे. येथील प्राध्यापकांनी घरच्या आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी स्वीकारली आहे.या उपक्रमांतर्गत प्रा. राजेंद्र ढगे यांनी वेदांत झामरे, प्रा. धर्मेंद्र राऊत यांनी पल्लवी जाधव, प्रा. मोहन कुंभरे यांनी सलोनी जाधव व प्रा. हमीद शेख यांनी कोमल बेंडे या विद्यार्थिनींना दत्तक घेतले. बदलत्या काळातील वाढत्या महागाईमुळे शिक्षण खर्चीक होत चालले असताना हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा नवा आधार ठरला आहे. या मानवतावादी कृतीबद्दल संस्थेच्या अध्यक्षा ॲड. शोभाताई [illegible], कोषाध्यक्ष संदीप काळे व प्राचार्य डॉ. रवींद्र सोनटक्के यांनी प्राध्यापकांचे अभिनंदन केले. यावेळी डॉ. गणेश मस्के, प्रा. नितीन शिरपूरकर, भावना खंडारकर, विशाल येलेकर, लखन जाधव तसेच विद्यार्थी उपस्थित होते.महाविद्यालयाचा हा मानवतावादी उपक्रम आता परिसरात चर्चेचा विषय ठरला असून, इतर संस्थांसाठी प्रेरणादायी उदाहरण घालून देणारा आहे.



# दिवाळीनिमित्त दिव्यांगांना साहित्य वाटप : सामाजिक बांधिलकीचा स्तुत्य उपक्रम

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर वर्ध्यात राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ), नागरी सहकारी अधिकोष बँक आणि न्यू इंग्लिश अकॅडमी ऑफ जिनिअस यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बांधवांसाठी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल दिव्यांग कुटुंबांना किराणा किट, महिलांना साड्या तर दृष्टिहीन व्यक्तींना चालण्यासाठी काठ्या अशा साहित्याचे वाटप करण्यात आले. दिव्यांग बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.कार्यक्रमास पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. श्वेता पिसुळकर, राष्ट्रीय दृष्टिहीन संघाचे अध्यक्ष रघुनाथ बारड, उद्योजक महेश गुल्हाने, प्राचार्य डॉ. देवेंद्र गुजरकर आदी मान्यवर उपस्थित होते.उपक्रमासाठी महेश गुल्हाने, डॉ. पिसुळकर, देवदत्त नरोटे, डॉ. गुजरकर, प्राचार्य साधना पवार व मकरंद उमाळकर यांनी आर्थिक सहाय्य केले. कार्यक्रमाचे संचालन पल्लवी पुरोहित यांनी केले, तर आभार नरेंद्र नरोटे यांनी मानले.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय तिगावकर, पांडुरंग भालशंकर, विवेक डोंगरे, दिव्या पाटील, सुझाता भालशंकर यांनी मोलाचे सहकार्य केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय दृष्टिहीन संघाचे उपाध्यक्ष भोजराज पाटील यांनी केले.



# युवा शक्तीच्या उर्जेने लखलखले वर्धा अधिवेशन

## -आ.कुणावार यांच्या हस्ते उद्‌घाटन; उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान

**हिंगणघाट जनमाध्यम :** तरुणाईच्या नेतृत्वगुणांना आणि सामाजिक भानाला प्रोत्साहन देणारे वर्धा युवा अधिवेशन हिंगणघाट तहसिल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडले. या अधिवेशनाचे उद्‌घाटन आमदार समीर कुणावार यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी उपविभागीय अधिकारी आकाश अवतारे, माजी नगराध्यक्ष प्रेम बसंतानी, तहसीलदार योगेश शिंदे, नायब तहसीलदार सागर कांबळे, विद्या विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमेश तुळसकर, ओमकार कुणावार तसेच भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकूर प्रमुख उपस्थित होते. अधिवेशनात उत्तम कामगिरी करणाऱ्या पूर्वा कोहोड, अनिशा येडे, उदयराज भोंबले, प्रज्वल मिलमिले आणि श्रेयश इंगोले या युवकांचा सन्मान करण्यात आला. या विजेत्या तरुणांना वर्धा युथ फेस्ट २०२६ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय लोकसभा अधिवेशनात हिंगणघाटचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.समितीचे अध्यक्ष सारंग रघटाटे यांनी सांगितले की, युवकांना त्यांच्या हक्काचा मंच मिळवून देण्यासाठी समिती आगामी काळातही असे उपक्रम राबवत राहील.

कार्यक्रमाचे संचालन शामसुंदर बाडंबैल यांनी तर आभार प्रदर्शन कोमल वर्मा यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हर्ष उबाळे, बुलबुल ठाकूर, तनुजा चिचघरे, कृष्णा नांदुरकर, सुशांत जीवतोडे, अक्षय मानकर, हिमांशू नरड व रोहन धोटे आदींनी मेहनत घेतली.




### सुट्टीची सूचना

आज दिनांक २१ ऑक्टोंबर २०२५ रोजी लक्ष्मीपूजन (दिवाळी) निमित्त जनमाध्यम कार्यालयाला सुट्टी असल्यामुळे दिनांक २२ ऑक्टोंबर २०२५ रोजी चा अंक प्रकाशित होणार नाही, वाचकांनी नोंद घ्यावी,

वर्धा जनमाध्यम कडून वाचकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

-व्यवस्थापक

# शनिवारवाड्यात नमाज पठण करणा-या अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील ऐतिहासिक शनिवार वाड्यात नमाज पठण केल्याचा दावा केला जात आहे. याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल होत आहे. या घटनेनंतर शहरात मोठी खळबळ उडाली असून, विविध हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत.त्यानंतर विश्रामबाग पोलिस ठाण्यात अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास विश्रामबाग पोलिस करत आहेत.



शनिवाड्यात नमाज पठनचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पतित पावन संघटनेच्या पदाधिका-यांनी शनिवार वाड्यात आंदोलन केले. संघटनेने सांगितले की, त्यांनी त्या जागेवर गोमूत्र शिंपडून ती जागा पवित्र केली तसेच शेणाने सारवून जागा शुद्ध करण्याचा विधीही पार पाडला. यानंतर शनिवारवाड्यात शिववंदना सादर करण्यात आली. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, अशा प्रकारच्या घटना भविष्यात सहन केल्या जाणार नाहीत.

खासदार मेधा कुलकर्णी यांनीसुद्धा तीव्र नाराजी व्यक्तकरत म्हटलं की, यापुढे अशा प्रकारचे प्रकार काहीही झालं तरी आम्ही खपवून घेणार नाही त्यांनी प्रशासनाला अशा घटनांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच त्यांनी काल शनिवारवाडा येथे हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांसह आंदोलन केले.

शनिवारवाडा ही भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाची वास्तू आहे. पुरातत्त्व विभागाच्या अधिका-याकडून रात्री तक्रार प्राप्त झाली आहे. त्यानंतर विश्रामबाग पोलिस ठाण्यात अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास विश्रामबाग पोलिस करत आहेत.

**शनिवार वाड्यावर पोलीस बंदोबस्त वाढवला**

पुण्यातील शनिवारवाड्यात असणा-या कबरी बाहेर पोलिसांनी बंदोबस्त वाढवला आहे. हिंदू संघटनांनी आणि भाजपा खासदार मेधा कुलकर्णी यांनी या कबरी विरोधात आंदोलन केले होत. शनिवार वाड्यात काही मुस्लिम महिलांनी नमाज पठण केल्यानंतर आंदोलन करण्यात आले होते. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होउ नये म्हणून पोलिसांनी बंदोबस्त वाढवला आहे. हिंदू संघटनांकडून ही कबर हटवण्यासाठी ८ दिवसाचा अल्टीमेटम देण्यात आला आहे.

## ऐन दिवाळीत सोन्या-चांदीचे दर जोरदार आपटले

**जळगाव/ प्रतिनिधी**

धनत्रयोदशीला सोने-चांदी खरेदी न करू शकलेल्या लोकांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. सोन्या-चांदीचे दर गगनाला भिडले होते, ते आता खाली आले आहेत. आज दिवाळीच्या दिवशी चांदी एका झटक्यात ९१३० रुपये स्वस्त झाली आहे, तर सोन्याच्या दरात २८५४ रु पयांची घसरण झाली. २४ कॅरेट सोन्याचा भाव आता जीएसटीसह प्रति १० ग्रॅम १,३०,५३१ रुपये झाला आहे. तर, चांदी जीएसटीसह प्रति किलो १,६४,९०३ रु पयांवर आली आहे. दरम्यान, ऑक्टोबर महिन्यात सोनं प्रति १० ग्रॅम ११३८१ रु पये महाग झालं. तर, चांदीच्या किमतीत प्रति किलो १७,६६६ रुपयांची वाढ झाली. शुक्रवारी २४ कॅरेट सोन्याचा दर जीएसटीशिवाय १,२९,५८४ रु पये प्रति १० ग्रॅमवर बंद झाला होता. दुसरीकडे, चांदी देखील जीएसटीशिवाय प्रति किलो १,६९,२३० रु पयांवर बंद झाली होती. आज सोनं जीएसटीशिवाय प्रति १० ग्रॅम १,२६,७३० रु पये दरानं उघडले आणि चांदी १,६०,१०० रु पयांवर उघडली. आयबीजेए दिवसातून दोन वेळा दर जारी करते. एकदा दुपारी १२ वाजताच्या सुमारास आणि दुस-यांदा ५ वाजताच्या आसपास दर जारी केले जातात.

### 'अंग्रेजों के जमाने का जेलर' काळाच्या पडद्याआड

## ज्येष्ठ अभिनेते असरानी यांचे निधन

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडमधील दिग्गज अभिनेते आणि कॉमेडिअन असरानी यांनी आज अखेरचा श्वास घेतला. असरानी यांचं पूर्ण नाव गोवर्धन असरानी असं होतं. मागील काही दिवसांपासून ते हॉस्पिटलमध्ये दाखल होते. मात्र २० ऑक्टोबरला संध्याकाळी ४ वाजता उपचारादरम्यान त्यांचे प्राण गेले. असरानी ८४ वर्षांचे होते. फुफ्फुसांच्या समस्येमुळे गेल्या पाच दिवसांपासून असरानी यांना आरोग्य निधी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. असरानी यांचे मॅनेजर बाबूभाई थिबा यांनी असरानी यांच्या मृत्यूची पुष्टी केली. असरानी अनेक दिवसांपासून आजारी होते आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते असं त्यांनी सांगितले.



शोले या सिनेमातून असरानी यांनी केलेली जेलरची भूमिका अनेकांच्या आजही स्मरणात आहे. हम अंग्रेजों के जमाने के जैलर हैं! हे त्यांचे वाक्य प्रचंड गाजले. सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासोबत १९७२ ते १९९१ या काळात सुमारे २५ चित्रपटांमध्ये असरानी यांनी काम केले. भागम भाग, हेरा फेरी, छुपके छुपके यासारख्या सिनेमात त्यांनी विनोदी अभिनेत्याची भूमिका साकारली होती. ते सहजपणे मुख्य भूमिका, सहाय्यक भूमिका किंवा विनोदी भूमिका साकारत होते.

१९६७ साली 'Hare Kanch Ki Chooriyan' या चित्रपटातून असरानी यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यांच्या पहिल्या काही भूमिका गंभीर स्वरूपाच्या होत्या, मात्र पुढे त्यांनी विनोदी अभिनयात एक स्वतंत्र ओळख निर्माण केली. ५ दशकांहून अधिक काळात असरानी यांनी ३५० पेक्षा जास्त चित्रपटांमध्ये काम केले. असरानी यांनी काही चित्रपटांचे दिग्दर्शन देखील केले आहे. त्यांनी 'Chala Murari Hero Banne' हा विनोदी चित्रपट स्वत? दिग्दर्शित करून प्रमुख भूमिका साकारली होती. असरानी हे 'सिच्युएशनल कामेडी'चे मास्टर मानले जात होते. त्यांचा आवाज, संवादफेक आणि चेह-यावरील भाव यामुळे ते प्रत्येक भूमिकेवर वेगळी छाप पाडत होते.

# राज्यावर पुन्हा पावसाचे संकट!

**मुंबई /प्रतिनिधी-**अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने अनेक भागात पाउस पडत आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावरही अनेक भागात पाउस सुरू आहे. त्यामध्येच भारतीय हवामान विभागाने आता २१ ते २५ ऑक्टोबर दरम्यान पावसाचा इशारा दिला. नवरात्रीनंतर दिवाळी देखील पावसामध्येच जाण्याचे संकेत आहेत. राज्यामध्ये काही दिवसांपूर्वीच पावसाने मोठा हाहाकार माजवला. अनेक भागात इतका पाउस झाला की, शेती पूर्णपणे वाहून गेली. हाताला आलेले पिक शेतक-यांच्या हातून निघून गेले.




हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील सात दिवसांत केरळ, तामिळनाडू, लक्षद्वीप, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या काही भागात पावसाचे संकेत आहेत. अनेक भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर, सिंधुदुर्ग, नांदेड या जिल्ह्यांमध्ये आज येलो अलर्ट जारी करण्यात आला. पुणे, रत्नागिरी, सातारा, सांगली आणि लातूर या भागात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज आहे. २० ते २५ ऑक्टोबर दरम्यान दक्षिण भारतातील अनेक भागात पाउस सुरू राहण्याची शक्यता आहे. २१ ऑक्टोबरपर्यंत, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल येथे हलका ते मध्यम पाउस पडू शकतो आणि काही ठिकाणी जोरदार पाउस पडू शकतो. पुढील काही दिवसांपासून पावसाचा जोर अधिक वाढण्याचे स्पष्ट संकेत भारतीय हवामान विभागाने दिली आहेत. २० ते २४ ऑक्टोबर दरम्यान छत्तीसगडमध्ये आणि २० ते २३ ऑक्टोबर दरम्यान नागालँड, मणिपूर, मिझोरम आणि त्रिपुरामध्ये वादळी वा-यासह पावसाचे संकेत आहेत.

पुढील तीन दिवसांत कोकण, गोवा, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात वादळी वा-यासह जोरदार पावसाचे संकेत आहेत. यामुळे राज्यावरील पावसाचे संकट अजूनही टळले नसल्याचे स्पष्ट आहे. अंदमान समुद्र आणि आग्नेय बंगालच्या उपसागरावर चक्राकार वा-याची स्थिती कायम आहे. २४ ऑक्टोबर रोजी बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे राज्यात पुढील काही दिवस पावसाचे ढग असणार हे आता स्पष्ट आहे. भर दिवाळीतही लोकांना छत्र्या घेउन फिरावे लागेल.

## दिल्लीची हवा बनली अतिविषारी

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-**दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील नागरिकांसाठी दिवाळीचा आनंद आता जीवघेणा ठरला आहे. दिवाळी सुरु होताच दिल्ली-एनसीआरच्या हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून, प्रदूषण अतिशय खराब श्रेणीत पोहोचले आहे. वाढत्या धोक्यामुळे, वायु गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाच्या उप-समितीने तातडीची बैठक घेउन ग्रेडेड रिस्पान्स ॲक्शन प्लॅन दुसरा टप्पा त्वरित लागू करण्याची घोषणा केली आहे. दिल्लीतील आनंद विहार येथे सर्वात जास्त प्रदूषण नोंदवले गेले आहे, जिथे वायु गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) ४१७ इतका गंभीर श्रेणीत पोहोचला आहे. नवीन दिल्लीत एक्यूआय ३६७, विजय नगर (गाझियाबाद) येथे ३४८, नोएडा सेक्टर-१ मध्ये ३४४ आणि नोएडा येथे ३४१ नोंदवण्यात आला आहे.प्रदूषणाची पातळी धोकादायक ठरल्यामुळे एक १२-सूत्रीय कृती योजना त्वरित लागू केली आहे. यामध्ये स्टेज-१ च्या उपायांव्यतिरिक्त अतिरिक्त कठोर निर्बंधांचा समावेश आहे. आयोगाने एनसीआरमधील सर्व राज्यांच्या प्रदूषण नियंत्रण मंडळांना आणि दिल्ली प्रदूषण नियंत्रण समितीला या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

# राज्यात प्रदूषणाचा विळखा!

## मुंबई, पुणे नागपूरसह प्रमुख शहरात धोक्याची घंटा

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवाळीत फटाक्यांबाबत मुंबईत कडक नियम लागू करण्यात आले आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेने (एनएमएमसी) व्यवसाय आणि जनतेला सरकारी नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. मुंबईतील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर हा आदेश लागू करण्यात आला आहे. दिवाळी सुरू होताच, महानगरातील हवेची गुणवत्ता देखील खालावण्यास सुरु वात झाली आहे. रविवारी, वांद्रे आणि कुलाबा येथील हवेची गुणवत्ता २०० अदक पेक्षा जास्त झाली, जी खराब हवेची गुणवत्ता दर्शवते. तज्ज्ञांनी श्वसनाच्या आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांना पुढील आठवड्यासाठी सतर्क राहण्याचा आणि प्रदूषणाविरुद्ध खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे.



१० ऑक्टोबरपासून मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावण्यास सुरुवात झाली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या हवा गुणवत्ता देखरेख ॲप, समीर कडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी मुंबईची सरासरी हवेची गुणवत्ता १५९ अदक नोंदवली गेली, जी मार्चनंतरची सर्वाधिक आहे. सायंकाळी ६ वाजेपर्यंत, मुंबईच्या विविध भागात बीएमसी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बसवलेल्या हवेच्या गुणवत्तेच्या निरीक्षण उपकरणांच्या वाचनात वांद्रे येथे २१८ आणि कुलाबा येथे २०६ असे दिसून आले.

२०० पेक्षा जास्त अदक म्हणजे उच्च प्रदूषण पातळी आणि खराब आरोग्य. १०० पेक्षा जास्त अदक दमा, फुफ्फुस, श्वसन आणि हृदयरोग असलेल्या लोकांच्या समस्या वाढवू शकते. २०० पेक्षा जास्त अदक असलेल्या भागात, या समस्या आणखी वाढू शकतात.मुंबईच्या अनेक भागात १०० ते २०० दरम्यान अदक नोंदवला गेला आहे. चेंबूरमध्ये १८१, विलेपार्लेमध्ये १६९, गोवंडीमध्ये १६९, मालाडमध्ये १६३, भायखळामध्ये १५६, घाटकोपरमध्ये १५२, सायनमध्ये १३१, कांदिवलीमध्ये ११७, बोरिवलीमध्ये १०९, शिवडीमध्ये १०७ आणि वरळीमध्ये १०२ असा एक्यूआय नोंदवण्यात आला.

## बडतर्फ पोलिस अधिकारी रणजीत कासलेला अटक

**लातूर / प्रतिनिधी-**बीड पोलिस दलातील बडतर्फ पोलिस अधिकारी रणजीत कासले याला अटक करण्यात आली आहे. गुजरातमधील घर फोडीतील आरोपींना मदत केल्याच्या संशयावरुन कासलेला अटक करण्यात आली आहे. या आरोपींना मदत करणे किंवा इतर सहकार्य पुरवणे अशा स्वरूपाचा संशय गुजरात पोलिसांना असल्याकारणाने त्यांनी दोन दिवसापासून रणजीत कासलेला अटक करण्यासाठी शोध मोहीम सुरू होती. लातूर पोलिसस त्याचबरोबर गुजरात पोलीस यांनी एकत्रित केलेल्या मोहिमेमुळे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रणजीत कासले यास ताब्यात घेतला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्यातील कागदपत्राची पूर्तता करून सहा जणांच्या पथकाने रणजीत कासले याला गुजरात येथील सुरत भागातील पाल पोलीस स्टेशनकडे घेउन गेले आहेत. वेगवेगळ्या प्रकरणी आत्तापर्यंत सात गुन्हा रणजीत कासले याच्यावर दाखल आहेत. गुजरात पोलिसांचा हा आठवा गुन्हा आहे. गुजरात पोलिस घेउन जाताना बासला अटक झाली म्हणत कासलेने पुष्पा चित्रपटामधील ॲक्शन ही करून दाखविली. दरम्यान, बडतर्फ झाल्यानंतर रणजीत कासलेने मोठ्या प्रमाणात सोशल मीडियावर व्हिडीओ करत अनेक खुलासे केले आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि त्यानंतर वाल्मीक कराड याबाबतच्या अनेक चित्रफिती सोशल मीडियावर रणजीत कासलेने व्हायरल केल्या होत्या.



## कॅनडातून भारतीयांची बळजबरीने हकालपट्टी

**टोरँटो /वृत्तसंस्था-**कॅनडामधून भारतीय नागरिकांना बळजबरीने बाहेर काढले जात आहे. गेल्या सहा वर्षांपासून सातत्याने या आकड्यामध्ये वाढ होत आहे. २०१९ मध्ये कॅनडामधून बळजबरी बाहेर काढण्यात आलेल्या भारतीय नागरिकांची संख्या ६२५ इतकी होती, तर २०२४ मध्ये हा आकडा १८९१ वर पोहोचला आहे. याचाच अर्थ एकाच वर्षामध्ये १८९१ भारतीय नागरिक बळजबरीने कॅनडामधून बाहेर काढण्यात आले आहेत.



कॅनडाच्या बॉर्डर सर्व्हिसेस एजन्सीकडून यासंदर्भातील आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे, कॅनडामधून सध्या ज्या नागरिकांना बाहेरचा रस्ता दाखवला जात आहे, त्यामध्ये मॅक्सिको प्रथम क्रमांकावर आहे, २०२४ मध्ये मॅक्सिकोच्या तब्बल ३६८३ नागरिकांना कॅनडाने आपल्या देशाबाहेर काढलं होतं. तर दुसरा नंबर हा भारताचा आहे, कॅनडामधून २०२४ मध्ये तब्बल १८९१ नागरिकांना बळजबरी बाहेर काढण्यात आलं आहे. तर या यादीमध्ये तिसरा नंबर हा कोलंबियाचा आहे, आतापर्यंत कॅनडामधून कोलंबियाच्या ९८१ नागरिकांना घरचा रस्ता दाखवण्यात आला आहे.

याबाबत कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी या आठवड्याच्या सुरुवातीलाच टोरंटोमध्ये बोलताना म्हटलं होतं की, सध्या आम्ही आमच्या इमिग्रेशन सिस्टीममध्ये काही महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणत आहोत, याच पार्श्वभूमीवर ज्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे, किंवा जे एखाद्या गुन्ह्याशी संबंधित आहेत, अशा लोकांना आम्ही डिपोर्ट करत आहोत. आतापर्यंत मॅक्सिको, भारत आणि कोलंबिया या तीन देशातील सर्वाधिक नागरिकांना कॅनडानं देशाबाहेर काढलं आहे.

## दिवाळीच्या दिवशी शेअर बाजाराचा 'जोश हाय'; सेन्सेक्सचा उच्चांक

**मुंबई /वृत्तसंस्था-**भारतीय शेअर बाजार दीपावलीच्या निमित्तानं सोमवारच्या ट्रेडिंग सेशनमध्ये तेजीसह ग्रीन झोनमध्ये बंद झाला. कामकाजाच्या अखेरीस सेन्सेक्स ४४१.१८ अंकांनी किंवा ०.४९ टक्के तेजीसह ८३,८४,३६३.३७ वर, तर निफ्टी १३३.३० अंकांनी किंवा ०.५२ टक्के वाढीसह २५,८४३.१५ वर बंद झाला. सत्रादरम्यान सेन्सेक्सनं ८४,६५६.५६ आणि निफ्टीनं २५,९२६.२० चा उच्चांक गाठला.तेजीमध्ये मोठा वाटा सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा होता. निफ्टी पीएसयू बँक इंडेक्स कामकाजाच्या अखेरीस २.८७ टक्के मजबूत होउन बंद झाला. याव्यतिरिक्त निफ्टी इन्फ्रा १.३२ टक्के तेजीसह आणि निफ्टी ऑइल अँड गॅस १.४२ टक्के तेजीसह ग्रीन झोनमध्ये बंद झाला. निफ्टी ऑटो ०.१६ टक्के, फायनान्शियल सर्व्हिस ०.१२ टक्के, एफएमसीजी ०.०३ टक्के आणि निफ्टी मेटल ०.०७ टक्के घसरणीसह बंद झाले. सेन्सेक्स पॅकमध्ये बजाज फिनसर्व्ह, ॲक्सिस बँक, एसबीआय, टीसीएस, टायटन, भारती एअरटेल,



इन्फोसिस, बजाज फायनान्स आणि एल अँड टी टॉप गेनर्सच्या यादीत समाविष्ट होते. तर, आयसीआयसीआय बँक, एम अँड एम, इटर्नल आणि पॉवरग्रिड टॉप लूजर्सच्या यादीत समाविष्ट राहिले. आज मुहूर्त ट्रेडिंग : दरवर्षी दिवाळीच्या मुहूर्तावर शेअर बाजारात मुहूर्त ट्रेडिंग प्रथा आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही मुहूर्त ट्रेडिंगसाठी शेअर बाजार खुला होईल.

### राज्यभर 'दिवाळी'चा उत्साह

# कुठे जल्लोष, तर कुठे सांस्कृतिक कार्यक्रम

**मुंबई/प्रतिनिधी :** देशासह राज्यभरात दिवाळीच्या चैतन्यदायी पर्वानिमित्त सर्वत्र उत्साह आहे. मोठ्या शहरांपासून गावखेड्यापर्यंत बाजारपेठा गजबजल्या आहेत. अतिवृष्टीने गेलेली पीके,लांबलेली खरीप काढणी, होउ घातलेली रबी पेरणी एकाच टप्प्यात आल्याने शेतक-यांची अजूनही शिवारातच लगबग सुरू आहे. पावसाने पिकांचे नुकसान केले असले, तरी दिवाळी सण सर्वांसाठी प्रकाशमय असावे यासाठी शेतकरी व सर्वसामान्य उत्साहाने सणाची तयारी करत आहे.

दिवाळीच्या मुहूर्तावर कपडे, सोने, वाहने, धार्मिक पूजा साहित्य खरेदीसाठी बाजारपेठांत ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. ग्राहकांनी दुकाने गजबजली आहेत. वर्षभराच्या नोंदीसाठी व्यापा-यांना लागणा-या चोपड्या, पूजेसाठी फुले, उत्साचे धाट, केळीचे खुंट, लक्ष्मीची प्रतिमा-पावले आदी पूजेचे साहित्य खरेदी करत लक्ष्मी पूजन, पाडवा सणासाठी नागरिकांसह व्यापारी, संस्था, कंपन्या सज्ज झाल्या आहेत. वाहन खरेदीसाठी देखील दुचाकी, चारचाकींसह ट्रॅक्टर, अवजारे खरेदीसाठी देखील बाजारपेठेत उत्साह आहे. दिवाळ फराळाचे काम संपले असून, सणाचा गोडवा या चवदार पदार्थांनी वाढवला आहे.



**ठाण्यात दिवाळीचा जल्लोष-**ठाणे शहरात दिवाळी पहाटेनिमित्त विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये जामीनाका परिसरात माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांच्या वतीने सांस्कृतिक संगीत, वाद्य वादन आणि ढोल-ताशा पथकाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला, ज्याला तरुणाईचा मोठा प्रतिसाद मिळाला. तर दुसरीकडे, ठाण्यातील तलावपाळी येथे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून युवासेना लोकसभा अध्यक्ष नितीन लांडगे यांच्या वतीने दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात आले.

**कैद्यांसाठी दिवाळी पहाटचे आयोजन-**सातारा-यातील जिल्हा कारागृहात बंदिवानांसाठी सप्तसूर फाउंडेशनच्या माध्यमातून दीपावली पहाट हा अनोखा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात गायकांनी हिंदी-मराठी चित्रपटांमधील गाणी सादर केली. या संगीत-कार्यक्रमाला बंदिवानांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामुळे दिवाळीच्या निमित्ताने कारागृहातील वातावरण आनंदी आणि उत्साहाचे बनले.

**सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी वेळ वाढवली-**दिवाळीनिमित्त सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांची गर्दी लक्षात घेउन मंदिराच्या वेळा वाढवण्यात आल्या. २२ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबरपर्यंत मंदिर भाविकांना दर्शनासाठी पहाटे ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत खुले ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, रोप-वे ट्र?लीची सुविधा देखील पहाटे ५ ते रात्री ११.३० वाजेपर्यंत सुरू राहणार आहे, जेणेकरून आलेल्या प्रत्येक भाविकाला देवीचे दर्शन घेता येईल.

## शालार्थ आयडी घोटाळयामुळे थांबवलेले वेतन सुरू करा; हायकोर्टचा आदेश

**नागपूर/प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विविध शाळांमधील शंभरावर शिक्षकांची मागणी मंजूर करून या शिक्षकांचे शालार्थ आयडी घोटाळ्यामुळे गेल्या मार्चपासून थांबवलेले वेतन सुरू करा, असा अंतरिम आदेश विभागीय उपसंचालकांना दिला.शिक्षण या शिक्षकांना शालार्थ आयडी जारी केले गेले आहेत; परंतु शालेय शिक्षण विभागाने संबंधित घोटाळ्यामुळे या शालार्थ आयडीच्या वैधतेची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी, या शिक्षकांचे वेतन थांबविण्यात आले. या कारवाईविरुद्ध शिक्षकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. त्यावर न्यायमूर्तिद्वय मुकुलिका जवळकर व राज वाकोडे यांच्यासमक्ष सुनावणी झाली.दरम्यान, शिक्षकांचे वकील ॲड. पवन देंगे यांनी सरकारच्या कारवाईवर आक्षेप घेतला व ही कारवाई करण्यापूर्वी शिक्षकांना सुनावणीची संधी देण्यात आली नाही, याकडे लक्ष वेधले. त्यानंतर न्यायालयाने यासह विविध बाबी लक्षात घेता शिक्षकांना दिलासा दिला.




**वेतनासाठी २९ ऑक्टोबरपर्यंत मुदत-**याचिकाकर्त्या शिक्षकांना संपूर्ण थकीत वेतन अदा करण्यासाठी न्यायालयाने शिक्षण उपसंचालकांना येत्या २९ ऑक्टोबरपर्यंत मुदत दिली आहे; तसेच शिक्षकांनी शालार्थ आयडी चौकशीसाठी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिका-यांना सहकार्य करावे, असेही सांगितले आणि शिक्षण उपसंचालक व इतर प्रतिवादींना नोटीस बजावून याचिकांमधील मुद्यांवर येत्या ११ नोव्हेंबरपर्यंत लेखी उत्तर मागितले.

# संपादकीय


प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## मंगलमय पर्व

'नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी' असे संत नामदेवांनी म्हटले होते. तोच हा ज्ञानाचा दीप, तोच आत्मदीप. तो मनोमनी उजळण्याची हाक देणारी ही दीपावली. अग्नीची उपमा ही जीवातील अदम्य ऊर्जेचे प्रतीक. चिरंतन चैतन्याचा तो सांगावा. तो घेऊन ती येते आणि ओंजळ रिती करून जाते. हेच चैतन्य वसुबारसपासून दिवाळीच्या पाडव्यापर्यंत आणि भाऊबीजेपर्यंत प्रत्येक क्षणाक्षणात सामावलेले असते, तोच गंध, दरवळ या दिव्यांच्या उत्सवात दारोदारी अन् नभांगणी सर्वत्र अनुभवणे हाच या सणाचा आशयघन अर्थ! आपल्या अनेक सणांना कृषी संस्कृतीचे सुंदर अधिष्ठान आहे. माणसाच्या परिपूर्ण जगण्याला याच संस्कृतीचे कोंदण. पावसाळा संपलेला असतो, शेतात नवीन धान्याची रास आलेली असते.बळीराजाचे हिरवे स्वप्न साकारताना लक्ष लक्ष दिव्यांनी साजरा होणारा हा उत्सव. या समृद्धीबद्दल निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि सुगीचा (कापणीचा) आनंद साजरा करण्यासाठी हा दीपोत्सव साजरा केला जातो. बळीराजाच्या स्मरणातून न्यायी आणि समृद्ध कृषी जीवनाची आकांक्षा व्यक्त केली जाते. आपल्या संस्कृती आणि परंपरेची मुळे कशी...किती खोलवर रुजली आहेत, याचा संदेश त्यातून मिळतोच, शेती आणि शेतकऱ्याशिवाय जीवन नाही, याचाही अर्थ कळतो. कृषी जीवनाशी एकरूप झालेली ही दिवाळी जगण्याचा हा प्रवाह अखंडितपणे सुरू राहण्याची आशा जागवतेच, त्याहून ती अधिक आश्वस्तही करते.अशा या आजच्या सणाकरीता संपूर्ण बाजार सजला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जीएसटी कपातीचा निर्णय घेतल्यानंतर बाजारात उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झालेले दिसू लागले आहे. नवरात्रीत दिवाळी खरेदीसाठी जोरदार खरेदीची लाट उसळली होती. पण दिवाळीतही ही लाट कायम आहे आणि जीएसटी कपातीच्या रूपाने भारताला ही भेट मिळाली आहे असे समजले जात आहे. पण सर्वात जास्त फायदा ई कॉमर्सच्या व्यवसायाला आलेल्या झळाळीमुळे आहे. यंदाच्या दिवाळीमध्ये बाजारपेठांमध्ये अतिरिक्त उत्साह निर्माण झाला आहे. कारण ग्राहक लक्षणियरीत्या खर्च करत आहे आणि त्यांची क्रयशक्ती वाढली आहे.त्यांच्या जोडीला जीएसटी कपात मदतीला आहे आणि कॉर्पोरेट कंपन्यांमध्येही कामगिरीने उत्साहाचे वातावरण आहे. सहसा कोणताही सणांचा उत्सव हा अर्थव्यवस्थेला चालना देणाराच असतो. तो प्रमुख आर्थिक कॅटलिस्टही असतो. त्यांचे अनेक घटक आहेत जसे की या काळात ग्राहकांची खरेदीचा उत्साह उतू जात असतो आणि खर्च अतोनात केला जातो. वास्तविक भारताची परिस्थिती आज काही वर्षापूर्वी होती तशी नाही. आज भारताचा ग्राहक खिशात बऱ्यापैकी पैसे घेऊन दुकानात जात असतो. महागड्या वस्तू खरेदी करत असतो. यंदा दिवाळीची खरेदी किती झाली ही आकडेवारी आज समोर नसली तरीही अगदी काही दिवसांत ती समोर येईल आणि ती रेकॉर्ड ब्रेक असेल असा अदाज आहे. फ्लिपकार्ट आणि ॲमेझॉन या ई-कॉमर्सच्या विशाल कंपन्यांकडे प्रचंड मागण्या आहेत आणि त्या पूर्ण करण्याच्या तयारीत आहेत. वाढत्या किमती असूनही सोन्याच्या खरेदीला उत आला आहे. रिझर्व्ह बँकेने नवीन नियम घालून दिल्यानुसार सोने खरेदी आणि सोन्यावर कर्ज मिळवणे सोपे झाले आहे ही ग्राहकांच्या समाधानाची बाब आहे. दिवाळी हा सण संपत्ती निर्मिती आणि व्यापारी आकार वाढवण्यासाठी शुभ समजला जात असल्याने गुंतवणूकदारांसाठी हा सण उत्साहाने भारलेला असतो. त्या दृष्टीने मोदी सरकारने आल्यापासून जनतेला एकापेक्षा एक भेटी देण्याचे ठरवले आहे आणि त्यापैकीच आहे जीएसटी कपात. जी एसटी कपातीमुळे ग्राहकांच्या खिशातील बराचसा पैसा वाचला असून तो आपोआपच बाजारात ओतला जात आहे. जीएसटी २.० मुळे अनेक वस्तूंच्या किमती जनतेच्या आवाक्यात आल्या आहेत आणि आयकर सुधारणांमुळे उपभोग आणि खासगी भांडवली खर्च आटोक्यात आला आहे. दिवाळी खरेदीमुळे किरकोळ विक्री वाढते आणि उत्पादनाला चालना मिळते आणि अर्थव्यवस्थेत मोठी उलाढाल होते. हा आतापर्यंतचा अनुभव आहे. दिवाळी हा केवळ प्रकाशाचा सण नाही तर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही तो एक प्रकाशमान सण आहे. हा सण अर्थव्यवस्थेला चालना देणारा आहे. त्यामुळे भारतात ग्राहकांच्या संख्येत अविश्वसनीय वाढ झाली आहे. यंदाच्या दिवाळीत ४ ते ४.२५ कोटी लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. २०१९ पासून ते २०२५ पर्यंत दिवाळीच्य ग्राहकांनी केलेल्या खर्चात अनपेक्षित वाढ झाली आहे. या काळात कामातून मिळालेल्या विश्रांतीमुळे लोक एकत्र येऊन गोडधोड खातात, भेटवस्तूंची देवाण-घेवाण करतात आणि सामुदायिक आनंद साजरा करतात, ज्यामुळे शहरासह ग्रामीण समाजात एकोपा टिकून राहतो. या आनंदाला, समाधानाला व्यापक आणि सर्वस्पर्शी अर्थ देते ती दिवाळी. मनामनात माणुसकीचे आणि मानवतेचे दीप उजळवण्याचा संदेश ती देते. यावर्षी महाराष्ट्रात अतिवृष्टीने शेतकऱ्यांवर अस्मानी संकट आले. मात्र, दिवाळीच्या आधीच सरकारने पूरग्रस्तांना, शेतकऱ्यांना आर्थिक आधार दिला. अन्नदात्या शेतकऱ्याची दिवाळी गोड होणे आवश्यक होते. दिवाळी साजरी करताना संकटात सापडलेल्या या भावंडांची आठवण ठेवावी लागेल. सर्वांना ही दीपावली आनंददायी व भरभराटीची ठरो, हीच त्या सर्वात्मक परमेश्वराकडे प्रार्थना..!.

# शेतकरीविरोधी 'आवश्यक वस्तु' कायद्याची पार्श्वभूमी

**आवश्यक वस्तू कायद्याने सरकारकडे राक्षसी अधिकार दिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे सर्वस्व गमावले गेले. ना भाव ठरवता आला, ना बचत मागे पडली. हा कायदा आला कसा? हे आपण समजावून घेऊ या.**




अशोक गुलाटी सारख्या अर्थतज्ञाने आवश्यक वस्तू कायदा रद्द करण्याची मागणी केली आहे, तसा अहवाल त्यांनी केंद्र सरकारला दिला आहे. नीती आयोगानेही हा कायदा रद्द करण्याची शिफारस केली आहे. केंद्र सरकारने कृषी धोरण ठरविण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्च अधिकार समिती नेमली होती. या समितीच्या बैठकीत हा कायदा रद्द करण्याविषयी चर्चा झाली पण त्यात एकमत होऊ शकले नाही. स्वामिनाथन आयोगाच्या अहवालात शेतकरीविरोधी कायद्यांबद्दल एकही अक्षर लिहिलेले नाही. या कायद्याबाबत आपण काही महत्वाच्या गोष्टी जाणून घेऊ या.

या कायद्याचे नाव जीवनावश्यक वस्तू कायदा असे नसून आवश्यक वस्तू कायदा असे आहे. इंग्रजीत इसेन्शियल कमोडीटीज एक्ट म्हणतात. इसेन्शियल म्हणजे आवश्यक. जीवनावश्यक नव्हे. भल्या भल्यांनी नावातली चूक केल्यामुळे हा खुलासा करणे आवश्यक आहे.

### जन्माची कथा

१९४५ साली दुसरे महायुद्ध झाले. त्यात ब्रिटन सरकार आघाडीवर होते. सैन्याला अन्नाची कमतरता पडू नये म्हणून त्यांनी १९४६ साली एक अध्यादेश काढला. भारत त्या वेळेस ब्रिटिश सरकारची वसाहत होते. म्हणून तो अध्यादेश भारतावर लागू झाला. पुढच्याच वर्षी १९४७ साली ब्रिटीश सरकार भारत सोडून निघून गेले. अध्यादेश मात्र कायम राहिला. तत्कालीन अन्नमंत्री रफी अहमद किदवाई यांनी हा अध्यादेश रद्द करण्यास तत्कालीन प्रधानमंत्री पंडित नेहरू यांना सुचविले. परंतु नेहरू यांनी त्यास नकार दिल्यामुळे तो अध्यादेश कायम राहिला.

१९५४ साली २४ ऑक्टोबरला रफी अहमद किदवाई यांचे निधन झाले. १९५५ च्या फेब्रुवारी महिन्यात एक महत्वाची संविधान दुरुस्ती करण्यात आली. आपल्या संविधानानुसार राज्य, केंद्र आणि सामायिक असे कामाचे वाटप केले आहे. कोणत्या विषयावरील कायदे कोणते सरकार बनवू शकते, हे या याद्यांनुसार निर्धारित झाले आहे. तीनही याद्या परिशिष्ट ७ मधे दिल्या आहेत. शेती हा विषय राज्याकडे देण्यात आला आहे. तत्कालीन नेहरू सरकारने सामायिक यादीतील एक कलम (क्रमांक ३३) काढून त्याठिकाणी पूर्ण नवा मजकूर टाकला. या बाबतची नोंद पुढील प्रमाणे करण्यात आली आहे.

२० सप्टेंबर १९५४ रोजी भारतीय प्रजासत्ताकाच्या पाचव्या वर्षी संसदेने खालीलप्रमाणे घटनादुरुस्ती केली.

सातव्या अनुसूचीतील सुधारणा- संविधानाच्या सातव्या अनुसूचीमध्ये, यादी क्रमांक ३ मधील नोंद क्रमांक ३३ साठी खालील नोंद बदलण्यात येईल, म्हणजे:-

३३) व्यापार आणि वाणिज्य, आणि उत्पादन, पुरवठा आणि वितरण, -

(अ) कोणत्याही उद्योगाची उत्पादने जिथे संघराज्याचे अशा उद्योगाचे नियंत्रण संसदेने कायद्याने सार्वजनिक हितासाठी योग्य असल्याचे घोषित केले आहे, आणि अशा उत्पादनांसारख्याच प्रकारच्या आयात केलेल्या वस्तू;

(ब) खाद्यपदार्थ, ज्यामध्ये खाद्य तेलबिया आणि तेले यांचा समावेश आहे;

(क) गुरांचा चारा, ज्यामध्ये तेलपेक आणि इतर सांद्र पदार्थांचा समावेश आहे;

(ड) कच्चा कापूस, मग तो जिन केलेला असो किंवा न केलेला, आणि कापसाचे बियाणे; आणि

(इ) कच्चा ताग.

असा नवा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

### प्रस्ताव आणि कायदा

संविधान (तिसरी सुधारणा) कायदा, १९५४ चे विधेयक ६ सप्टेंबर १९५४ रोजी लोकसभेत संविधान (तिसरी सुधारणा) विधेयक, १९५४ (१९५४ चे विधेयक क्रमांक ४०) म्हणून सादर करण्यात आले. ते तत्कालीन वाणिज्य आणि उद्योग मंत्री टी. टी. कृष्णम्माचारी यांनी सादर केले. हे विधेयक संविधानाच्या सातव्या अनुसूचीचा विचार करीत होते.

यादी तीन (समवर्ती सूची) च्या मूळ नोंदी ३३ ऐवजी नवीन नोंद समाविष्ट करत होते . समवर्ती यादीतील नोंद ३३ मुळे संसदेला संघराज्याच्या नियंत्रणा खाली घोषित केलेल्या उद्योगांबाबत कायदे करण्याची परवानगी मिळाली. याव्यतिरिक्त, कलम ३६९ द्वारे संसदेला पाच वर्षांच्या कालावधीसाठी काही विशिष्ट आवश्यक वस्तूंबाबत कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला होता. कलम ३६९ रद्द झाल्यानंतर या काही आवश्यक वस्तूंचे उत्पादन, पुरवठा आणि वितरण नियंत्रित करणे योग्य मानले गेले नाही. विधेयकानुसार समवर्ती यादीतील नोंद ३३ वाढवण्याचा प्रयत्न करते. असे टीटी कृष्णम्माचारी यांनी स्पष्ट केले होते.

राज्यांनी मंजुरी दिल्यानंतर या विधेयकाला २२ फेब्रुवारी १९५५ रोजी तत्कालीन राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांची संमती मिळाली. ते भारताच्या राजपत्रात अधिसूचित करण्यात आले आणि त्याच तारखेपासून ते अंमलात आले. या नव्या मजकुरानुसार केंद्र सरकारला काही वस्तूंच्या नियंत्रणाबाबत अधिकार मिळाला. सुरुवातीला काही खनिजे, जनावरांचा चारा आणि काही शेती उत्पादने (कापूस, जूट, रबर) यंचा समावेश केला होता. ही घटनादुरुस्ती होऊन दोन महिन्याचाही काळ लोटला नाही की, सरकारने त्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर केले. अशा प्रकारे एप्रिल १९५५ला 'आवश्यक वस्तूंचा कायदा' अस्तित्वात आला.

### कायद्याचा हेतू फसवा

या कायद्याचे नाव 'आवश्यक वस्तूंचा कायदा- १९५५' असे आहे. सरकारकडून सांगण्यात आलेला उद्देश्य (जो कायदा करताना लिहावा लागतो) पुढील प्रमाणे कायद्यात लिहिलेला आहे.

'कोणत्याही वस्तूचे उत्पादन, पुरवठा, वितरण, किंमत आणि व्यापार यांना प्रतिबंध करणे किंवा प्रतिबंध करण्याचा अधिकार सरकारला देणे, हा या कायद्याचा उद्देश्य आहे. त्यासाठी वस्तूंचा पुरवठा कायम राखणे किंवा वाढविणे, संबंधित उत्पादनांच्या उचित किंमतींनुसार समान वितरण आणि उपलब्धता करणे, आणि भारताच्या सुरक्षेसाठी आवश्यक वस्तु उपलब्ध राहील याची व्यवस्था करणे व लष्कराला त्याच्या कामात अडथळा येणार नाही याची काळजी घेणे.'

या उद्देश्यातच सरकारचा कुटील हेतू स्पषट होतो. पहिल्या भागात सरकारने बाजारपेठेवर पूर्ण कब्जा मिळवला, नंतर लष्कराचे नाव लिहिले. सैनिक कोण? शेतकऱ्यांची मुले. किसानपुत्रच ना. ही भावनिक जोड देण्यात आली. प्रत्यक्षात या कायद्याचा लाभ सरकारी नोकर, पुढारी आणि दलालांनाच झाला.

### वर्गवारी सुद्धा शेतकरी विरोधी

आवश्यक वस्तूंची यादी दोन हजारांपेक्षा जास्त आहे. येथे आपण त्यांना वेगवेगळ्या कोणत्या तेरा वर्गात समाविष्ट केले आहे ते पाहू.

१) ऑईल केक आणि इतर सर्व पशुखाद्य

२) कोक, कोळसा व कोळश्यापासून निर्मित अन्य उत्पादने,

३) ऑटोमोबाइलची उपकरणे व त्यांचे घटक भाग, विद्युत उपकरणे.

४) कापूस आणि ऊलनची वस्त्र.

५) खाद्यपदार्थ, खाद्य तेले, तेल बियाणे.

६) लोखंड आणि स्टील, लोह आणि स्टील द्वारा उत्पादित उत्पादने.

७) न्यूजप्रिंट, पेपरबोर्ड आणि स्ट्रॉबोर्डसह कागद,

८) पेट्रोलियम आणि पेट्रोलियमजन्य उत्पादने

९) कच्चा कापूस, जिनिंग केलेला व न केलेला, कापूस बियाणे.

१०) कच्चे जूट, ज्यूटचे कापड. जूटचे बियाणे.

११) खते, रासायनिक, सेंद्रीय किंवा मिश्रित खते.

१२) खाद्यान्न पिकांचे बियाणे आणि फळे व भाज्यांचे बियाणे.

१३) गुरेढोरे, चारा बियाणे.

तेरा पैकी आठ वर्ग हे थेट शेतीचे आहेत. पेट्रोल डिझेल आणि इलेक्ट्रीकलचा अप्रत्यक्ष संबंध शेतीशी येतोच. ही वर्गवारी पाहून कोणीही सांगू शकेल की हा कायदा केवळ शेतकऱ्यांना नियंत्रित करण्यासाठी बनवला गेला आहे.

### अनुसूची-९ मध्ये समाविष्ट

१९७६ साली काँग्रेसच्या इंदिरा गांधी सरकारने एक घटना दुरुस्ती करून हा कायदा अनुसूची ९ मध्ये समाविष्ट केला. त्या वेळी टीटी कृष्णामाचारी हे अन्नमंत्री होते.

अनुसूची नऊ मध्ये हा कायदा टाकणे म्हणजे या कायद्याच्या विरोधात कोणालाही मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे म्हणून न्यायालयात दाद मागता येत नाही.

१९४८ चा नेहरू कालीन अन्नमंत्री हे निर्बंध नको म्हणत होता, १९७६ सालच्या अन्नमंत्र्याने हा कायदाच अशा ठिकाणी पोचवला की त्या विरोधात कोर्टात सुद्धा जाता येणार नाही.

### आय आर कोईल्हो निवाडा

केंद्र सरकार विरुद्ध तामिळनाडूउ सरकार या खटल्यात २००७ साली सर्वोच्च न्यायालया समोर असा प्रश्न उपस्थित झाला-- जर एखादा कायदा ९व्या अनुसूचीत टाकला गेला असेल,

आणि तो १९७३ नंतर टाकला असेल, तर त्याला न्यायालयीन पुनरावलोकनापासून पूर्ण संरक्षण मिळते का?

१९७३ साली केशवानंद भारती प्रकरणात पहिल्यांदा संविधानाची मूळ संरचना (बेसिक स्ट्रक्चर) हा मुद्दा आला होता. त्या वेळी अकरा न्यायाधीशांचे पीठ बसले होते. त्यांनी सरकार बेसिक स्ट्रक्चरला हात लावू शकता नाही, असे स्पष्ट म्हटले होते. पण त्यांनी परिशिष्ट ९ व त्यासाठी केलेल्या घटना दुरुस्त्या कायम ठेवल्या होत्या. केशवानंद भारती खटल्याचा निकाल २४ एप्रिल १९७४ला लागला होता.

२००७ साली निकाल लागलेल्या आय आर कोईल्हो या नावाने प्रसिद्ध झालेल्या खटल्यात म्हटले आहे की,

All amendments to the Constitution made on or after 24th April 1973 by which the Ninth Schedule is amended by inclusion of various laws therein shall be tested on the touchstone of the basic or essential features of the Constitution.'

— I.R. Coelho, (para 149)

म्हणजे

१९७३ नंतर ९व्या अनुसूचीत जे काही टाकले आहे त्यांना बेसिक स्ट्रक्चर परीक्षा पास करावी लागेल.

आवश्यक वस्तू कायदा १९५५ला लागू झाला. तो १९७६ सालीअनुसूची ९ मध्ये घातला गेला. २४ एप्रिल १९७३ च्या संदर्भात कायदा आधीचा व टाकला नंतर. अनुसूची ९ साठी केलेल्या घटना दुरुस्तीत कायदा कधीही टाको, ते पूर्वलक्षी प्रभावाने कायदा लागू झाला त्या दिवसापासून तो अनुसूचित ९ मध्ये आहे, असे मानले जाईल असे स्पष्ट म्हटले आहे. त्या बाबत या निवाड्यात आय आर कोईल्हो यांनी पुढील प्रमाणे स्पष्ट केले आहे.

A subsequent inclusion in the Ninth Schedule, even with retrospective effect, cannot obliterate the effect of judicial review under Article 32 or 226 if the law violates the basic structure.'

— I.R. Coelho, (para 107)

सोप्या भाषेत- कायदा मागील तारखेला लागू केला तरी,

न्यायालय त्याची संविधानाशी सुसंगतता तपासू शकते.

२००७ साली आवश्यक वस्तू कायद्याच्या संदर्भात न्यायालयात आव्हान करण्याची मुभा मिळालेली आहे. पण त्या विरोधात कोणी याचिका दाखल केल्याचे ऐकिवात नाही, शिवाय न्यायालयानेही सू-मोटो काही केलेले नाही.

### मोदी सरकारनेही केली दिशाभूल

२०२० साली करोनाची साथ पसरली होती. सरकारने लॉक-डाऊन केले होते. उत्पादन ठप्प झाले होते. तिजोरीत खळखळाट होता. संकट आले की सरकारला शेतकरी आठवतो. १९९० साली अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. तेंव्हा खुलीकरण आले होते. यंदा सरकारने बिचकत बिचकत तीन कृषी कायदे आणले. या कायद्याना ना आर. एस. एस.चे समर्थन होते, ना बीजेपीच्या खासदारांचे. ही मंडळी पूर्वीपासून शेतकरी स्वातंत्र्याच्या विरोधात राहिली आहे. उत्तर प्रदेशच्या निवडणुका येताच पूर्ण बहुमत असलेल्या मोदींच्या भाजप सरकारने हे तीनही कायदे मागे घेतले होते.

अटल बिहारी वाजपायी यांच्या कार्यकाळातही आवश्यक वस्तू कायद्याच्या यादीतून शेतमाल वगळला होता. पण तो पुन्हा टाकता येणार नाही अशी व्यवस्था न केल्यामुळे तो पुन्हा टाकण्यात आला.

आवश्यक वस्तू कायद्यात दोन हजाराहून अधिक वस्तू आहेत. त्यापैकी अनेकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संबंध येतो. त्या वस्तूंवर निर्बंध ठेवून फक्त शेतीमाल वगळणे पुरेसे ठरणार नाही. या महत्वाच्या बाबीकडे मोदी सरकारने दुर्लक्ष केले होते.

मोदी सरकारने आणलेल्या तीन कायद्यातील तिसरा कायदा आवश्यक वस्तू कायद्याच्या दुरुस्तीचा होता. आवश्यक वस्तू कायद्यातून शेतमाल काही अटींवर वगळण्यात आले होते. अर्थात सगळे शेतमाल नव्हे. या कायद्यात आवश्यक वस्तूंच्या यादीत 'बियाणे' कायम ठेवले होते. त्यामुळेच जी.एम. (जेनेटिकल मॉडीफाईड) बियाण्यांवर सरकार निर्बंध आणू शकते. याचा अर्थ आधुनिक तंत्रज्ञानाच्या स्वातंत्र्यापासून शेतकऱ्यांना वंचित ठेवण्याची तरतूद कायम ठेवली होती. कापसालाही मोकळीक नव्हती.

भाजपा सरकारच्या अध्यादेशानुसार नैसर्गिक आपत्ती आली किंवा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली की, सरकार पुन्हा निर्बंध लादू शकते, अशी तरतूद करण्यात आली होती. आता एवढ्या मोठ्या देशात कोठे ना कोठे नैसर्गिक आपत्ती येणारच. युद्धजन्य परिस्थिती म्हणजे काय? चीन किंवा पाकिस्तानच्या सरहद्दीवर कायम तणाव असतोच की. तिसरी आणि जास्त भयंकर अट अशी होती की, विशिष्ट पिकांचे भाव दुप्पट किंवा दीडपट झाल्यास सरकार पुन्हा पीक-दर-नियंत्रण करू शकते. कांदा आज १० रुपये किलोने विकला जात आहे. उद्या तो पंधरा किंवा वीस रुपये किलो झाला की लगेच सरकार आवश्यक वस्तू कायद्याच्या तलवारीने वार करणार असेल तर तुमच्या या कायद्याचा काय उपयोग? एकंदरीत मोदी सरकारने देखील सुधारणेच्या नावाखाली मखलाशी केली होती.

एकंदरीत हा कायदा केंद्र सरकारने शेतीमालाच्या बाजारावर आपले वर्चस्व राहावे यासाठी आणला. तोच कायदा विरोधी पक्षवालेही अत्यंत क्रूरपणे वापरीत आहेत. हा कायदा शेतकऱ्यांचा गळफास ठरला आहे.



**अमर हबीब,**
अंबाजोगाई,
किसानपुत्र आंदोलन,
मो. ८४११९०९९०९

## यू डायस प्लसच्या अंमलबजावणीबाबत

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकताच यू डायस प्लस हा २०२४ - २५ साठीचा अहवाल प्रसिद्ध केला. त्यात देशातील शाळा, शाळांमधील सुविधा, विद्यार्थी संख्या, शिक्षकांची संख्या, शिक्षक विद्यार्थी यांच्या गुणोत्तर प्रमाणाची सविस्तर आकडेवारी दिली आहे. राज्यातील १०८,२५० शाळांबाबतचा तपशील त्या अहवालात दिला आहे. राज्यातील ५५०० शाळा अनेक सुविधांपासून अंधारात चाचपडत आहेत असे वृत्त आहे. ३०,००० शाळांमध्ये अजूनही इंटरनेटची सुविधा उपलब्ध नाही. २५,००० शाळांमध्ये संगणक नाहीत. ५५६७ शाळांमध्ये अद्याप वीज पुरवठा सुरू झालेला नाही अशा परिस्थितीत सरकारने डिजिटल इंडियाचे उद्दिष्ट्य प्राप्त करण्याचे अपेक्षित केले आहे. यामुळेच शाळांचा शैक्षणिक दर्जा, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढणार तरी कशी असे प्रश्न निर्माण होत आहेत. काही शाळांमध्ये रॅम आहेत तर १९,९६३ शाळांमध्ये रॅम आणि जिन्यांना कठडे नाहीत. ४०,५८२ शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सोयींसाठी स्वच्छतागृहे नाहीत. स्वच्छतागृहांची सोय विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या प्रमाणात अपुरी आहेत. सुधारित शालेय वातावरणानुसार डिजिटल ग्रंथालये, शालेय खेळांसाठी क्रीडांगणे, सौर पॅनेल्स यांसारख्या सुविधा पुरविणे आवश्यक असते त्याचवेळी प्रत्येक शाळांमध्ये उपलब्ध केल्या गेल्या आहेत का नाही याचा ठराविक काळाने जबाबदार अधिकाऱ्यांनी तपास घेण्याची गरज असते. कारण सरकारकडून अपेक्षित असलेल्या सुधारणांवर सरकारचाच दबाव असल्याशिवाय अपेक्षापूर्ती होणे शक्य होत नाही. नियमन केले जातात त्याचे पालन केल्याशिवाय शिक्षणाची पूर्तता, सुधारणांच्या दर्जाची प्रगती होत नाही, परिणामी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची वाढ अपेक्षेप्रमाणे होत नाही. म्हणूनच सध्याच्या नियमांवर अंमलबजावणीचा वचक असावा असे वाटते.

**स्नेहा राज**

सवाद

## शनिवार वाडा नमाज वाद

पुण्यातील ऐतिहासिक शनिवार वाड्यात काही मुस्लीम महिलांनी नमाज अदा केल्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर मोठा वाद उफाळून आला आहे. ही वास्तू केंद्र सरकारच्या पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालये संचालनालयाच्या अखत्यारीत येत असल्याने येथे कोणत्याही धार्मिक विधीला परवानगी नाही. असे असतानाही नमाज पठण करणे हा नियमभंग आहे आणि म्हणूनच ही कृती आक्षेपार्ह ठरते.या घटनेवर खासदार मेधा कुलकर्णी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे आणि त्यांची भूमिका उचित आणि योग्य आहे. कारण, पुरातत्त्व विभागाने संरक्षित केलेल्या ठिकाणी नियम मोडणे आणि दुसऱ्या समाजाच्या भावनांना ठेच पोहोचेल असे कृत्य करणे हे गैरलागू आहे.या घटनेच्या विरोधात पुण्यात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्यात या गंभीर विषयावर खर तर एकमताने सर्व विरोधी पक्षांनी निषेध व्यक्त करणे अपेक्षित असताना, मताचे राजकारण आडवे आले आणि राष्ट्रवादीच्या प्रवक्त्यांनी अजित पवार गट वेगळी भूमिका घेत त्यांनी मेधा कुलकर्णींच्या आंदोलनावर टीका केली आहे.

**अविनाश देशपांडे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# फटाक्यांनी उजळली बाजारपेठ..!

## मात्र महागाईने ग्राहकांचा खिशावर महागाईचे सावट कायम

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - धनत्रयोदशी पासून सुरू झालेल्या पाच दिवसांच्या दीपोत्सवात यवतमाळ शहरातील बाजारपेठ फटाक्यांच्या झगमगाटाने उजळली असली, तरी महागाईचे सावट मात्र यंदाही नागरिकांच्या खिशावर पडले आहे. शहरातील आझाद मैदान परिसरात विविध प्रकारचे आकर्षक फटाके विक्रीसाठी सज्ज झाले आहेत. परंतु, मागील वर्षाच्या तुलनेत फटाक्यांच्या दरात तब्बल २५ ते ४० टक्क्यांनी वाढ झाल्याने ग्राहकांनी खरेदीकडे थोडीशी पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे.

दिवाळीचा उत्सव जवळ आल्याने शहरातील नोकरदार व व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात बाजारात खरेदीसाठी गर्दी करताना दिसत आहे. कापड, मिठाई, सजावटीच्या वस्तूंबरोबरच फटाक्यांच्या खरेदीलाही सुरुवात झाली आहे. मात्र, अतिवृष्टीमुळे आर्थिक फटका बसलेल्या ग्रामीण भागातील ग्राहक मात्र या गर्दीत दिसेनासे झाले आहेत. त्यामुळे, "दिवाळी शहराचीच की काय?" असा प्रश्न व्यापाऱ्यांतून उपस्थित केला जात आहे. फटाक्यांची दुकाने सज्ज, पण उलाढाल कमी होण्याची शक्यता यवतमाळच्या आझाद मैदानात ५० हून अधिक फटाक्यांची दुकाने थाटली असून, यंदाही फॅन्सी फटाक्यांच्या नवीन प्रकारांनी बाजारपेठ रंगली आहे. हेलिकॉप्टर, ड्रोन, 'मिया-बीबी झगडा', डिस्को व्हील, स्काय शॉट, सप्तरंगी अनार, आकाशदिवे, मटका झाड अशा नाविन्यपूर्ण फटाक्यांमुळे मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्याच डोळ्यांत चमक दिसून येत आहे. मात्र, मागील वर्षीची चार ते पाच कोटी रुपयांची उलाढाल यावेळी किंचित घटण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.तामिळनाडूतील प्रसिद्ध शिवकाशी येथील फटाके यवतमाळात मोठ्या प्रमाणावर मागविण्यात आले आहेत. फॅन्सी फटाक्यांच्या किमती ५० रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंत असून, ग्राहक आकर्षक डिझाईन व रंगीत प्रकाशामुळे या फटाक्यांकडे अधिक आकर्षित होत आहेत. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून दहा दिवसांपूर्वीच दुकाने थाटण्यात आली असून, विक्रेत्यांकडून सुरक्षा नियमांचे पालन करण्याबाबत विशेष दक्षता घेतली जात आहे. किराणा मालापासून कपड्यांपर्यंत सर्व वस्तूंच्या किमतीत २५ ते ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. केंद्र सरकारने जरी काही वस्तूंवरील जीएसटी कमी केल्याचे सांगितले असले, तरी त्याचा परिणाम बाजारभावांवर दिसून आलेला नाही. तरीही, "दर वाढले तरी दिवाळी साजरी करायलाच हवी; फटाके उडवायलाच हवेत," अशी परंपरा कायम ठेवत नागरिक आनंदाने तयारीत व्यस्त आहेत. २१ ऑक्टोबरला लक्ष्मीपूजन असल्याने नागरिकांनी आत्तापासूनच फटाक्यांसोबतच नवीन कपड्यांच्या खरेदीकडेही कल वाढविला आहे. व्यापाऱ्यांना अपेक्षा आहे की, शेवटच्या दोन दिवसांत खरेदीचा जोर वाढल्यास दिवाळीपूर्व उलाढालीतील घट थोडी भरून निघेल.

# दिवाळीच्या पूर्वसंध्येला शेतकऱ्याचा मृत्यू..!

## शासनाच्या निष्क्रियतेचा बळी ठरला नितीन चव्हाण



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - दिवाळीच्या पूर्वसंध्येला संपूर्ण राज्य उत्सवाच्या तयारीत असताना, यवतमाळ जिल्ह्यात मात्र एका शेतकऱ्याने निराशेच्या काळोखात आत्महत्या करून आपल्या जीवाचा अंत केला. लोहि (ता. दारव्हा) येथील प्रगतीशील शेतकरी व शिंदे गटाचे खंदे समर्थक नितीन चव्हाण (वय अंदाजे ४५) यांनी अतिवृष्टी, अपुऱ्या सरकारी मदतीमुळे आणि घरात दिवाळी साजरी करण्यासही पैसा नसल्याने शेवटचा श्वास आपल्या पंचनामा न झालेल्या शेतात घेतला.

मिळालेल्या माहितीनुसार, नितीन चव्हाण हे पालकमंत्री संजय राठोड यांचे दूरचे नातलग असल्याची चर्चाही गावात पसरली आहे. देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे यांनी घोषित केलेल्या ३२ हजार कोटींच्या मदतीतील साधी दमडी सुद्धा या शेतकऱ्याला मिळाली नाही, हे सत्य अधिकच कटू आहे. अतिवृष्टीमुळे कापूस, सोयाबीन आणि तूर या पिकांचे संपूर्ण नुकसान झाले. घरात अन्न नव्हते, दिवाळीला गोडधोड तर दूरच राहिले, त्यामुळे मानसिक तणावाखाली त्यांनी आत्महत्या केली. दसऱ्यापासून आजवर पश्चिम विदर्भातील १२३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची सरकारी आकडेवारी सांगते. शासनाने जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि पटवारी यांनी प्रत्येक आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी भेट देण्याचा आदेश दिलेला असतानाही यवतमाळ प्रशासनाने या घटनेला नेहमीप्रमाणेच मुकाटपणे दुर्लक्षित केले. शेतकरी चळवळीचे नेते किशोर तिवारी यांनी या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया देत सांगितले की "नितीन चव्हाण हे राजकीय पाठबळ असलेले कार्यकर्ते होते. जर त्यांच्याही दारात पटवारी पोहोचला नाही, तर सामान्य शेतकऱ्याची काय अवस्था असेल याची कल्पनाही नको! शासन आणि प्रशासन शेतकऱ्यांच्या मृत्यूकडे डोळेझाक करत आहे." राज्यात सुमारे ७० लाख शेतकरी कुटुंबे ओल्या दुष्काळाने उपाशी आहेत, असेही तिवारी यांनी सांगितले. तरीही सत्ताधारी नेते, अधिकारी आणि कर्मचारी "टाळूवरील लोणी" चाखण्यात व्यस्त आहेत. राज्य शासनाच्या निष्क्रियतेवर आता सामान्य नागरिक आणि शेतकरी संघटनाही संतप्त आहेत. एकीकडे सरकार "मदतीचे फोटोसेशन" करताना दिसते, तर दुसरीकडे ग्रामीण भागात दररोज शेतकऱ्यांची दिवाळी काळोखात बुडते. विरोधक देखील गप्प आहेत; त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक या दोघांच्या "मूक संगनमताचा" भोग सामान्य शेतकरी भोगत आहे. आज देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात संवेदनशीलता हरवली आहे. दारू माफिया आणि मटका किंग सरकारच्या छत्राखाली सुखाने जगत आहेत, तर शेतकरी ज्यांच्या श्रमावर हे राज्य उभे आहे, ते मात्र रोज मृत्यूकडे ढकलले जात आहेत. दिवाळीच्या या प्रकाशात शेतकऱ्यांच्या घरात अंधारच आहे, आणि तो अंधार शासनाच्या निष्क्रियतेचा आणि असंवेदनशीलतेचा आहे.

# बाजारपेठा ओस पडल्या, दिवाळीचा उत्साह हरवला

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - या वर्षी अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित अक्षरशः उध्वस्त केले आहे. जिल्ह्यातील बहुसंख्य भागात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या घरात ना कापूस आला, ना सोयाबीन, तर काही ठिकाणी मातीसकट पिके वाहून गेली आहेत. परिणामी, ग्रामीण अर्थव्यवस्था ठप्प झाली असून दिवाळीचा सणही यंदा अंधारात गेला आहे.

ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पिकांचे नुकसान झाले. काही ठिकाणी कापसाची झाडे उरली असली, तरी लाल्या रोग, कीड व कुज यामुळे उत्पादन जवळपास शून्यावर आले आहे. शेतात काम नसल्याने मजुरवर्गाच्याही हाताला काम नाही. त्यामुळे शेतकरी आणि शेतमजूर दोघेही आर्थिक संकटात सापडले आहेत. दररोजच्या मजुरीवर जगणाऱ्यांच्या हातात काम नसल्याने त्यांची दिवाळीही उदास गेली. काही मजूर रोजगाराच्या शोधात शहरांकडे निघाले असून, अनेकजण गावातच बेरोजगार बसले आहेत. या संकटामुळे ग्रामीण भागात निराशेचे वातावरण आहे. या आर्थिक अडचणीचा परिणाम आता शहरातील बाजारपेठांवरही दिसू लागला आहे. यवतमाळ शहरासह जिल्ह्यातील तालुकासह आदी बाजारपेठांमध्ये दिवाळीच्या खरेदीचा उत्साह पूर्णपणे ओसरला आहे. एकेकाळी गर्दीने फुलणाऱ्या बाजारात यंदा शुकशुकाट आहे. मिठाई, कपडे, सजावटीच्या वस्तू विक्रीसाठी दुकानदार तयार असूनही ग्राहकच नसल्याने व्यापार ठप्प झाला आहे. एका व्यापाऱ्याने सांगितले, "दरवर्षी या काळात दुकानात ग्राहकांची पावले थांबतच नाहीत, पण यंदा दिवाळीच्या आठवड्यातही एकाही ग्राहकाने खरेदीसाठी विचारले नाही." शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीची अपेक्षा होती, मात्र पंचनामे झाल्यानंतरही मदतीचा एकही रुपया त्यांच्या खात्यात जमा झालेला नाही, अशी नाराजी शेतकरी व्यक्त करत आहेत. ग्रामीण भागातील अर्थचक्र शेतीवरच अवलंबून असल्याने शेतकऱ्यांच्या हातात पैसा न आल्यामुळे बाजारपेठा ठप्प झाल्या आहेत. दिवाळीचा प्रकाश खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचलेला नाही; सर्वत्र चिंता, ओढाताण आणि नैराश्याचे वातावरण पसरले आहे.

# २ महिन्यांपासून वीज पुरवठा खंडित!

## शेतक-यांच्या पीकांचे प्रचंड नुकसान

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - तालुक्यातील कासार बेहळ सेवा नगर वरोडी परिसरातील नदीकाच्या गावांमध्ये महापुरामुळे सेवानगर येथील दोन महीन्यापूर्वी विजेचे खांब वाकले परिणामी शेतातील विज पुरवठा पूर्ण पणे खंडित झाला आहे. आज दोन महीने उलटुनही अद्याप विज पुरवठा सुरळीत करण्यात आलेला नाही. यामुळे शेतकऱ्यांचा रबी हंगामातील पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. विज पुरवठा बंद असल्याने शेतकऱ्यांना शेतातील ऊस तुर कापुस व हळद या पीकांना पाणी देणे शक्य झाले नाहीं. त्यामुळे पीके वाळत आहेत शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. त्यातच यंदाचा खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला असुन आता शेतकऱ्यांची भिस्त रबी हंगामावर आवलबुन आहे. अतिवृष्टिमूळे खरीप हंगामात शेतकऱ्यांनी पेरणी केलेला खर्चही वसूल झाला नाही आशा कठिन परिस्थितित आता विजेचे संकट उभे राहील्याने शेतकऱ्यांचीआर्थिक आडचण अधिकच वाढली आहे. शेतकऱ्यांनी वारंवार विज वितरण विभागाकडे तक्रार दाखल करूंनहीं कोणतीही ठोस कारवाई झालेली नाहीं विज विभागाकडुन केवळ आश्वासन दिले जात असुन प्रत्यक्षात दुरुस्तीचे काम सुरु झाले नाही विज विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे आज शेतकऱ्याचे पुढील संकट वाढलेआहे विज वितरण प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने उपाय योजना करूंन विजेचे खांब उभारूंन विज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी शेतकऱ्याकडुन होत आहे.

# ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आक्रोश मतपेटीतून दिसेल दिलीप एडतकर

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - ग्रामीण भागात शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय हालाखीची आहे. महागाईने जनता पिचलेली आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त भागात शेतकऱ्यांवर काळी दिवाळी साजरी करण्याचा प्रसंग उद्भवला आहे. अशा स्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहे. यात ग्रामीण भागातील आक्रोश मतपेटीतून नक्की दिसून येईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस तसेच पुसद विधानसभा मतदार संघातील स्थानिक स्वराज्य निवडणुकांचे निरीक्षक दिलीप एडतकर यांनी केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक संदर्भात काँग्रेस पक्ष कार्यकर्त्यांची बैठक पुसद येथे रविवार ता.१९ रोजी पार पडली. बैठकीनंतर त्यांनी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस डॉ. मोहम्मद नदीम यांच्या कार्यालयात बोलावलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आगामी निवडणुकीच्या संदर्भात या बैठकीत कार्यकर्त्यांशी विचार विमर्श करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पुसद विधानसभा मतदारसंघातील सध्याची परिस्थिती विचित्र असल्याचे ते म्हणाले. ज्यांनी काँग्रेस पक्षाच्या भरवशावर सत्ता उपभोगली. त्यांच्या वारस लोकांनी संघाच्या पँटी घातल्या आहेत. सत्तेसाठी प्रस्थापित व्याकुळ झाले आहे. पुसद मध्ये नवरा मंत्री व दरबार मात्र बायको घेते, या शब्दात त्यांनी बोचरी टीका केली. शहरातील नागरिक त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिकेतील राजकारण ढवळून निघेल, असे एडतकर यांनी सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाविकास आघाडीची 'कुठे युती, कुठे भीती' अशा परिस्थितीत स्वबळावर तर समन्वय साधून प्रयत्न करण्यात येतील. या निवडणुकांसाठी प्रत्यक्षात आघाडी झालेली नाही. परिस्थिती पाहून नेतृत्व निर्णय घेतील. मात्र आघाडीत ओढाताण राहणार नाही. महाविकास आघाडीची सत्ता येईल, असा विश्वास त्यांनी शेवटी व्यक्त केला. पुसद नगरपालिकेत नगराध्यक्ष सह सर्वच जागांवर काँग्रेस पक्ष लढत देईल.

# शासकीय व खाजगी रुग्णालयांत रुग्णांची गर्दी

## सर्दी, खोकला, ताप, श्वास घेण्यास त्रास असलेल्या रुग्णांची वाढ : वातावरणातील बदल प्रमुख कारण

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - गेल्या काही दिवसांपासून यवतमाळ शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात व्हायरल इन्फेक्शनचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढला असून, सर्दी, खोकला, ताप आणि श्वास घेण्यास त्रास या तक्रारींनी रुग्णालयांमध्ये गर्दी वाढली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून ते शासकीय वैद्यकीय महाविद्यालयापर्यंत सर्वत्र रुग्णांची संख्या दुपटीने वाढलेली दिसून येत आहे.

डॉक्टरांच्या माहितीनुसार, काही रुग्णांना औषधोपचार करूनही खोकल्यात आराम होत नसल्याने त्यांना पुढील तपासणीसाठी वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात येत आहे. शहरातील तसेच ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना ताप तीन ते पाच दिवस टिकतो, तर काहींना सात दिवसांपर्यंत ताप कायम राहतो. तथापि, योग्य उपचार घेतल्यास हा ताप नियंत्रणात येतो, असे वैद्यकीय अधिकारी सांगतात. वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. अरविंद कुडमेथे यांनी सांगितले की अशा प्रकारचे आजार हे वातावरणातील बदलामुळे वाढतात. लहान मुलांमध्ये सुद्धा सर्दी-खोकल्याचे प्रमाण वाढलेले आहे. सध्या दररोज २०० ते ३०० रुग्ण वैद्यकीय महाविद्यालयात तपासणीसाठी येत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा खाजगी डॉक्टरांकडे उपचारानंतर लक्षणे नियंत्रित होत नसतील, तर त्वरित वैद्यकीय महाविद्यालयात तपासणी करावी. डॉ. कुडमेथे यांनी पुढे सांगितले की, रुग्णांच्या मल, मूत्र, रक्त व थुंकीच्या तपासण्या तसेच छातीचा एक्स-रे, सोनोग्राफी आदी सर्व तपासण्या मोफत करण्यात येतात. त्यामुळे नागरिकांनी याचा लाभ घ्यावा. मेडिकल दुकानातून मनमानी औषधे घेऊन उपचार करण्यात विलंब करू नये, तर थेट डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही त्यांनी आवाहन केले. दरम्यान, दिवाळीचा काळ आणि फटाक्यांचा हंगाम लक्षात घेता, सर्दी, खोकला किंवा श्वास घेण्यास त्रास असलेल्या रुग्णांनी फटाक्यांच्या धुरापासून दूर राहावे, असा सल्ला वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे. दमा किंवा श्वसनासंबंधी आजार असलेल्या रुग्णांनी मास्कचा वापर करावा आणि शक्यतो फटाक्यांच्या धुराचा संपर्क टाळावा, असेही डॉक्टरांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील वातावरणातील अचानक बदल, दिवाळीपूर्वी वाढलेला धूर आणि धूळ, तसेच तापमानातील फरक यामुळे व्हायरल इन्फेक्शनचे प्रमाण वाढलेले दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेऊन स्वच्छता राखावी, पुरेसा विश्रांती घ्यावी आणि गरज भासल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# ठेवीदारांच्या हितासाठी आम्ही कटीबद्ध : शरद मैंद

## पत्रकार परिषदेत केले आवाहन

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - मागील १ महिन्यात पुसद अर्बन कॉ ऑप बँकेच्या ठेवीदारांमध्ये अनामिक भीती चे वातावरण पसरून अनेकांनी आपल्या ठेवी विड्रॉल करणे सुरु केले.मागील ४० वर्षांपासून बँकेच्या सर्व शाखांमध्ये रिजर्व बँकेच्या निकषानुसारच काम सुरु आहेत. त्यामुळे ठेवीदारांनी कोणतीही भीती न बाळगता आजपर्यंत बँकेवर ज्या विश्वासाने ठेवी ठेवल्या तो विश्वास कायम राखावा. बँकेचे संचालक मंडळ, सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी बँकेच्या ठेवीदारांचे हित महत्वाचे असून त्यासाठी सर्व पर्याय खुले ठेवले असल्याचे पुसद अर्बन बँके तर्फे अध्यक्ष शरद मैंद यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

शरद मैंद यांनी बँकेच्या स्थापने पासुन च्या यशस्वी वाटचालीची माहिती देतांना म्हणाले की सर्वसामान्य ठेवीदारांच्या सहकार्याने तसेच सर्वसामान्य कर्जदारांना सहज कर्ज उपलब्ध व्हावे या हेतूने बँकेचे संस्थापक सहकार सूर्य दिवंगत आप्पाजी आसेगावकर,पहिले अध्यक्ष दिवंगत बाबुशेठ हिराणी यांच्या पुढाकाराने व लोकनेते मनोहर नाईक यांच्या प्रमुख मार्गदर्शनात माझे वडिल ॲड.अप्पाराव मैंद यांच्या १२ वर्षांचा अध्यक्ष पदासह माझ्या २३ वर्षांच्या अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात पुसद अर्बन बँकेचे ४० वर्षांपूर्वी (एक-१)शाखेच्या रुपात लावलेल्या रोपट्याचे आज महाराष्ट्रात ३७ शाखांचा वटवृक्षमध्ये रूपांतर झाले.नियमित ग्राहकोपयोगी सेवा, पारदर्शक बँकिंग,गरजु कर्जदारांना पत पुरवठा, ठेवीदारांना वेळेवर व्याज,ग्राहकाभिमुख अधिकारी कर्मचारी, सामाजिक उपक्रम या मुळे सर्वांच्या विश्वासास पात्र ठरलेल्या पुसद अर्बन बँकेचे रिजर्व बँक ऑफ इंडियाकडून नियमित इन्स्पेक्शन होऊन बँक आर.बी.आय.चे मापदंड पाळत आली आहे. त्यानुसार बँकेचा सीआरएआर ११ टक्के पेक्षा जास्त म्हणजे २१. ५७टक्के, सीआरआर ३.५० टक्के,१२८ कोटी रु चा स्वनिधी आहे. बँकेजवळ बुडीत व संशयित कर्ज निधी ३७ कोटी ४१ लाख रु आहे. बँकेने आरबीआय व सहकार खात्याच्या प्रत्येक सूचनांचे वेळोवेळी पालन केले आहे. बँकेतील ५ लाख रु पर्यंतच्या प्रत्येक ठेवीना डीआयसीजिसी अंतर्गत विमा सुरक्षा कवच आहे. बँकेच्या ४२५ कोटी.रु. च्या कर्जा पोटी सुमारे ८०० कोटी रु च्या मालमत्ता गहाण आहेत. त्यामुळे त्यातून वसुली होणार असल्यामुळे ते सर्व कर्ज सुरक्षित आहेत. अश्या प्रकारे साउंड पोझिशन असलेल्या आपल्या पुसद अर्बन बँकेत सर्व काही सुरळीत व सुरक्षित सुरु असतांना अचानक १महिण्यापुर्वी झालेल्या अफवेतुन घाबरलेल्या ठेवीदारांनी आपल्या ठेवी विड्रॉल करणे सुरु केल्याने लिक्विडीटी (रोखतरलता)वर परिणाम झाला आहे.यातून सावरण्यासाठी सर्व ठेवीदारांनी अफ़वावर विश्वास न ठेवता संयम बाळगण्याची गरज असून लवकरच सर्व परिस्थिती सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. स्वतःच्या कोणत्याही मान सन्मान, प्रतिष्ठा व नावासाठी अडून न राहता ठेवीदार,अधिकारी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी आम्ही सर्व संचालक मंडळ कटी बद्ध असून कोणत्याही ठेवीदा्राच्या एक रुपयाला देखील धक्का लागणार नाही याची शास्वती आपण देत आहे. मागील १महिन्यात जिल्ह्यातील व पुसद मधील सर्व प्रसिद्धी माध्यमांनी दिलेल्या अमूल्य सहकार्याबद्दल यावेळी शरद मैंद यांनी विशेष आभार व्यक्त केले.

# 'आमदनी अठ्ठणी, खर्चा रुपया'; सोयाबीन उत्पादक शेतकरी गारद

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : घाटंजी तालुक्यातील जनतेचा मुख्य व्यवसाय शेती असून कोरडवाहू शेतीचे प्रमाण मोठे आहे. यावर्षी खरिपात मुख्य व नगदी पीक म्हणून कपाशी पाठोपाठ सोयाबीनची ६ हजार ३२ हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली होती. मात्र, यावर्षी निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि आलेल्या किडीमुळे सोयाबीन पीक शेतकऱ्यांच्या पदरात पडण्याची शक्यता मावळली आहे. सोयाबीन लागवडीचा खर्च एकरी १० हजार आहे. परंतु उत्पादन केवळ एकरी ३ क्विंटल झाल्याने 'आमदनी अठ्ठणी खर्चा रूपया' असे म्हणण्याचे वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. यावर्षी सततच्या पावसाने खरिपातील सोयाबीन पिकावर कीड-रोग आणि शेंगा न भरल्याने उत्पन्नात मोठी घट झाली आहे. सुरवातीपासून पाऊस टप्प्या-टप्प्यात न पडता एकमोडी स्वरूपात पडल्याने पिकांची वाढ तसेच व्यवस्थापन करता आले नाही. सततच्या पावसामुळे उभे पीक पाण्याखाली गेले. याशिवाय, सोयाबीन पिकाला 'यलो मोॉक' या रोगामुळे पाने पिवळी पडून गळल्याने मोठे नुकसान झाले.

दिवाळीच्या तोंडावर असणारा सुगीचा हंगामातील पीक गेल्याने शेतकऱ्यांचा घास हिरावला गेला असून, शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जात आहे. सोयाबीन बियाणे (३ हजार ५०० ते ४ हजार), पेरणीसाठी बैलजोडीचा रोज (१ हजार २०० ते १ हजार ५००), दोन रासायनिक खतांच्या बॅग (किमान ३ हजार रुपये), कीटकनाशके फवारणी खर्च तसेच काढणी खर्च (मशीनचे प्रति क्विटल १५० रुपये) असा एकरी खर्च दहा हजार रुपयांच्यावर गेला आहे, तर एकरी उत्पन्न केवळ अडीच ते तीन किंवटल मिळत असल्याने शेतकरी पूर्णपणे गारद झाला आहे.

## वेचक

### हफीज बेग उर्दू कॉलेजचे कलगाव येथील मुख्याध्यापक व प्राचार्य सन्मानित



दिग्रस - कलगाव येथील सय्यद जफरुज्जमा सय्यद जकरिया, प्राचार्य, हफीज बॅग उर्दू जुनियर कॉलेज ऑफ आर्ट्स आर्णी व सलीम जावेद शेख युनुस, मुख्याध्यापक, हफीज बेग उर्दू हायस्कूल आर्णी येथे कार्यरत आहे मुळ कलगाव येथील दोन्ही मुख्याध्यापकाना " एकता सेवाभावी संस्था महाराष्ट्र " यांनी आपल्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती चे औचित्य साधून दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी " महात्मा गांधी सेवा गौरव पुरस्कार २०२५ ने सन्मानित केले. आदर्श राष्ट्र निर्मितीसाठी महात्माजींनी सत्य, अहिंसा व प्रेमाच्या आधारे स्वतंत्र भारताची उभारणी करत भारतीय माणसाच्या मनात भयमुक्तीचा विचार रुजविला ज्ञान, ध्यान, पुजा, विवेक, आनंद याला अध्यात्माची जोड देत अखिल मानवी कल्याणाचा मूलमंत्र बापूंनी संपूर्ण जगाला दिला. दोघेही शिक्षक, कवी व समाजात शैक्षणिक कामासाठी ओळखले जातात. युट्युब, व्हाट्सअप ,फेसबुक, तसेच ऑनलाइन, ऑफलाइन कवी संमेलन मध्ये सूत्र संचालना ची जबाबदाऱ्या पार पाडून सुद्धा उर्दू भाषेच्या विकासासाठी कार्य करतात. सय्यद जफरुज्जमा सय्यद जकरिया प्रचार्य म्हणून कार्य करत असताना " जफर शाद कलगांवी " या नावाने यांच्या " गझल संग्रह " तीन पुस्तकात सामील आहे पहिला " यादों का सफर" दुसरा " यादों के चराग " तिसरा " यादों के दरीचे " तसेच " खुशबू ए खैरूल बशर " ही पुस्तक प्रेषित मोहम्मद पैगंबर वर आधारित शायरीची आहे. ज्याच्यात १५० नात शरीफ असून प्रकाशनाचे काम बाकी आहे. तसेच शैक्षणिक व सामाजिक कार्यात इयत्ता पहिली ते बारावी व बी. ए. , एम. ए., डी. एड., बी.एड., तसेच इतर कोर्सेस मध्ये विद्यार्थ्यांना फोन लावून व घरी जाऊन त्यांची कौन्सिलिंग व प्रवेश करतात. सन २०१२ ते २०२० पर्यंत विनावेतन काम करताना सुद्धा ही सर्व कामे या दोघांनी पार पाडली म्हणून यांना या संस्थेद्वारे सन्मानित करण्यात आले.

### चिखलदरा परिसरात वाघाचा वावर वाढला

यवतमाळ : चिखलदरा परिसरात कृष्णापूर, मोहदरी, कारेगाव शेत शिवारात सध्या वाघाचा वावर वाढला आहे. यामुळे शेतकरी व शेतमजूर यांच्यात मोठे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बालाजी दादाजी फुटाणे यांच्या शेतात वाघाचे स्पष्ट पगमार्क आढळून आले. ही माहिती मिळताच वनरक्षक कृष्णा सोडगीर यांनी तत्काळ घटनास्थळी भेट दिली. त्यांनी तातडीने गावातील सरपंच अनिता बोटोनी आणि सामाजिक कार्यकर्ते भिमराव बोटोनी यांना बोलावून घेतले आणि ग्रामस्थांची एक विशेष सभा आयोजित केली. या सभेला शेतकरी व शेतमजूर उपस्थित होते. वनविभागाच्या पथकाने उपस्थितांना वाघाच्या हालचालींबाबत सविस्तर माहिती दिली आणि जनजागृतीपर सूचना दिल्या. नागरिकांनी शेतात एकट्याने न जाण्याचा, तसेच शक्य असल्यास गटागटाने फिरण्याचा सल्ला दिला. यासोबतच, रात्रीच्या वेळी शक्यतो घराबाहेर न पडण्याचे आवाहनही ग्रामस्थांना करण्यात आले आहे. वनविभागाने या भागात वाघाला पकडण्यासाठी सापळे लावण्याच्या तयारीस सुरुवात केली असून, कॅमेऱ्यांच्या साहाय्याने वाघाच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. ग्रामस्थांनी वनविभागाला सहकार्य करावे, असे आवाहनही या वेळी करण्यात आले.

### रामराव केशवराव कोरवते यांचे अल्पशा आजाराने निधन



घाटंजी - शिरोली येथील जेष्ठ नागरिक शिरोली ग्राम विविध कार्यकारी संस्थेचे दीर्घ काळ अध्यक्ष असलेले जिल्हा जंगल कामगार संस्थेचे माजी संचालक श्री. रामराव केशवराव कोरवते यांचे अल्पशा आजाराने दि २० ऑक्टोबर रोजी निधन झाले असून मृत्यू समयी ते ८४ वर्षाचे होते. अंत्यविधी उद्या दि २१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता गोंडी रितिरिवाज प्रमाणे करण्यात येणार आहे. त्यांच्या पच्छात एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातु सह मोठा आप्तपरिवार आहे.

# अमरावतीचा फराळ आता पोहोचतो परदेशात

## टपाल विभागाच्या पुढाकारातून परदेशवासियांची दिवाळी होणार गोड



**अमरावती/का.प्र.**

दिवाळी हा फराळाच्या सुगंधाचा आणि मिठाईच्या गोडव्याचा सण आहे. लाडू, साखरेचे गोळे, शेव, चिकली, अनारसे, करजी इत्यादी. फराळ बनवल्याशिवाय दिवाळी अपूर्ण आहे. दरम्यान, दिवाळीला टपाल विभागामार्फत फराळ सुविधेचा वापर दरवर्षी वाढत आहे. त्याचा वापर करणाऱ्यांची संख्यांमध्ये दरवर्षी वाढ होत आहे.

यावेळीही टपाल विभागामार्फत अमरावतीतील नागरिकांनी रशिया, कॅनडा, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि



फ्रान्समध्ये राहणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांना अमरावतीहून फराळाची चव आणि गोडवा स्पीड पोस्टने पाठवला आहे. हे उल्लेखनीय आहे की टपाल विभागाने परदेशात राहणाऱ्या भारतीयांना दिवाळीत त्यांच्या नातेवाईकांना फराळ पाठवणे सोपे केले आहे. यामुळे अमरावतीतील लोकांना परदेशात स्थायिक झालेल्यांना, शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना आणि काम करणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांना फराळ पाठवणे सोपे झाले आहे. गेल्या काही दिवसांत अनेक लोकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. याद्वारे टपाल विभागाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. आतापर्यंत, अमरावती पोस्ट ऑफिसने रशिया, कॅनडा, इंग्लंडसह परदेशातील देशांमध्ये फराळाचा स्वाद आणि दिवाळीचा गोडवा पोहोचवला आहे. टपाल विभागाने दिवाळीला सुरू केलेल्या या सुविधेचा वापर करून, अनेक लोकांनी वेगवेगळ्या देशांमध्ये परदेशात राहणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांना अंदाजे दोन क्विंटल दिवाळी फराळ पाठवले आहेत.

टपाल विभाग परदेशात पाठवलेल्या पार्सलमध्ये फक्त वाळलेली फराळ परवानगी देतो. या सुविधेमुळे स्पीड पोस्टने ३० किलोपर्यंत आणि पार्सलने २० किलोपर्यंत फराळ पाठवता येते. फराळ कोणत्याही देशात पाठवता येतो, परंतु दर वेगवेगळे असतात.

टपाल विभागाने सुरू केलेल्या या योजनेमुळे परदेशात राहणाऱ्या भारतीयांना दिवाळीत त्यांच्या मातृभूमीची चव आणि गोडवा अनुभवता आला असल्याचे पोस्टल असिस्टंट, मुख्य पोस्ट ऑफिसर श्रीकांत नवघरे यांनी सांगितले.

# श्रेयश पोटे पाटी यांचा वाढदिवस उत्साहात



**अमरावती/का.प्र.**

पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे उपाध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील यांचे सुपुत्र श्रेयशदादा पोटे पाटील यांचा वाढदिवस आज मोठ्या जल्लोषात व उत्साहात साजरा करण्यात आला.

या खास दिवशी अमरावती शहरातील विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देऊन शुभेच्छा देत त्यांच्यावरील आपले प्रेम व स्नेह, आदर व्यक्त केला. तसेच पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सर्वांनी मिळून श्रेयश दादांना शुभेच्छा देत, त्यांच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. श्रेयशदादा पोटे पाटील यांचे नेतृत्वात पूरग्रस्त भागातील नागरिक यांना मदत, शेतकरी, गरजू व्यक्तींना मदत तसेच निराधार नागरिकांची सेवा यासारखे सामाजिक कार्यातील भरीव योगदान, शैक्षणिक क्षेत्रात असलेली पकड आणि तरुणांना प्रोत्साहित करणारे नेतृत्वगुणामुळे त्यांची ओळख ही प्रेरणादायी आहे.

# अचलपूरात एकाच दिवशी तिघांचा मृत्यू, परिसरात शोककळा

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपुर शहरातील बेगमपुरा भाग रविवारी दुःखाच्या छायेत बुडाला. रविवारी एका दिवसात एकाच परिसरातील तीन जणांचे निधन झाल्याने संपूर्ण परिसर शोकमग्न झाला आहे. दिवसभर वातावरणात हळहळ आणि अश्रूंची रेष दिसून आली.

सुभाष निळकंठ पवार (वय ५८) यांच्या अकस्मात निधनाची. अत्यंत मनमिळाऊ व सामाजिक कार्यात तत्पर असलेल्या पवार यांच्या निधनाने मित्रपरिवार आणि आप्तस्वकीय हळहळून गेले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी भाऊआणि बहीणी असा मोठा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा आज सकाळी १० वाजता हनवतपुरा हिंदु स्मशानभूमीत पार पडली. दुपारी वत्सर्ला कृष्णराव शेटे (वय ८०) यांच्या निधनाची.

त्या प्रतिष्ठित डॉ. कृष्णराव शेटे यांच्या पत्नी होत्या. आयुष्यभर सौम्य, धर्माभिमानी आणि प्रेमळ स्वभावासाठी परिचित असलेल्या वत्सला बाईंना परिसरात 'आईसमान व्यक्तिमत्व' म्हणून ओळखले जायचे. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांची मय्यत दुपारी २ वाजता पार पडली.तिसऱ्या घटनेत गणेश भातुरकर (वय ६५) यांच्या निधनाने. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यपरायणतेसाठी प्रसिद्ध असलेल्या गणेश यांच्या जाण्याने परिसरातील अनेकांच्या डोळ्यात अश्रू दाटले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली, सुन आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्याही अंत्यसंस्काराची विधी हिंदू स्मशानभूमीत पार पडली.एका दिवसात तीन जणांच्या जाण्याने बेगमपुरा परिसरावर शोककळा पसरली आहे. सर्वत्र 'जीवन किती क्षणभंगुर आहे' याची जाणीव प्रत्येकाच्या मनात उमटली. श्रद्धांजलीसाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# शिक्षण परिषद अंतर्गत डिजिटल साहित्य अनावरण व आयएसओ प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रम

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

पं.स.नांदगाव खंडेश्वर ,समुह साधन केंद्र धानोरा गुरव केंद्रांतर्गत नुकतीच शिक्षण परिषद झाली.मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान अंतर्गत या शाळेला तालुकास्तरीय द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला होता. पुरस्काराच्या रक्कमेतुन विद्यार्थ्यांना डिजीटल साहित्यातून गुणवत्तापुर्ण शिक्षण घेता यावे याकरीता इंटरॅक्टिव्ह पॅनल,संगणक,विविध विषयाच्या बोलक्या प्रयोगशाळा, अलेक्सा तसेच विद्यार्थी सुरक्षा दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे,शालेय फर्निचर इत्यादी साहित्य खरेदी करण्यात आले.



डीजीटल साहित्याचे अनावरण उद्घाटक -मिलिंद कुबडे- प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती यांच्या हस्ते व नैरूद्दिन सय्यद -अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिति खंडाळा खुर्द,उमेशभाऊ दहातोंडे- सरपंच,निकेतभाऊ ठाकरे -सदस्य ग्रामपंचायत, शुभांगी ठाकरे- पोलीस पाटील, प्रिती धनविजय -उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती ,विलास बाबरे- शिक्षण विस्तार अधिकारी,विलास राठोड - केंद्रप्रमुख धानोरा गुरव, अनिल कोल्हे - केंद्रप्रमुख नांदगाव खंडेश्वर, बाळासाहेब मुंदे - केंद्रप्रमुख धानोरा फशी,सुनील धनविजय - सदस्य शाळा व्यवस्थापन समिती अर्चना जुमळे - विषयसाधन व्यक्ती ,संदिप गुल्हाने -विशेष शिक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. मिलींद कुबडे- प्राचार्य, तसेच प्रविण राठोड- अधिव्याख्याता -जिल्हा व प्रशिक्षण संस्था अमरावती यांनी गुणवत्ताविकास, निपुण भारत खान अकॅडमी,विविध स्पर्धा,या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.विलास बाबरे विस्तार अधिकारी तथा अधिक्षक प्रधानमंत्रीशालेय पोषण आहार योजने अंतर्गत मार्गदर्शन केले.या शाळेतील राज्यस्तरावर प्रकाशीत झालेल्या शिक्षणातील प्रकाशवाटा या यशोगाथेचे विमोचन व घ्एध प्राप्त प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मराठी व इंग्रजी विषयाचे उत्कृष्ट सादरीकरण केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलास राठोड - केंद्रप्रमुख धानोरा गुरव व शाळा यशोगाथेचे सादरीकरण प्रविण पवार- मुख्याध्यापक खंडाळा खुर्द यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन राधा मोहोड- सहाय्यक शिक्षिका यांनी तर आभार प्रदर्शन -किशोर गुजर- सहाय्यक शिक्षक खंडाळा खुर्द यांनी केले.शिक्षण परिषदेत केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

# अनुग्रह नायर यांची नियुक्ती

**कुऱ्हा/वार्ताहर**



अमरावती जिल्हा भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या कार्यालयात कुऱ्हा येथील तरूण युवा तडफदार कार्यकर्ता अनुग्रह उर्फ बबलु सुनिलबाबा नायर यांची भाजपा युवा मोर्चा जिल्हा ग्रामीण सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली.अनुग्रह नायर कुऱ्हा येथील प्रथम नागरिक सरपंचा मिना सुनिलबाबा नायर यांचे सुपुत्र असून त्यांच्या नियुक्ती बद्दल अमरावती जिल्हा व तालुक्यात तसेच कुऱ्हा येथील भाजपा युवा मोर्चाचे सर्व कार्यकर्त्यांनी अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.



**आसेगाव पूर्णा :** ऊन वारा पाऊस असो की सततची नापिकी असो, भविष्यात येणारा एक दिवस आपलाच येईल या आशेवर बळीराजा आपल्या सर्जा राजा सह नेहमीच सज्ज असतो. असाच एक शेतकरी आपल्या बैलाच्या पायाला कारागिराकडून नाल लावताना हिवरा पूर्णा येथील चित्र. (छाया : किशोर मोकलकर)

# कपाशीवर पाने खाणाऱ्या अळीचा हल्लाबोल

**अमरावती/का.प्र.**

कपाशी पिकावर सध्या तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीचा हल्लाबोल झालेला आहे. यामध्ये पाने, पात्या अळी फस्त करत असल्याने कपाशीचे मोठे नुकसान होत आहे. कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या पाहणीत हा प्रकार निदर्शनास आला आहे.

कृषी विद्यापीठाचे कीटकशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ व कृषी विभागाचे अधिकारी यांच्या चमूने प्रक्षेत्र भेट दिली असता, कपाशी पिकावर तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीचा (स्पोडोप्टेरा लिटुरा) प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर आढळून आला आहे. या किडीचा मादी पतंग कपाशी पानावर खालच्या बाजूने पुंजक्यात अंडी घालतो. अंडी अवस्था ही तीन ते चार दिवस तर अळी अवस्था २१ ते २२ दिवसांची असते. पूर्ण वाढ झालेली अळी जमिनीत कोषावस्थेत जाते. कोषावस्था ९ ते १० दिवस असते. प्रौढ अवस्था जवळजवळ ६ ते ७ दिवसांची असते. एक पिढी पूर्ण होण्यास सर्वसाधारणपणे ३२ ते ४० दिवस लागतात, कपाशीवर याशिवाय बोंडसळ दिसूण येत असल्याने बोंडे फुटत नाहीत व सडलेली दिसून येत आहे. यामुळे यावर्षी कापसाचे सरासरी उत्पादनात कमी येण्याची शक्यता आहे.

या किडीने पुंजक्यात घातलेल्या अंड्यांमधून लहान लहान अळ्या समूहात बाहेर येतात व प्रथमतः त्याच पानातील हरितद्रव्य मागील बाजूने राहून खातात. पाने जाळीदार होतात. या अळ्या नंतर मोठ्या होऊन स्वतंत्रपणे पाने, शेंडे, फुले, पात्या व बोंडे पोखरून खातात.

# वंचितांमध्ये आनंदाची दिवाळी; माजी नगरसेविका सुरेखा लुंगारे यांचा उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

दिवाळीच्या पूर्वसंध्येला माजी नगरसेविका व भाजपा उपाध्यक्षा सुरेखा लुंगारे यांनी पारधी समाजातील वंचित मुलांमध्ये दिवाळी साजरी करत समाजप्रती आपली बांधिलकी अधोरेखित केली. त्यांनी पारधी बेड्यावर भेट देऊन तेथील मुला-मुलींना टी-शर्ट, पॅन्ट, फ्रॉक, साड्या तसेच दिवाळीचा फराळ व चॉकलेट वितरित केले. या अनोख्या दिवाळी साजरीत मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय होता.



या प्रसंगी 'निराधार फासेपारधी विकास संस्था' मार्फत कार्यरत असलेल्या आणि सध्या जलसंपदा विभागात ट्रेसर म्हणून कार्यरत असलेल्या निकिता पवार या तरुणीने पारधी समाजातील ५०-६० मुलांना एकत्र करून त्यांचं शिक्षण सुरु केल्याबद्दल सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अनेक वर्षे उघड्यावर चालणाऱ्या या छोट्या शाळेला आता हक्काची चार एकर जागा मिळाली असून, त्या जागेवर 'मैत्रेय हॉस्टेल' उभारण्यात आले आहे. येथे मुलांच्या राहण्याची, खाण्याची आणि शिक्षणाची संपूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे.

कार्यक्रमात बोलताना सुरेखा लुंगारे म्हणाल्या, 'समाजातील उपेक्षित घटकांमध्ये दिवाळीचा प्रकाश पोहोचवण्याचा छोटासा प्रयत्न दरवर्षी करण्याची संधी मला मिळते, हे माझं भाग्य आहे. खऱ्या अर्थाने हीच माझी खरी दिवाळी आहे. जे मुलं तुम्हाला रस्त्याच्या सिग्नलवर पैसे मागताना दिसतात, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य निकिता पवार करत आहे, हे अत्यंत कौतुकास्पद आहे.'या कार्यक्रमाला सुरेखा लुंगारे यांचे पती दिगंबर लुंगारे, डॉ. रसिका राजनेकर, माला दळवी, संस्थेच्या अध्यक्षा रेणुका पवार आणि स्वयं निकिता पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निकिता पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन रेणुका पवार यांनी मानले.

# पार्टी देवी येथील विविध विकास कामांचे भूमिपूजन

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

पार्डी (देवी) येथील विविध विकास कामांचे भुमीपुजने करण्यात आले. यामध्ये प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे इमारत बांधकाम, अभ्यासिका व वाचनालय, ग्रामपंचायत वॉल कंपाऊंड, सौंदर्यीकरण व नाली बांधकाम अशा विविध विकास कामांच्या १ कोटी रुपयांच्या कामांना समावेश आहे.

पार्डी येथील युवा सरपंच अक्षय मेश्राम यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे पार्डी हे गाव नक्कीच विकास होईल, यावेळी सरपंच अक्षय मेश्राम, उपसरपंच प्रतिभा बनसोड, ग्रामविकास



अधिकारी ओम पिहुलकर, ग्रामपंचायत सदस्य सुनील राऊत,अजाब गंगात्रे, संजय ढेंबरे, दुर्गा नगरगडे, वर्षा कोरडे, रक्षणा सरदार, पोलीस पाटील नितीन बेंडे, युवा स्वाभिमान तालुका अध्यक्ष अजय घुले, उमेश डकरे, जगदीश अंबाडकर, पार्डी येथील युवा स्वाभिमान कार्यकर्ते पांडुरंग बाडांबुचे, डॉ.मधुकर पिसे, शांती लाल जाखड, बबन ढेंबरे, अशोक इंधाने, अन्ना इंधाने, अनिल भेंडे, जितेंद्र भस्मे, मनोहर पिसे, प्रविण सोनोने, पुरुषोत्तम होळकर, गोवर्धन मेश्राम, निलेश महल्ले, नारायण कारमोरे, पुरुषोत्तम घटारे, गजानन मेश्राम, अमोल मेश्राम, नितीन ढेंबरे, वैद्यकीय अधिकारी माधुरी ननिर, कालंदी धनविज, आशा वर्कर निर्मला सोनवणे,पल्लवी वाकोडे, आरोग्य सेवक शाहरुख, अरुण मडके, प्रवीण अरक, मनोहर मारोडकर, देवराव भंडारकर, अंबादास कारमोरे, ओमकार मोहड, कमलेश शाहू, प्रितम मेश्राम, शुभम राऊत, विकी जाखड,प्रतीक बावनकुळे, कुणाल वडूरकर व समस्त ग्रामस्थ व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी पार्डी वासियांना मोफत किराणा वाटप करण्यात आले.

# 'कुलूप लावून जाताना पोलिसांना कळवा'

**मोर्शी/वार्ताहर**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर चोरटे बंद घराला लक्ष्य करतात. यावर आळा बसावा म्हणून दिवाळी सणामध्ये नागरिकांनी सतर्कता बाळगावी. दिवाळीनिमित्त बाहेरगावी जात असल्यास त्याबाबत मोर्शी पोलिस ठाण्यात माहिती द्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाद्वारे नागरिकांना केले जात आहे. घराला कुलूप लावून बाहेरगावी जातअसल्यास घरामध्ये मौल्यवान वस्तू, पैसे ठेवू नये. शक्यतोवर नातेवाईकांना रात्री तुमच्या घरामध्ये झोपण्यास सांगावे.सणासुदीच्या दिवसात दागिने घालून बाहेर पडताना मंगळसूत्रचोरांपासून सावध राहावे. काहीही अनुचित प्रकार घडल्याचे लक्षात आल्यास त्वरित ११२ वर संपर्क करून पोलिसांना कळवावे, असे आवाहन मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राहुल आठवले यांनी नागरिकांना केले आहे. कुलूप असलेली घरे चोरट्यांद्वारा टार्गेट केल्या जात असल्याने पोलिस सतर्क झाले आहे.

# कुऱ्हा येथे शेतकरी न्याय हक्क विचार मंच कडून शेतकरी सभा

**कुऱ्हा/वार्ताहर**

शेतकरी न्याय हक्क विचार मंचाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष दिनेश वानखडे यांचे मार्गदर्शनात शेतकरी संवाद बैठक घेण्यात आली. या शेतकरी सभेत बियाणे लागवड बाबत चर्चा करण्यात आली.

भेसळ युक्त बियाणे, निकष दर्जाचे फवारणी औषध, सोबतच तण न मरणारे तणनाशक याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच सरकारच्या महाडीबीटी वर असलेल्या योजना बाबत नेहमी सर्व्हर डाउन कार्यक्रम बाबत मुद्दे मांडण्यात आले. त्यानंतर शेतकरी आत्महत्या आणि कर्जमाफी याबाबत काही शेतकरी बांधवांनी माहिती दिली. तसेच या बैठकीमध्ये प्रामुख्याने यावर्षी अतिवृष्टी, महापूर व सततच्या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून सरकारने दिलेली मदत तुटपुंजी जाहीर करून शेतकऱ्यांची एक प्रकारे थट्टा करत आहे. सरसकट अनुदान देऊन शेतकरी बांधवाच्या खात्यावर फक्त ७ हजार रुपये येत आहे. सरकारने काढलेल्या सत्य आणि असत्य सरकारी जी.आर. चे वाचन करून चर्चा करण्यात आली.

जी.आर प्रमाणे मिळणारी मदत तुटपुंजी असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. शेतकऱ्यांना



खऱ्या अर्थाने हेक्टरी जिरायती शेती करता पन्नास हजार रुपये व बागायतदार शेतकऱ्यांना हेक्टरी ७५ हजार रुपये ही किमान मदत मिळायला पाहिजे होती याबाबत शेतकरी न्याय हक्क विचार मंचाच्या वतीने अनेकदा निवेदन व आंदोलन करण्यात आले .तरीसुद्धा सरकारने तुटपुंजी मदत दिल्याने तहसीलदार साहेब तिवसा यांना निवेदन देऊन काही दिवसांच्या आत जर का या प्रकारची मदत मिळाली नाही तर शेतकरी न्याय हक्क विचार मंच आंदोलन करेल अशा प्रकारचा निर्णय संवाद बैठकीमध्ये घेण्यात आला.

या बैठकीला शेतकरी न्याय हक्क विचार मंचाचे अध्यक्ष दिनेश वानखेडे, दिलीपसिंह नहाटे, संत्रा उत्पादक महासंघाचे तालुका अध्यक्ष सोपानरावजी जीरापुरे, न्याय हक्क विचार मंचाचे समन्वयक संजय टेकाळे, समन्वयक संजय मोरे, अशोकराव पाटील, विनोद जाधव, नंदूभाऊ जीरापुरे, प्रकाश बडकस, तुकाराम चव्हाण, सभेचे अध्यक्ष गजानन सुने, गजानन ठोंबरे, संतोष भैसे, गजानन दारोकार, नंदू जीरापुरे, राजुभाऊ बाभूळकर, राजेश बिंड, स्वप्नील पवार, पत्रकार नितीन पवार, धर्मेंद्र कुरळकर, सतीश डहाके, अशोक दरणे, नितीन वरठी, उमेश दारोकार, संजय दारोकार, चंद्रकांत माहुले, पुंडलिक दारोकार, प्रमोद दारोकार, प्रदीप दमाये, आशिष बंगरे, किरण बंगरे, गणेश चिरडे, इतर शेतकरी उपस्थित होते. सेंद्रिय शेती अभ्यासक निखिल तेटू यांनी शेतकऱ्यांच्या पिकाची उत्पादनक्षमता कशी वाढावी याबद्दल मार्गदर्शन करून आभार प्रदर्शन केले. या बैठकीच आयोजन अशोक दरणे, सतीश डहाके, प्रदीप भाऊ ठोंबरे, दिनेश बाखडे यांनी यशस्वी केले. या शेतकरी संवाद बैठकीला शेकडोंच्या संख्येने बुद्धिजीवी शेतकरी उपस्थित होते.

**राज्यात ओल्या दुष्काळासारखी स्थिती असल्याने महायुती सरकारबद्दल राज्यात प्रचंड असंतोषाचे वातावरण आहे. त्यामुळे सध्या निवडणूक टाळण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे राजकीय वर्तुळात सांगण्यात येत आहे. राज ठाकरे यांच्याकडून सहा महिने निवडणूक याद्यांच्या मुद्यावर कार्यक्रम पुढे ढकलण्याचे 'नरेटिव्ह सेट' केले जात असल्यानेही राजकीय वर्तुळात हा भाजपचा अजेंडा अन्योक्तीने गळी तर उतरवला जात नाही ना? अशी जाणकारांना शंका आहे.**

# ठाकरेंच्या मधले बाळासाहेब बदलतात; कारण सत्तेचे राजकारण?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी महाविकास आघाडी (मविआ) आणि मनसेच्या प्रमुख नेत्यांनी राज्य निवडणूक आयोग आणि राज्याचे मुख्य निर्वाचन अधिकारी यांच्याशी चर्चा केली. आगामी निवडणुकांच्या मतदारयाद्या सदोष असल्या बाबत मागील वर्षभरापासून या पक्षांनी शंका व्यक्त केल्या आहेत? त्यावर आयोगाकडून अजूनही सकारात्मक प्रतिसाद येत नसल्याचे वारंवार दिसून आले आहे. त्यानंतर काँग्रेसनेते राहूल गांधी यानी देखील देशभर 'वोट चोर गद्दी छोड' अभियान राबवून त्यावर प्रकाश टाकला आहे. वंचित चे प्रकाश आंबेडकरांनी तर न्यायालयात दाद मागण्याचाही प्रयत्न केला, तो असफल झाला आहे. आता राज ठाकरे देखील महाविकास आघाडीसोबत याच मुद्यावरुन आक्रमक झाले आहेत. आयोगाशी बैठक झाल्यानंतर संयुक्त पत्रकार परिषदेत सर्वच विरोधीनेत्यांनी सदोष याद्या दुरुस्त करण्यावर भर देताना तोपर्यत निवडणूका न घेण्याचा मानस व्यक्त केला आहे. त्यात मनसे सर्वात आग्रही असल्याचे पहायला मिळाले आहे!

**निवडणुकांबाबत शंकाच शंका...!**

मनसे आणि महाविकासआघाडीच्या शिष्टमंडळाने घेतलेली निवडणूक आयोग आयुक्तांची भेट, त्यांच्यापुढे मांडलेले प्रश्न आणि निवेदने, यानंतर मविआने घेतलेली पत्रकार परिषद आणि त्यात झालेला धक्कादायक खुलासा यामुळे निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. मतदार याद्यांमध्ये असणारा घोळ समोर येत असल्या कारणाने सातत्याने होणारे हे खुलासे पाहता आता आगामी निवडणूक सरकारला जड जाण्याची जाणीव झाली असून, राज्यात आगामी काळात निवडणुका होतील की नाही? अशी शंका उपस्थित केली जात आहे.

याची कारणे अनेक आहेत. राज्य निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने तंबी दिल्याने जानेवारी अखेरपर्यंत प्रक्रिया पुर्ण करण्याची घाई आहे. तर आरक्षण आणि मतदार याद्यांसह कर्मचारी प्रशिक्षण इत्यादींच्या बाबत आयोगाने कामकाज सुरू केले आहे. मात्र राज्यात ओल्या दुष्काळासारखी स्थिती असल्याने महायुती सरकारबद्दल राज्यात प्रचंड असंतोषाचं वातावरण आहे. त्यामुळे सध्या निवडणूक टाळण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे राजकीय वर्तुळात सांगण्यात येत आहे. राज ठाकरे यांच्याकडून सहा महिने निवडणूक याद्यांच्या मुद्यावर कार्यक्रम पुढे ढकलण्याचे 'नरेटिव सेट' केले जात असल्यानेही राजकीय वर्तुळात हा भाजपचा अजेंडा अन्योक्तीने गळी तर उतरवला जात नाही ना? अशी जाणकारांना शंका आहे.

**लबाड लांडग ढोंग करतय... ?**

कारण... यासाठी भर दिवाळीत ठाकरे यांनी नेस्को येथे पदाधिकारी मेळावा घेतला आणि विरोधकांचे दु:ख मांडतानाच सत्ताधा-यांचा मनसुबा देखील व्यक्त केला आहे. यावर बोलताना एका जाणकार नेत्याने छान उदाहरण दिले. तो म्हणाला, गरीब शेतक-याला चिंता असते की आपल्या बोकडांच्या कळपातून एक एक बोकड रातोरात कमी कसा होत आहे. पण काही केल्या त्याला ते समजत नसत. मात्र एक लांडगा त्या कळपात येवून अन्य बोकडांसोबत रहात असतो रात्र झाली की तो त्यातील एक एक बोकड फस्त करतो. मात्र दिवसभर बोकडांसोबत बें-बे करत फिरतो. तसेच काहीसे महाविकास आघाडीसोबतच्या मनसेचे आहे असे हा नेता म्हणाला.! वास्तविक मतदार याद्यांमध्ये घोळ असल्याचे विधानसभा निवडणूकीपूर्वीपासूनच काँग्रेस, राष्ट्रवादी (शप) वंचित शिवसेना (ठाकरे) सारेच सांगत आहेत, तेच आता मनसे सांगत आहे. मात्र काँग्रेसचे नेते मनसेच्या स्रुात सूर मिसळून त्यांना सोबत घेण्यास तयार नाहीत. खरेतर मतदारांना फसवून मतदान विधानसभेत घेण्यात आले आहे. आता मतदार जागरूक झाला तर निवडणुका सरकारला जड जाणारच आहे तरीही विरोधकांनाच निवडणूक आता नको असे का म्हणावेसे वाटले आहे? मनसेचा सूर सर्वात मोठा आहे उबाठा त्यांच्या सोबत (प्रेमात) आहे, शप राष्ट्रवादी चोरी-चोरी चुपके कभी हा कभी ना या भुमिकेत आहे. राहिले



कोण ? काँग्रेस त्यांचे सर्वोच्च नेते राहूल गांधी अन्य नेते सर्वत्र वोटचोरीचा मुद्दा मांडत आहेत, पण राज्याचे अध्यक्ष संयुक्त बैठक आणि पत्रकार परिषदेपासून दूर राहताना दिसत आहेत!

**सरकारच पँकेज ठिगळासमान**

शिवाय अतिवृष्टीत शेतकरी ३५ पैकी ३२ जिल्ह्यात खरीपात पूर्ण उध्वस्त झाला आहे. आभाळच फाटल आहे त्याला सरकारच पँकेज ठिगळासमान होणार आहे. आगामी रब्बीच्या हंगामाला शेतक-याला उभे करायच आहे, त्याची दिवाळी काळी जात असताना त्याच्याकडे मतदानासाठी सत्ताधारी मत मागायला कसे जाणार? त्यामुळे सहा महिने निवडणूका पुढे गेल्या तर खरेतर त्यांना बरेच आहे, याची कल्पना विरोधकांना असल्यामुळे निवडणुका होतील की नाही यावर शंका आहे. सर्वोच्च न्यायालयाने मात्र निवडणूका जानेवारी२६ अखेर पूर्ण कराच असा तगादा लावला आहे.

मात्र मतदार याद्यांवरून विरोधक साशंक आहेत. त्यात आता राज ठाकरेंना सोबत घेण्यास उध्दव ठाकरे अधीर आहेत. कारण मुंबई महापालिकेत मराठी मतांचा टक्का ६५ टक्के आहे तो एकगठ्ठा मनसे शिवसेने ला मिळालातर ठाकरे ब्रँण्डचे ११५ नगरसेवक येण्याची शक्यता अनेक सर्वेक्षणात दिसून आली आहे. तर गुप्तचरांच्या अहवालातही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आघाडी म्हणून लढले नाहीतरी ठाकरेंना फायदाच असल्याचे दिसून आल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे राज ठाकरे यांना महाविकास आघाडीच्या नेत्यांसोबत जोडण्याचा उध्दवसेनेचा प्रयत्न आहे. मात्र बिहारच्या निवडणूकीपूर्वी मनसे सोबत गेल्यास बिहारच्या सत्तेचा खेळ बिघडू नये म्हणून काँग्रेस सध्या मनसे सोबत न जाण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र गंमत म्हणजे काँग्रेस नेते राहूल गांधी यांच्या वोटचोरीचा मुद्दाच राज ठाकरेंनी राज्यात पळविला आहे. म्हणजे तंबूत शिरलेल्या उंटासारखे राज ठाकरे विरोधकांसोबत राहून काँग्रेसचा अजेंडा हातात घेतात आणि भाषा सत्ताधा-यांच्या फायद्याची बोलत राहतात असा हा तिकडम राजकीय फंदा आहे की नाही! मात्र राज ठाकरेंनी २०१७ मध्ये काँग्रेसच्या उमेदवाराचा प्रचार केला होता. त्यामुळं जर तेव्हा स्वतःचा पक्ष असतानाही काँग्रेसचा प्रचार करायला राज ठाकरे चालले तर आता का चालणार नाहीत? असा सवाल उबाठाचे नेते उपस्थित करत आहेत ही त्याहून मोठी गंमत नाही का? त्यातही गंमत अशी उध्दव आणि राज यांच्या छायाचित्रात मधले बाळासाहेब फक्त बदलले पूर्वी बाळासाहेब ठाकरे असायचे आता त्याजागी बाळासाहेब थोरात दिसू लागले आहेत अशी मार्मिक प्रतिक्रिया आता येवू लागली आहे!

**सात दिवसात सुमारे पाच हजार कोटींवर मदत**

दुसरीकडे नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित तेवीस जिल्ह्यातील ३३ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना ३ हजार २५८ कोटीची मदत वितरणास मान्यता दिल्याचे सांगत मुख्यमंत्र्याकडून दिवाळीपूर्वी शेतक-यांना मदत देण्याचा आटापिटा केला जात आहे. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांच्या मते सात दिवसात सुमारे पाच हजार कोटींवर मदत देण्यात आली तर खरीप हंगामातील नुकसानीपोटी आतापर्यंत सात हजार ५०० कोटीची मदत वाटण्यात आली आहे.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी तपशील देत सांगितले की, नागपूर विभागातील तीन लाख ७६ हजार ९६८ शेतकऱ्यांच्या तीन लाख ४४ हजार ६२९.३४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३४० कोटी ९० लाख ८ हजार निधीचा समावेश आहे. तर अमरावती विभागातील चार लाख ७८ हजार ९०९ शेतकऱ्यांच्या पाच लाख २६ हजार ३८१.३६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४६३ कोटी ८ लाख ३० हजार निधीचा समावेश आहे. पुणे विभागातील आठ लाख २५ हजार १८९ शेतकऱ्यांच्या सात लाख नऊ हजार २०९.१५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ९५१ कोटी ६३ लाख ३७ हजार निधीचा समावेश आहे. नाशिक विभागातील १५ लाख ७९ हजार २३९ शेतकऱ्यांच्या ११ लाख ५० हजार ३०१.७६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १४७४ कोटी ८४ लाख ९ हजार निधीचा समावेश आहे. कोकण विभागातील एक लाख पाच हजार २३९ शेतकऱ्यांच्या २९ हजार २३३.१६ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २८ कोटी १० लाख ६३ हजार निधीचा समावेश आहे.

एकूण काय? राज्यात राजकारणाचा लपंडाव सुरूच आहे. सामान्य जनता शेतकरी मात्र ऐन दिवाळीत संकटाचा सामना करत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका झाल्या की तीन वर्ष राज्यात मोठ्या निवडणूका नाहीत त्यामुळे राजकीय पक्षांच्या कार्यकर्ते नेत्यांना सत्तेच्या वळचणीला जाण्याचा पक्षांतराचा खेळ सध्या जोरात सुरू आहे, निवडणूका लांबल्या तर त्यात वाढ होणार आहे. त्यामुळे मग सागरा प्राण तळमळला! म्हणत सत्ताधारी भाजपकडे ओघ वाढत राहणार आहे! असे आहे सत्तेचे राज कारण आणि सध्याच्या विरोधकांच्या स्थितीला कारण ठरतील ते देखील 'राज' कारण! असा जाणकारांचा मानस आहे! तुर्तास इतकेच!

**किशोर आपटे**

# मराठी माध्यमातील शिक्षणच दर्जेदार!

**आजकाल जर आपण विचार केला तर मराठी आणि इंग्रजी शाळांच्या तुलनेत मराठी शाळेतून घडलेले व मोठ्या पदावर गेलेले विद्यार्थी अधिक असल्याचे चित्र आपण बघत आहोत. उच्चपदस्थ अधिकारी, कलेक्टर, वकील, अभियंता, डॉक्टर आणि प्राध्यापक यांनी मराठी शाळेत शिकूनच आपले भविष्य घडवले आहे हे कोणालाही मान्य करावेच लागेल.**

मराठी भाषा शाबूत ठेवायची असेल तर आपल्या मुलांना मराठी माध्यमातील शिक्षण घेऊ द्यावे आणि त्यांना त्यांचे भविष्य घडवू द्यावे. कारण इंग्रजी शाळेपेक्षा मराठी माध्यमातील शिक्षण कधीही दर्जेदार व सक्षम असते हे पालकांनी लक्षात घ्यावे. आपल्या मुलांच्या भविष्याचा विचार करावा एवढेच मला सांगायचे आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी मराठी भाषेत शिक्षण घेणे हे त्यांना सोपे व रास्त राहील. कारण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर मातृभाषेतूनच संस्कार रुजवलेले असतात आणि त्यांच्या आजूबाजूला मातृभाषेतूनच बोलले जाते. त्यामुळे त्यांच्या मनावर मराठी भाषेचा पगडा असतो. त्यामुळे त्यांना मराठी भाषा शिकायला व समजायला सोपी जाते.

हल्ली प्रत्येक पालकाला वाटत आहे की, माझा मुलगा कोणत्याही क्षेत्रात गेला तर त्याला इंग्रजी ठळकपणे बोलता आली पाहिजे. त्याला इंग्रजी भाषा चांगली समजली पाहिजे. त्याला इंग्रजी उत्तम प्रकारे वाचता व लिहिता आली पाहिजे. जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही तो गेला तर त्याला इंग्रजीतून संभाषण करता आले पाहिजे. तो कुठे अडून पडता कामा नये. म्हणून बहुतांश पालकांचा ओढा व कल आपल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळेत घालण्यासाठी असतो. मुलांना डॉक्टर व इंजिनीयर बनवण्यासाठी इंग्रजी शाळा हेच माध्यम निवडण्याची स्पर्धा सध्या प्रत्येक पालकांमध्ये वेगाने सुरू झाली आहे.

आपला मुलगा इंग्रजी शाळेमध्ये शिकणे म्हणजे प्रतिष्ठेचे व मोठेपणाचे लक्षण झाले आहे. ज्या पालकांची मुले इंग्रजी शाळेत शिकतात ते पालक कुठेही चर्चेत गेल्यावर किंवा चार माणसात बसल्यावर मोठ्या अभिमानाने म्हणतात की, माझा मुलगा इंग्रजी शाळेत शिकत आहे, इंग्रजी बोलत आहे व त्याला डॉक्टर किंवा इंजिनीयर बनवण्याचे आमचे स्वप्न आहे.असे आपल्या मुलाचे मोठेपण मोठ्या आवडीने व ऐटीने सांगतात. म्हणून इंग्रजी शाळांना बहुतांश पालकांची व विद्यार्थ्यांची पसंती अधिक असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. याच कारणामुळे मराठी शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. मराठी शाळांना आजकाल वाईट दिवस आले आहेत, असेच म्हणावे लागेल.

मान्य आहे की, इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही गेलात तर इंग्रजीतून आपल्याला बोलता आलं पाहिजे. समोरचा काय बोलतोय हे समजता व ओळखता आले पाहिजे. म्हणून इंग्रजी भाषा येणे हे प्रत्येकाला अनिवार्य आहे. मराठी भाषा ही केवळ महाराष्ट्रापुरतीच सीमित आहे आणि मराठी भाषा बोलणारे लोक हे महाराष्ट्रातच अधिक आहेत. तरीसुद्धा मराठी भाषा शिकण्यासाठी आजकालच्या महाराष्ट्रीयन पालकांचा व विद्यार्थ्यांचा ओढा व कल इंग्रजी शाळांकडे असल्याचे दिसत आहे. परंतु महाराष्ट्रातील पालकांना व विद्यार्थ्यांना मी सांगू शकतो की, आपली मातृभाषा मराठी आहे. आपल्या मुलांना लहानापासून मोठे होईपर्यंत आपण मराठी भाषेतच संस्कार व बोलणे शिकवलेले असते. म्हणजे ते लहानाचे मोठे मराठी भाषेच्या संस्कार छायेखाली होतात. लहानपणापासूनच आपल्या मुला-मुलींना मराठी भाषेची आवड व गोडी अधिक लागलेली असते. त्यांना मराठी भाषा समजायला व शिकायला सोपी जाते. म्हणून विद्यार्थ्यांची मराठी भाषेवर जबरदस्त पकड असते. मराठी शाळेत शिकवलेला अभ्यास आपल्या मुलांच्या पटकन लक्षात येतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे मराठी भाषा त्यांना लवकर अवगत व माहीत होते आणि विद्यार्थीसुद्धा मराठी भाषेतून शिक्षण घेऊन लवकर भविष्यात यशस्वी होतात.



तसे तर मराठी शाळेतसुद्धा इंग्रजी विषय हा पहिलीपासून ते दहावीपर्यंत शासनाने अनिवार्य केला आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजी लिहिता, बोलता आणि वाचता यावी आणि जगाच्या पाठीवर कुठेही गेल्यावर मराठी भाषा बोलता व ओळखता आली पाहिजे, एवढे शिक्षण मराठी शाळांमध्ये शिकवले जाते. परंतु आजकाल पालकांना हे कळत नाही की, आपल्या मुला-मुलींना मराठी शाळेचे शिक्षण मातृभाषेत देणे आणि आपल्या मराठी संस्कृतीला व मातृभाषेला जिवंत ठेवणे हे प्रत्येक महाराष्ट्रीयन नागरिकाचे कर्तव्य आहे. आपली मुले मराठी माध्यमामध्ये शिकवणे म्हणजे आपली प्रतिष्ठा कमी करून घेणे आणि इंग्रजी शाळेमध्ये शिकणे म्हणजे आपली प्रतिष्ठा वाढणे, या दुहेरी खेळात आपण आपल्या मुलांचे भवितव्य धोक्यात घालत आहोत हे अगोदर लक्षात घेणे काळाची गरज आहे.

श्रीमंत, नोकरदार, धनदांडगे आणि ज्याच्याकडे भरपूर पैसा व संपत्ती आहे असे पालक भरमसाट पैसा ओतून आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत शिकवत आहेत. त्यांना हा खर्च परवडणारा आहे; परंतु त्यांची बरोबरी गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर व कामगार पालकसुद्धा आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत घालून स्वतःची आर्थिक परिस्थिती कमकुवत करत आहेत त्यासाठी सावकाराचे कर्ज काढत आहेत, वीटभट्टीची उचल घेऊन किंवा उसाची उचल घेऊन आपल्या पाल्यांना इंग्रजी शाळेत घालत आहेत आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात घालत आहेत. म्हणजे स्वतःच्या हाताने स्वतःच्या पायावर धोंडा पाडल्यासारखे आहे.

माझे असे म्हणणे नाही की, विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे ज्ञान नसू नये, विद्यार्थी इंग्रजी शाळेत शिकून नयेत, त्यांनी केवळ मराठी शाळेतूनच शिक्षण घ्यावे असा माझा उद्देश कदापि नाही. परंतु केवळ महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी मराठी भाषेत शिक्षण घेणे हे त्यांना सोपे व रास्त राहील. कारण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर मातृभाषेतूनच संस्कार रुजवलेले असतात आणि त्यांच्या आजूबाजूला मातृभाषेतूनच बोलले जाते. त्यामुळे त्यांच्या मनावर मातृभाषेचा म्हणजेच मराठी भाषेचा जबरदस्त पगडा असतो. त्यामुळे त्यांना मराठी भाषा शिकायला व समजायला सोपी जाते आणि विद्यार्थी आवडीने ती भाषा शिकतात आणि भविष्यात यशस्वी होतात. हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. आजकाल जर आपण विचार केला तर मराठी आणि इंग्रजी शाळांच्या तुलनेत मराठी शाळेतून घडलेले व मोठ्या पदावर गेलेले विद्यार्थी अधिक असल्याचे चित्र आपण बघत आहोत. उच्चपदस्थ अधिकारी, कलेक्टर, वकील, अभियंता, डॉक्टर आणि प्राध्यापक यांनी मराठी शाळेत शिकूनच आपले भविष्य घडवले आहे हे कोणालाही मान्य करावेच लागेल. म्हणून माझी महाराष्ट्रीयन पालकांना विनंती आहे की, आपल्या मुलांना मराठी शाळेतूनच शिक्षण शिकू द्या. सुरुवातीपासून ते मराठी बोलत आल्यामुळे व मराठी भाषेत त्यांच्यावर कळत-नकळतपणे संस्कार झाल्यामुळे ते मराठी शाळेतून लवकर यशस्वी होतील असे मला वाटते.

पालकांनी आपली मातृभाषा अबाधित ठेवण्यासाठी आणि मराठी शाळा जिवंत ठेवण्यासाठी इतर श्रीमंत पालकांची बरोबरी न करता आणि प्रतिष्ठेचा विचार करू नये. केवळ भविष्याचा विचार करून आपल्या मुलांना इंग्रजी शाळेऐवजी मराठी शाळेमध्ये शिक्षण घेऊ द्यावे. मराठी शाळेतून यशस्वी होणाऱ्या आणि शासकीय पदे काबीज करणाऱ्या विद्यार्थ्यांचा टक्का भारतात लक्षणीय आहे. मराठी भाषा शाबूत ठेवायची असेल तर आपल्या मुलांना मराठी माध्यमातील शिक्षण घेऊ द्यावे आणि त्यांना त्यांचे भविष्य घडवू द्यावे. कारण इंग्रजी शाळेपेक्षा मराठी माध्यमातील शिक्षण कधीही दर्जेदार व सक्षम असते हे पालकांनी लक्षात घ्यावे. आपल्या मुलांच्या भविष्याचा विचार करावा एवढेच मला सांगायचे आहे.



# भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये?

आंतरराष्ट्रीय संबंध कसे टिकवायचे आणि कोणासोबत टिकवून ठेवायचे याची जाणीव भारताला चांगल्याप्रकारे ग्यात आहे.त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला कोणत्याही प्रकारचा आंतरराष्ट्रीय सल्ला देवू नये.अमेरिकेला जर चांगला सल्ला पाहिजे असेल तर त्यांनी भारताजवळुन घ्यावा. डोनाल्ड ट्रम्प यांचे दररोज देशांतर्गत किंवा विदेशांतर्गत विवादास्पद आणि बिनबुडाचे बयान येत असतात यात काही नवीन नाही किंवा तथ्य नाही.त्याच पध्दतीचा भारत-रशिया तेल धोरणाबद्दल ट्रम्प स्वतःची पाठ थोपटणारे वक्तव्य केले आहे.जगातील अनेक देशांना कल्पना आहे की अमेरिका केव्हा व कधीही कोणालाही धोका देवू शकतो.त्यामुळे आजच्या परिस्थितीत अमेरिका व खासकरून डोनाल्ड ट्रम्प विश्वासपात्र राहीले नाही.जगाला कल्पना आहे की, नोबेल शांती पुरस्कार मिळावा यासाठी ट्रम्प प्रत्येक देशाच्या दारोदारी फिरत होते. नोबेल पुरस्कार मिळावा यासाठी ट्रम्प पाकिस्तानसमोर झुकले सुध्दा.परंतु नोबेल शांती पुरस्कारांपासून डोनाल्ड ट्रम्पला कोसो दूर फेकल्या गेले. अशाप्रकारे ट्रम्पची पुरस्काराची कथा, प्रथा,व्यथा संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पहाली आणि त्यांच्या आशा आकांक्षा संपूर्ण धुळीस मिळाल्या.कोणताही पुरस्कार असो मागावा लागत नाही, मिळवावा लागतो यासाठी त्या पध्दतीची प्रतीमा तयार करावी लागते व मेहनत करावी लागते आणि कोणताही पुरस्कार हे मेहनतीचे फळ असते.ज्यांचे नाव कधी चर्चेत नव्हते. त्या दक्षिण अमेरिका खंडातील व्हेनेझुएलामध्ये लोकशाहीला प्रोत्साहन आणि हुकुमशाहीच्या विरोधात लढण्यासाठी विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांना २०२५ चा शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला. पुरस्काराच्या शर्यतीत धावणाऱ्या ट्रम्पची हवा गुल झाली. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्पच्या कोणत्याही वक्तव्याकडे किंवा भाष्याकडे भारतासह कोणताही देश बारकाईने लक्ष देत नाही.

रशिया व भारत असा देश आहे की दिलेला प्रत्येक शब्द काळ्यापाटीवरील पांढरी रेष असते.त्यामुळे भारताने तेल रशिया जवळुन खरेदी करावे की नाही ही भारत-रशियाची विदेश निती ठरवित असते डोनाल्ड ट्रम्प स्वतःच्या स्वार्थासाठी अनेक देशांना धोका देऊन त्यांना रक्ताच्या थारोळयात सोडले याचे अनेक उदाहरण जगापुढे आहेत. अमेरिकेतील विदेशी नागरिकांनी ट्रम्पच्या विरोधात जात आहे याचे जिवंत उदाहरण म्हणजे डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने नव्या एच १बी व्हिसा फीचे शुल्क एक लाख डॉलर (सुमारे ८८ लाख रुपये) इतके वाढविल्याच्या निर्णयावर यूएस चेंबर ऑफ कॉमर्सने कोलंबिया येथील न्यायालयात सरकार विरोधात खटला दाखल केला आहे. भारताने रशियाला व रशियाने भारताला अनेक संकटकाळीन परिस्थितीत दोघांनी एकमेकांना मदत व सहाय्यता केली आहे आणि अमेरिकेचा विचार केला तर अमेरिकेने नेहमीच पाकिस्तानला मदत करून भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्या चे काम केले आहे.त्यामुळे डोनाल्ड ट्रम्पच्या वक्तव्यावरून स्पष्ट लक्षात येते की त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे.

**रमेश लांजेवार**

# नगर परिषद, जिल्हा परिषद व पंचायत समित्या हातात घ्या

## सुजात आंबेडकरांचे कार्यकर्त्यांना आवाहन

■ प्रतिनिधी | अकोट ■

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे चर्चासत्र १७ ऑक्टोबर रोजी अकोट शहरातील नरसिंग महाराज सभागृहात पार पडले. या वेळी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी कार्यकर्त्यांना नगर परिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या आपल्या हातात घेण्याचे भावनिक आवाहन केले.

सुजात आंबेडकर म्हणाले की, 'या निवडणुका आम्ही कोणासोबतही युती न करता स्वबळावरच लढवणार आहोत. लोकसभा निवडणुकीच्या वेळी



काँग्रेसला युतीचा पान्हा फुटतो, पण स्थानिक निवडणुका आल्या की तेच 'एकला चला रे' म्हणत निघतात. आता आपणच पूर्ण ताकदीने या निवडणुका लढवून विजय मिळवायचा आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

या चर्चासत्राला जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, राज्य युवा आघाडी महासचिव राजेंद्र पातोडे, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर सुलताने, युवक जिल्हा महासचिव राजकुमार दामोदर, जिल्हा महिला आघाडी अध्यक्षा आम्रपाली खंडारे, संगीता अढाऊ, प्रदीप वानखेडे, तालुकाध्यक्ष चरण इंगळे, महासचिव रोशन पुडकर, संघटक सुरेंद्र ओइंबे, तसेच शोभा शेळके, काशिराम साबळे, यावर अली, लता कांबळे, आशिष रायबोले, अमन गवई, मंगेश चिखले, मुस्ताक पटेल, मंदा कोल्हे, स्वाती चिखले, स्फूर्ती गावंडे, गोपाल ढोरे, प्रमोद सोनोने, तुषार पाचकोर, देवानंद फुसे आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक चरण इंगळे यांनी केले, तर रोशन पुडकर यांनी संचलन व सुरेंद्र ओइंबे यांनी आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमाला तालुका व शहरातील आजी-माजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवक आघाडी, सम्यक विद्यार्थी, आंदोलन, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दलचे पदाधिकारी तसेच सर्व सर्कल अध्यक्ष व हजारो कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.

## निराधारांच्या जीवनात दिवाळीचा गोडवा


■ प्रतिनिधी | अकोला ■

वंचित, गरजू, निराधारांच्या जीवनात दिवाळसणाचा आनंद पेरुन 'सामाजिक उपक्रमांची दिवाळी पहाट' हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम सामर्थ्य फाउंडेशनच्यावतीने गेल्या तीन वर्षांपासून निरंतर राबविण्यात येत आहे. संस्थेच्यावतीने रविवारी सूर्योदय बालगृहातील बालकांसाठी किराणा, धान्य, जीवनावश्यक वस्तू व फटाक्यांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते.दीपोत्सवानिमित्त प्रत्येक घरात चैतन्याचे वातावरण असते. नवीन कपडे, फटाक्यांचे आतषबाजी व खमंग फराळाच्या मेजवानीचा आनंद घेतला जातो. समाजातील गरजू, निराधारांना सुद्धा सणाचा आनंद मिळण्यासाठी सामर्थ्य फाउंडेशनने पुढाकार घेतला. अनेक गरजूंच्या जीवनात दिवाळीचा आनंद पेरण्यासाठी संस्थेच्यावतीने सूर्योदय बालगृहात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

# उमरा प्रकरणात कृषी विभागाचे दोन मापदंड?

## दोन कृषी सहाय्यकांवर कारवाई; एकाला मात्र अभय का?

■ प्रतिनिधी | खेट्री ■




पातूर तालुक्यातील विविध गावांतील रब्बी पिकांच्या नुकसानीच्या सर्वेक्षणात घोळ उघड झाल्यानंतर दोन कृषी सहाय्यकांवर कारवाई करण्यात आली असताना, उमरा परिसरातील अशाच प्रकरणात संबंधित कृषी सहाय्यकाला मात्र अभय दिल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

खेट्री परिसरातील सर्वेक्षणात अनियमितता आढळल्यानंतर महिला कृषी सहाय्यक व्ही. एम. ताकझुरे यांची बदली करण्यात आली. त्याचप्रमाणे टाकळी खेट्री परिसरातील सर्वेक्षणात घोळ आढळल्याने कृषी सहाय्यक एम. एम. पेंढारकर यांच्याविरोधातही कारवाईचे आदेश देत पातूरचे तहसीलदार यांनी १४ ऑक्टोबर रोजी तालुका कृषी अधिकाऱ्यांना पत्र पाठवले.

मात्र, उमरा परिसरात झालेल्या पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात घोळ झाल्याचे उघड झाल्यानंतरही त्या प्रकरणातील कृषी सहाय्यकाविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. याच सर्वेक्षणातील तलाठी एस. पी. लठाड यांना उपविभागीय अधिकाऱ्यांनी १७ सप्टेंबर रोजी निलंबित केले, तर ग्राम सचिव जे. पी. तायडे यांनाही मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ६ ऑक्टोबर रोजी निलंबित केले. तरीदेखील, संबंधित कृषी सहाय्यकाला कृषी विभागाकडून अभय मिळाल्याने विभागीय कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. स्थानिक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, 'सर्वांसाठी एकच नियम असावा. एका गावात कारवाई आणि दुसऱ्या गावात माफी — हे अन्यायकारक आहे.'

**कृषी विभागाचा अनागोंदी कारभार! :** पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात दोषी ठरलेल्या दोन कृषी सहाय्यकांवर कारवाई केली गेली, परंतु उमरा परिसरातील दोषी आढळलेल्या सहाय्यकाला अभय देण्यात आल्याने विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## नऊ आदर्श शिक्षकांचा सन्मान

**अकोला :** शिक्षण विभाग जिल्हा परिषद अकोला यांच्या वतीने जिल्हास्तरीय शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२४-२५ चे वितरण जिल्हा परिषद कर्मचारी भवन येथे समारंभ पूर्वक करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या नऊ आदर्श शिक्षकांचा जिल्हास्तरीय शिक्षक गुणगौरव पुरस्काराने अनिता मेश्राम (भा.प्र.से.) प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. अकोला यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विनय ठमके अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प.अकोला लाभले होते.

# आंदोलनाच्या इशाऱ्याने नुकसानभरपाईच्या कामाला गती

## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा सुरूच ठेवू – निलेश कापकर

■ प्रतिनिधी | खेट्री ■

दिवाळीपूर्वी पातूर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना अतिवृष्टीची सरसकट मदत देण्यात यावी, अन्यथा काळी दिवाळी साजरी करण्यात येईल, असा इशारा आलेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या नेतृत्वात देण्यात आला होता.

या इशाऱ्यामुळे प्रशासन जागे झाले असून सरसकट नुकसानभरपाईच्या कामाला गती मिळाली आहे.

ऑगस्ट महिन्यातील नदीकाठच्या शेतकऱ्यांना तसेच सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे नुकसान



झालेल्या शेतकऱ्यांना पुढील आठ दिवसांत मदत वितरित केली जाईल, असे महसूल विभागाने आश्वासन दिले आहे. त्यामुळे दिवाळीच्या दिवशी नियोजित करण्यात आलेले आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर म्हणाले, 'शेतकऱ्यांच्या हितासाठी आमचा लढा सुरूच राहील. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानुसार जर आठ दिवसांत नुकसानभरपाईचे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले नाही, तर २६ ऑक्टोबर रोजी पातूर तहसील कार्यालयावर सर्वतोपरी ताकदीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.'

या आंदोलनात पांढुर्णा येथील शेतकरी संजूभाऊ देवकते, शिवाजीराव देवकते, भास्कर शेवलकर, प्रमोद खुळे, शंकर गावंडे, नितीन ढोणे, शेखर खुळे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

कापकर यांनी सांगितले की, 'शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सुरू केलेला लढा हा केवळ आंदोलनापुरता नाही, तर शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आम्ही थांबणार नाही.'


## निविदा सुचना

### ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अकोला

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला हे ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत खांबोरा ६० + ४ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कंत्राटी पध्दतीने चालविण्या बाबतच्या कामाकरीता जिल्हा परिषद/महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील योग्य वर्गात पंजीकृत असलेल्या कंत्राटदाराकडुन ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कामाची ई निविदा प्रसिध्दीची पहिली वेळ प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निविदा संबधी माहिती, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर पाहावयास उपलब्ध आहेत.

**कार्यकारी अभियंता**
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद, अकोला करीता

जावक क्र. :- जिप/ग्रापापुवि/निविदा१४४४/२५
कार्यालय, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, अकोला दिनांक १७/१०/२०२५


# मुंडगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अनिल गाढे यांची निवड

■ प्रतिनिधी | अकोट ■

संतनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अनिल गाढे यांची निवड झाली आहे. यापूर्वीचे उपसरपंच तुषार पाचकोर यांनी काही दिवसांपूर्वी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. दि. २० ऑक्टोबर रोजी ग्रामपंचायत कार्यालयात गुप्त मतदान पद्धतीने उपसरपंचपदाची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत अनिल गाढे आणि अरविंद फुसे यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली. एकूण १६ सदस्यांपैकी तुषार पाचकोर गटाचे ८ आणि समता गटाचे ८ सदस्य होते. मात्र समता गटातील एका सदस्याने



तुषार पाचकोर गटाला साथ दिल्याने अनिल गाढे यांना निर्णायक बहुमत मिळाले. मतदानात अनिल गाढे यांना ९ मते तर अरविंद फुसे यांना ७ मते मिळाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामसेवक सैय्यद नजाकत यांनी कामकाज पाहिले. निकाल जाहीर करताना अनिल गाढे यांची उपसरपंच म्हणून अधिकृत घोषणा करण्यात आली. अनिल गाढे हे सुरुवातीपासूनच उपसरपंचपदाचे प्रमुख दावेदार मानले जात होते. काही दिवसांपूर्वीच काही वृत्तपत्रांमध्येही त्यांच्या निवडीबाबत संकेत देणारे वृत्त प्रसिद्ध झाले होते आणि अखेर त्या अपेक्षेप्रमाणेच त्यांची उपसरपंचपदी निवड झाली आहे.

## जागतिक आयोडीन दिनानिमित्त जिल्ह्यात आयोडीन जागरूकता मोहिमेची सुरुवात

■ प्रतिनिधी | अकोला ■

यंदाच्या जागतिक आयोडीन कमतरता दिनाच्या निमित्ताने जिल्ह्यासह देशभरातील मुलांमधील आयोडीनच्या कमतरतेमुळे उद्भवणाऱ्या आजारांविरुद्ध (आयडीडी) लढा देण्याची कटिबद्धता व्यक्त करण्यात आली आहे.

लोकांमध्ये आयोडीन या सूक्ष्म पण अत्यावश्यक पोषक घटकाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे कार्य सातत्याने टाटा सॉल्ट करीत आहे. विशेषतः बाल्यावस्थेतील बौद्धिक विकासासाठी आयोडीन हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने टाटा सॉल्टचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.आयोडीनयुक्त मीठ हे फक्त सरकारने अनिवार्य केलेला पूरक आहार नसून, तो आपल्या स्वयंपाकघरातील एक साधा घटक आहे. मीठ आपल्या अन्नाला केवळ चव देत नाही, तर आपल्या आरोग्याचेही अनेक प्रकारे संरक्षण करते. मीठ हे सर्वत्र वापरले जाणारे उत्पादन असल्यामुळे, त्याद्वारे आयोडीनचा पुरवठा करणे ही सर्वात प्रभावी पद्धत ठरली आहे. युनिव्हर्सल सॉल्ट आयोडायझेशन या कार्यक्रमाद्वारे जगभर आयोडीन अभावजन्य आजार (आयडीडी) रोखण्यासाठी यशस्वी प्रयत्न झाले आहेत. गेल्या अनेक दशकांपासून मीठ हे सार्वजनिक आरोग्य मोहिमांचे प्रमुख साधन राहिले आहे. त्यामुळे आयोडीनच्या कमतरतेमुळे होणारे गंभीर परिणाम मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहेत.भारतानेही या क्षेत्रात मोठी प्रगती साधली आहे.


## जाहीर नोटीस

### वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८९४/२०२५ प्रोसेस नं.१७५७७/२०२५
चौ.ता. २९/११/२०२५ दिनांक : १८/१०/२०२५

**अर्जदार :** १. वंदना कैलासराव नाईक २. शुभम कैलासराव नाईक दोघेही रा. नालंदा वाचनालय जवळ, बाजोरिया नगरी, कमला जाजू नगर, हिंगणा रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कैलास भगवान नाईक
**पत्ता :-** रा. नालंदा वाचनालय समोर, बाजोरिया नगरी, कमला जाजू नगर, हिंगणा रोड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कैलास भगवान नाईक यांचे दि. ०६/०९/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/१० / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८१३/२०२५ प्रोसेस नं.१७४०३/२०२५
चौ.ता. ०३/११/२०२५ दिनांक : १५/१०/२०२५

**अर्जदार :** १. ताराबाई प्रताप यादव रा. व्दारा प्रताप यादव, हनुमान आखाडा, अनिकट, अकोला. ता. जि. अकोला. २. प्रेमकुमार प्रताप यादव रा. प्रताप यादव, मंगलधाम कॉलनी, ऋषभ विहार, २१ बी, न्यु रिंग रोड, रूख्मिनी नगर, अमरावती, ता. जि. अमरावती. ३. हेमलता संजय यादव रा. संजय यादव, हनुमान आखाडा जवळ, अनिकट, अकोला. ता. जि. अकोला. ४. रामकली अजय यादव रा. अजय यादव, दुर्गा चक्कीच्या जवळ, सती फैल, खामगांव, ता. खामगाव, जि. बुलढाणा.

**विरुध्द**


**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : ातापसिंह दुर्जन यादव
**पत्ता :-** रा.हनुमान आखाडा जवळ, अनिकट, अकोला. ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले. आहे की, मयत प्रतापसिंह दुर्जन यादव यांचे दि. ०५/०३/२००३ रोजी अनिकट, हनुमान आखाडा, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३ / ११ / २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला








जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३२३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# उत्तर आशियाचा दुर्मिळ पाहुणा

## 'तपकिरी खाटिक' वर्ध्यात पहिल्यांदाच

**वर्धा/जनमाध्यम**

उत्तर आशियातून स्थलांतर करत भारतात येणाऱ्या दुर्मिळ पक्ष्याचा 'तपकिरी खाटिक' (ब्राउन श्राईक) वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम परिसरात पहिल्यांदाच शोध लागला आहे.पक्षीनिरीक्षक प्रतिक पाल आणि राहुल वकारे यांनी सकाळी झुडुपाळलेल्या मोकळ्या प्रदेशात या पक्ष्याचे छायाचित्र टिपून नोंद केली.



तपकिरी खाटिक हा मध्यम आकाराचा, परंतु अत्यंत चपळ आणि शिकारी वृत्तीचा पक्षी आहे. सायबेरिया, मंगोलिया, चीन आणि जपान या उत्तर आशियाई प्रदेशांतून हिवाळी स्थलांतर करत तो भारतात येतो.

साधारण १७ ते २० सेंटीमीटर लांबीच्या या पक्ष्याची तपकिरी पाठ व डोके, धवल खालचा भाग आणि काळी डोळ्याभोवतीची पट्टी हे त्याचे आकर्षक वैशिष्ट्य आहे.शिकार पकडण्याची अनोखी पद्धतही या पक्ष्याचे वैशिष्ट्य मानली जाते. तो अळ्या, लहान बेडके, सरडे यांना पकडून झुडपांच्या काट्यांवर किंवा तारांवर बोचून ठेवतो आणि नंतर खातो. त्यामुळेच त्याला 'खाटिक' असे नाव लाभले आहे.या नोंदीचे छायाचित्र आणि ध्वनी नोंद जागतिक पक्षी-संग्रह संकेतस्थळ 'ई-बर्ड'वर अपलोड करण्यात आली असून, वर्धा जिल्ह्यातील ही पहिली अधिकृत नोंद म्हणून मान्यता मिळाली आहे. या दुर्मीळ निरीक्षणामुळे वर्धा परिसरातील समृद्ध आणि अनुकूल जैवविविधतेचा प्रत्यय पुन्हा आला आहे. स्थानिक पक्षिमित्रांकडून प्रतिक पाल आणि राहुल वकारे यांचे मनापासून अभिनंदन होत आहे.

## संक्षिप्त

### सट्टापट्टी चालकांवर कारवाई

**आर्वी -** पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी धडक कारवाई करून दोन सट्टापट्टी व्यावसायिकांच्या मुसक्या आवळल्या.पहिली कारवाई आर्वी पोलिसांनी इंदिरा मार्केट आर्वी येथे केले. या ठिकाणाहून सट्टापट्टी व्यावसायिक नीलेश रुपराव ठाकरे रा. नेताजी वॉर्ड आर्वी यास पोलिसांनी ताब्यात घेतले. तर दुसरी कारवाई आर्वी शहरातीलच नेहरू वॉर्ड भागात करण्यात आली. या ठिकाणाहून पोलिसांनी सट्टापट्टी व्यावसायिक शेख आरिफ शेख नवी रा. डॉ. आंबेडकर वॉर्ड आर्वी यास ताब्यात घेत त्यास अटक केली. या दोन्ही प्रकरणी आर्वी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेतली आहे.

### सट्टापट्टी चालकांवर कारवाई

**आर्वी -** पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी धडक कारवाई करून दोन सट्टापट्टी व्यावसायिकांच्या मुसक्या आवळल्या.पहिली कारवाई आर्वी पोलिसांनी इंदिरा मार्केट आर्वी येथे केले. या ठिकाणाहून सट्टापट्टी व्यावसायिक नीलेश रुपराव ठाकरे रा. नेताजी वॉर्ड आर्वी यास पोलिसांनी ताब्यात घेतले. तर दुसरी कारवाई आर्वी शहरातीलच नेहरू वॉर्ड भागात करण्यात आली. या ठिकाणाहून पोलिसांनी सट्टापट्टी व्यावसायिक शेख आरिफ शेख नवी रा. डॉ. आंबेडकर वॉर्ड आर्वी यास ताब्यात घेत त्यास अटक केली. या दोन्ही प्रकरणी आर्वी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेतली आहे.

### पोहण्यासाठी गेलेल्या १६ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू

**आर्वी -** मित्रांसोबत सारंगपुरी येथील तलावात पोहण्यासाठी गेलेल्या १६ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू झाला. या प्रकरणी आर्वी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. ऋषभ अनिल धोत्रे रा. वरोरा जि. चंद्रपूर ह. मु. संजयनगर आर्वी हा त्याचे मित्र किरण ईटेकर व दबंग नामक तरुणासोबत सारंगपुरी येथील तलाव येथे पोहण्यासाठी गेला होता. पोहण्यासाठी तो तलावात उतरला असता त्याला खोल पाण्याचा अंदाज आला नाही. अशातच त्यांचा बुडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळाल्यावर आर्वी पोलिसांनी तातडीने सारंगपुरी येथील तलाव गाठून ऋषभ याचा मृतदेह तलावाबाहेर काढून पंचनामा करीत मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी आर्वी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

### केळझर धम्मभूमी येथे संघदान कार्यक्रम

**केळझर -** येथील धम्मभूमी (बुद्धविहार) येथे गुरुवार, २३ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता संघदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.येथे श्रामणेर बौद्ध भिक्षु यांच्या गणवेशात गेल्या काही महिण्यांपासून ७० विद्यार्थी यशवंत हायस्कूलमध्ये शिक्षण घेत आहेत. ते गणवेशधारी विद्यार्थी बुद्धविहारात आश्रयाला आहे. बुद्धकालीन श्रमण शिक्षा अभियानांतर्गत छोट्या पडद्यावरील कलाकार गगन मलिक यांच्या फाउंडेशनकडून बौद्ध विहाराच्या प्रांगणात चिवरदान कार्यक्रम आयोजित केला आहे. स्वतः मलिक हे उपस्थित राहून वस्त्र वाटप करणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन किशोर खोब्रागडे, आनंद खोब्रागडे, आकाश म्हैसकर, भीमराव राहुळकर, उमेश गायकवाड, हिरामण पाटील आदींनी केले आहे.

# बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटनेने पालकमंत्र्यांसमोर मांडल्या व्यथा

**आर्वी/जनमाध्यम**

प्रकल्पग्रस्त शेतकरी प्रकल्पग्रस्तांच्या वतीने १४ ऑक्टोबर रोजी स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे धरणे आंदोलन करण्यात आले. त्यानंतर पालकमंत्री पंकज भोयर यांची प्रत्यक्ष भेट घेत त्यांच्याकडे मागण्या मांडण्यात आल्या.

सुशिक्षित प्रकल्पग्रस्त बेरोजगारांना नोकरीला पर्याय म्हणून रुपये ५० लाख अनुदान स्वरूपात द्यावे, नोकरीचा हक्क वळता करावा, वयाचे ४५ वर्ष पूर्ण करणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्ताला ५० लाख रुपयाचे सानुग्रह अनुदान प्रदान करा, शेतकरी प्रकल्पग्रस्त बांधवांना २०१३ च्या भूसंपादन कायद्याचा मोबदला देण्यात यावा, राज्य सरकारने प्रकल्पग्रस्त बांधवांना १८९४ च्या १०० वर्ष जुन्या कायद्यानुसार अल्प मोबदला दिला. प्रकल्पग्रस्त शेतकरी बांधवांची हालत अत्यंत खस्ता झाली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पातळीवरच्या मागण्या तत्काळ निकाली काढून तुमच्या न्याय मागण्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक लावून त्यावर सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडू असे आश्वासन देण्यात आले. याप्रसंगी प्रकल्पग्रस्त सुशिक्षित बेरोजगार संघटनेचे प्रमुख राजेश शिरगरे, सचिन दहाट, रवींद्र खंडारे, कैलास कापसे, संघदीप नाखले, सिद्धार्थ मनोहर, प्रशांत एरोडे, ज्ञानेश्वर राठोड यांच्यासह इतर प्रकल्पग्रस्तांची उपस्थिती होती.

# सुमंगल दिवाळी पहाटेत सुरेल गाण्यांचा सोहळा

**वर्धा/जनमाध्यम**

दीपावलीच्या स्वागतार्थ इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) वर्धा शाखेतर्फे सुमंगल दिवाळी पहाट सदाबहार गाण्यांचा सुरेल नजराणा हा संगीत सोहळा रविवारी इंझापूर येथील आयएमए हॉलमध्ये रंगला. पहाटेच्या मंद वाऱ्यात सुरेल गीतांनी वातावरण भारले.अध्यक्ष डॉ. राजसबाला धांडे आणि सचिव डॉ. शिरीष वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

आयोजनात डॉ. वैभव गिर्डे, डॉ. निखिल लांबट आणि डॉ. दर्शना टोटे यांनी विशेष परिश्रम घेतले.पहाटे साडेपाचला दीपप्रज्वलन, शंखनाद, मंत्रोच्चार आणि फटाक्यांच्या आतषबाजीने



कार्यक्रमाची सुरुवात झाली. आयएमए वर्धा परिवारातील डॉक्टरांनी मराठी भावगीते आणि भक्तिगीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. जयंत वाघा यांनी केले. संगीत सादरीकरणात डॉ. जयंत वाघा, डॉ. सचिन पावडे, डॉ. संजीवनी लोखंडे, डॉ. संगीता भिसे, डॉ. अतुल तायडे, डॉ. सुरेखा तायडे, डॉ. स्वाती गांधी, डॉ. अमोल लोहकरे, डॉ. आकाश बंग, डॉ. स्वरूपा चकोले, डॉ. अपर्णा भाईमारे, डॉ. पवन वानखडे, डॉ. शिरीष वैद्य, डॉ. प्रवीणा जैन आणि डॉ. निखिल लांबट यांनी सहभाग घेतला. निवेदन डॉ. दीपाली आणि डॉ. अंगद मिस्किन यांनी समर्थपणे केले. कार्यक्रमानंतर IMA Diya Market हा मुलांसाठीचा विशेष उपक्रम पार पडला. डॉ. शीतल वैद्य यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमात १७ मुलांनी स्वतः सजवलेल्या मातीच्या दिव्यांचे स्टॉल्स लावले. उपस्थित डॉक्टरांनी सर्व दिव्यांची खरेदी करत या छोट्या कलाकारांचा उत्साह वाढवला.या उपक्रमातून जमा झालेली ६६४० रक्कम मुलांनी प्रेमाचा खाऊ या अनाथालयासाठी दान दिली. दिवाळीच्या या सुरेल उपक्रमात संगीत, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

### महागाईच्या भडक्यात लाल मिरचीचा ठसका

# लाल मिरचीचे दर वाढल्याने गृहिणींची फोडणी बिघडली

**साहूर/जनमाध्यम**

उन्हाळ्यामध्ये गृहिणी वळवटासह तिखट व मसाले वर्षभर पुरेल एवढे डब्यात तयार करून ठेवतात ही प्रथा प्राचीन काळापासून पूर्वापार सुरू आहे मसाल्यामध्ये मिरची पावडर हा सुद्धा प्रमुख घटक असतो परंतु मिरचीचे दर वाढल्याने महागाईच्या भडक्यात लाल मिरचीचा मात्र गृहिणींना चांगलाच ठसका बसत आहे परिणामतः मिरचीचे भाव वाढल्याने सामान्य गृहिणींची फोडणी महागली आहे.

गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी ४० ते ५० रुपयांनी मिरचीचे दर वाढले आहेत लाल मिरचीने दोनशे रुपयाचा टप्पा पार केल्याने महिलांचे वर्षाला तिखट पावडरसह मसाल्याचे गणित बिघडले आहे. चटकदार मसाला जेवणात महत्त्वाचा मानला जातो मसाल्यासाठी खोबरे खसखस, मिरे अशा अनेक प्रकारचे मसाल्याचे पदार्थ वापरतात त्यामध्ये लाल मिरची अधिक स्वादिष्ट असल्याने त्यात भर घालते परंतु लाल मिरचीला महागाईची झळ लागली असल्याने लाल मिरची बरोबरच तिला लागणाऱ्या मसाल्याचेही दर वाढल्यामुळे लाल मिरचीचा ठसका सर्वसामान्यांना आता सोसवत नसल्याचे दिसून येत आहे. वातावरणाचा मिरची पिकाला मोठ्या प्रमाणात फटका बसल्याने लाल मिरचीची आवक कमी झाली आहे. त्यामुळे मिरचीचे भाव वाढले असल्याचे सांगण्यात येते परिसरात शेतकरी नगदी व भरघोस उत्पन्न देणारे पीक म्हणून मिरचीचे पीक घेतात परंतु निसर्गाचा फटका मिरची पिकालाही बसल्यामुळे यंदा स्वयंपाकासाठी आवश्यक असलेल्या लाल मिरची व पावडरचे भाव वाढले असल्याचे चित्र बाजारात दिसून येत आहे आठवडी बाजारासह विविध विक्री केंद्र किराणा दुकानात लाल मिरची व पावडर खरेदीसाठी उपलब्ध असून मिरची पावडरसाठी ग्राहकांची रेलचेल दिसून येत असून यावर्षी दरवाढीमुळे क्वांटिटी मात्र कमी झाली असल्याचे दिसून येत आहे. मिरचीचे दर गेल्या दोन वर्षापासून हळूहळू वाढत आहे. पूर्वीचे दर सर्वसामान्यांना परवडणारे होते यंदा मात्र दरामध्ये वाढ झाल्याने महागाईच्या भडक्यात लाल मिरचीचा ठसका सामान्य गृहिणींना बसत आहे.

# शाळकरी विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त मिठाई व फराळाच्या किट चे वाटप

## नारायण सेवा मित्र परिवाराच्यावतीने दीपोत्सव साजरा



**हिंगणघाट/जनमाध्यम**

दिवाळीच्या पावन पर्वावर नारायण सेवा मित्र परिवारा ने शाळकरी विद्यार्थ्यांसोबत दीपोत्सव साजरा केला.मित्र परिवाराच्या वतीने हरिराम भाई प्राथमिक शाळा ,अभ्यंकर प्राथमिक शाळा व नेहरू प्राथमिक शाळेत सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या पावन पर्वावर विद्यार्थ्यांना मिठाई, फराळ बिस्किट व चॉकलेट च्या किट वितरित करण्यात आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह ओसांडून वाहत होता.

कार्यक्रमात किरण मुनोत,ज्योती धार्मिक, डॉक्टर दिपाली बोंडे, ज्योत्सना बावणे, राखी बेतवार, लीला वाघमारे,वीरश्री मुडे यांचे हस्ते विद्यार्थ्यांना मिठाई व फराळाची किट प्रदान करून दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता मित्र परिवाराचे पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य केले.

# देवतारे लेआउटमध्ये बिस्कीटात विष मिसळून स्वानांची हत्या

## परिसरात भीतीचे वातावरण

**सेलू/जनमाध्यम**

देवतारे लेआउटमधील रस्त्यावर विषरहित बिस्कीट टाकून अज्ञात व्यक्तीने दोन स्वानांचा बळी घेतल्याची घटना समोर आली आहे. घटनेने परिसरात भय आणि संताप पसरला आहे.

काही दिवसांपूर्वी रस्त्यावर आढळलेल्या बिस्कीटात विष मिसळल्याचे लक्षात आले; ते खाल्ल्यानंतर लगेचच दोन स्वान तडफडून मृत्यू पावले. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार दोन्ही प्राण्यांमध्ये एकाच प्रकारच्या बिस्कीटाचा वापर झाला होता आणि त्यातूनच या कृत्याची स्पष्ट शक्यता उभी राहते. या विषप्रयोगामुळे रस्त्यावर भटकणाऱ्या इतर प्राण्यांना कुत्रे, मांजरी तसेच मैदानात खेळणाऱ्या लहान मुलांना गंभीर धोका संभवण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मुलांनी रस्त्यावर पडलेले अन्न न उचलण्याचे व पालकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.परिसरातील लोकांनी या अमानुष कृत्याविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला आहे आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी तात्काळ सीसीटीव्ही फूटेजतपासणे, स्थानिकांची चौकशी करणे आणि संदिग्ध व्यक्तींचा शोध घेणे आवश्यक असल्याचे नागरिक म्हणतात. सर्वजनांनी रस्त्यावर पडलेले अन्न न उचलण्याचे, संशयास्पद बाब लक्षात आल्यास तत्काळ पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# शेत पिकाच्या ओलीताकरता कालव्याचे पाणी लवकर सोडा

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील शेत पिकाच्या ओलीताकरता ऊर्ध्व वर्धा डावा कालवा तसेच आष्टी व मलकापूर तलावाचे पाणी तातडीने सोडण्याची मागणी भाजपा नेते अशोक विजयकर यांचेसह भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी आ. वानखेडे व आ. केचे यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

आमदार आपल्या दारी या उपक्रमाअंतर्गत तहसील कार्यालय आष्टी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला आ. वानखेडे व आ. केचे आले असता यावेळी भाजपा नेते अशोक विजयकर, भाजपा जिल्हा महामंत्री कमलाकर निंभोरकर,तालुका अध्यक्ष सचिन होले,तालुका सरचिटणीस देवानंद डोळस, युवा मोर्चा अध्यक्ष अनिरुद्ध दंडाळे,राजेश ठाकरे, प्रशांत काकपुरे, नरेंद्र भनेरकर, अरूण घोडीले,अजय लेकूरवाळे, उत्तम बरगे,आशिष खोपे,अविनाश कदम,साहिल ठाकरे, प्रशांत ठाकरे, अनिल ईखार यांचेसह विविध पदाधिकाऱ्यांनी दोन्ही नेत्यांची भेट घेवून निवेदन दिले आणि कालव्याचे पाणी तातडीने सोडण्याची मागणी केली.आष्टी तालुक्यात ६ ऑक्टोबर पासून मान्सून ने माघार घेतल्यानंतर तापमानात प्रचंड वाढ झाली, वातावरणात उकाडा वाढला त्यामुळे पिकाचे ओलीत करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. पिकावर पाण्याचा ताण पडत असल्याने पिक करपून जाण्याची शेतकऱ्यांना भीती आहे. पाटबंधारे जलसंपदा विभागामार्फत उर्ध्व वर्धा डावा कालवा तसेच मलकापूर व आष्टी तलावाचे पाणी हे साधारणपणे दरवर्षी १५ नोव्हेंबर पासून कालव्याद्वारे सोडले जाते. सध्याचे वाढते तापमान व वातावरणातील उकाळा लक्षात घेता पाणी त्वरित न सोडल्यास पीक करपून जाईल आणि आधीच सोयाबीन पिकाने उध्वस्त झालेल्या शेतकऱ्याचे कापूस व तूर पीकही धोक्यात येईल.

खरीप हंगामातील सोयाबीन पिकाने धोका दिल्याने असंख्य शेतकऱ्यांनी त्या पिकावर नांगर फिरवून रबीचे पीक घेण्याकरिता रान तयार केले असून हरभरा पिकाकरिता सध्या जमिनीचे ओलित करणे गरजेचे आहे.या सर्व बाबींचा विचार करून जलसंपदा विभागाने कालव्याचे पाणी २० ऑक्टोबर पासून सोडावे अशी निवेदनातून मागणी करण्यात आली आहे.निवेदनाची प्रत ऊर्ध्व वर्धा डावा कालवा विभाग अमरावतीचे कार्यकारी अभियंता, जलसंपदा पाटबंधारे विभाग आर्वीचे अभियंता यांना पाठविण्यात आली आहे.

# शेतशिवारातील विद्युत रोहित्र नादुरुस्त असल्याने शेतकरी त्रस्त

**दहेगाव (गो.)/जनमाध्यम**

लगतच्या मौजा तुळजापूर शेतशिवारातील विद्युत रोहित्र गेल्या ४ दिवसांपासून नादुरुस्त असल्याने शेतकरी त्रस्त झाले आहे. या संदर्भात वारंवार तक्रार करूनही संबंधित लाइनमेन चालढकल करीत असल्याने तत्काळ त्यांच्यावर कारवाई करून बदली करावी, अशी मागणी होत आहे.

या संदर्भात महावितरण कंपनीचे अभियंता यांना भाजपा सोशल मीडियाचे संजय पिसुड्डे व सामाजिक कार्यकर्ते सुनील मिश्रा यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी निवेदन दिले. या निवेदनात शेतातील विद्युत रोहित्र (डीपी) दुरुस्त करून संबंधित वायरमेन यांच्यावर कारवाई करावी व येथून बदली करण्याची मागणी केली आहे. गेल्या चार दिवसांपासून विद्युत रोहित्र नादुरुस्त असल्याने शेतशिवारातील शेतकऱ्यांनी वारंवार तक्रार कर्ज केले. परंतु कोणत्याही प्रकारची कार्यवाही वायरमेन यांच्याकडून झाली नाही. याचा दूरगामी परिणाम शेतीपिकांवर होत आहे. शेतकरी वारंवार विद्युत पुरवठा बंदच्या संदर्भात फोन करूनही फोन उचलत नाही. उचलला तर उद्धटपणे बोलून मोकळे होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास होत आहे. एखाद्या अनुभवी खासगी माणसाला पैसे देऊन वेळीअवेळी विद्युत पुरवठ्याचे काम करावे लागत आहे. असे अनेक दिवसांपासून सुरू असून, अशा उद्धट व कामचुकार कर्मचाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा, आम्हाला आंदोलन करावे लागेल, असा इशारा संजय पिसुड्डे व सुनील मिश्रा यांनी दिला आहे.

# सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचा बक्षिस समारंभ

## सेवानिवृत्त मुख्याध्यापक अतुल होले यांची प्रमुख उपस्थिती

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

येथुन नजीकच असलेल्या लहान आर्वी श्री संत मारोती महाराज देवस्थान आणि श्री संत पांडुरंग महाराज देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचा बक्षीस वितरण समारंभ व सत्कार समारंभ नुकताच अत्यंत उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापण समितीच्या अध्यक्षा अश्विनी चरडे होत्या तर प्रमुख अतिथी म्हणुन लहान आर्वी ग्रामपंचायतचे उपसरपंच अमोल होले, श्री. संत पांडुरंग महाराज देवस्थानचे संचालक



मारोतराव गाडे आणि संत मारोती महाराज देवस्थानचे अध्यक्ष राजेंद्र रेवस्कर तसेच तंटामुक्त ग्राम समितीचे अध्यक्ष प्रमोद गावनेर,पोलीस पाटील देवानंद पाटील, सामाजिक कार्यकर्ते नंदू पाटील व रुपेश चरडे,.नीलिमा देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन सेवानिवृत्त मुख्याध्यापक अतुल होले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. त्यांनी आपल्या प्रभावी भाषणात विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच सामान्य ज्ञान वाढवण्याचे महत्त्व पटवून दिले. प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांना जीवनात स्पर्धा आणि परिश्रमाचे महत्त्व सांगत, यशासाठी चिकाटी आणि आत्मविश्वास आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

स्पर्धेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान प्रमाणपत्रे व आकर्षक बक्षिसे देऊन करण्यात आला.यामध्ये प्रथम बक्षीस ५००० रुपये-स्वस्तिका चरडे ,द्वितीय बक्षीस ३०००रुपये - श्रेया वैराळे तर तृतीय बक्षीस २००० रुपये- स्वरा राऊत आणि चतुर्थ बक्षीस १०००रूपये - नव्या खासबागे तर पाचवे बक्षीस ५०० रूपये -भक्ती कनेर यांना देण्यात आले. या प्रसंगी लहान आर्वी जि.प.केंद्र शाळेतील कर्तव्यदक्ष शिक्षक तथा प्रभावी मुख्याध्यापक श्री मोहन खारकर हे सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा गावकरी पालकांच्यावतीने सेवानिवृत्ती निमित्त सत्कार सुध्दा करण्यात आला.मोहन खारकर हे लहान आर्वी येथील जि.प. शाळेत आले तेव्हा पासुन शाळेचा स्तर उंचावला होता.तसेच शाळेतील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी झाले होते.असे गावकरी बोलत आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उच्चश्रेणी मुख्याध्यापिका तारा राठोड,शिक्षक सुनील केचे, घनश्याम केचे, व सुहास मानकर यांनी विशेष परिश्रम घेतले.सुंदर सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षिका गायत्री भेंडेकर (घुगे)यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुहास मानकर यांनी केले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३२२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# शालेय अभ्यासक्रमामध्ये आता पुन्हा पाठांतर पद्धतीचा अवलंब?

## -शिक्षण आयुक्तांचा विद्यार्थी गुणवत्ता वाढीचा दावा, तर नवीन सूचनांबाबत तज्ज्ञांचे प्रश्नचिन्ह



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील सर्व शाळांसाठी मूल्यमापनाच्या नवीन सूचना शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी जारी केल्या आहेत. त्यात तालुका आणि जिल्हा स्तरावर माध्यम तसेच विषयनिहाय पारंगत शिक्षकांचे गट करून चाचणीसह वार्षिक परीक्षांच्याही प्रश्नपत्रिका शिक्षकांच्या गटाने तयार कराव्यात.

सर्व शाळांमध्ये उत्तर पत्रिकांची तपासणीही नमुना उत्तर पत्रिकांप्रमाणेच असल्याची खात्री करावी. पालकांना शैक्षणिक प्रकियेत समाविष्ट करून घ्यावे, असे म्हटले आहे. मात्र, शिक्षण तज्ज्ञांनी या सूचना म्हणजे पुन्हा पाठांतर पद्धतीकडे वाटचाल असल्याची टीका करीत नवीन सूचनांवर प्रश्न उपस्थित केले आहे.

१७ सप्टेंबरला जारी केलेल्या मूल्यांकनाच्या निर्देशांमध्ये लेखी परीक्षेवरच भर दिला जात असून, विद्यार्थ्यांच्या प्रयोग, निरीक्षण, प्रकल्प, वर्तन, तोंडी उत्तरे व केस स्टडी या ८० टक्के बाबींकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका तज्ज्ञांनी केली आहे. मात्र, शिक्षण आयुक्तांनी या सूचनांचा उद्देश विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती गतिमान करणे आणि पालकांचा सहभाग वाढविणे, असा असल्याचा दावा केला आहे.

**नववी व दहावीसाठी मूल्यमापन निकष निश्चित -**

ज्या तालुक्यातील शिक्षकांनी प्रश्नपत्रिका तयार केल्या तो तालुका बदलून शेजारील तालुक्यात वापराव्यात, असे आयुक्तांच्या सूचनेत सांगितले आहे. शिक्षकांवर विश्वास नाही, हे त्यामागील कारण आहे. तसेच नववी व दहावीसाठी मूल्यमापन निकष एसएससी मंडळाने निश्चित केले आहे.

**लेखी परीक्षा हेच मूल्यमापनाचे साधन-**

लेखी परीक्षा हेच एकमेव मुलांचे मूल्यमापनाचे साधन असल्याचे शिक्षण विभागाला वाटते. तसेच शिक्षण विभागाची पर्यवेक्षण यंत्रणाच मुळी कमकुवत असल्याचा दावाही तज्ज्ञांनी केला. दरम्यान, आयुक्त सिंह यांनी या सर्व मुद्द्यांचाही इन्कार केला. निदान प्राथमिक स्तरावर तरी सार्वत्रिक परीक्षा असू नयेत. शिक्षकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतल्यास सुधारणा होणार नाही.

> आकारिक मूल्यमापनाची प्रश्नपत्रिका जो शिक्षक ज्या वर्गाला शिकवतो, त्यानेच करावी हे योग्य आहे. त्याला त्याच्या वर्गातील मुलांचा स्तर, प्रत्येक मुलाची तयारी आणि त्याने शिकविलेला अभ्यासक्रम याची पूर्ण जाण असायची. खऱ्या अर्थाने अध्ययन निष्पत्तीवर ते मूल्यमापन आधारित होते. त्याला आता फाटा दिला जात आहे.
>
> **-भाऊ गावंडे,** माजी सहसंचालक, शिक्षण विभाग

> पर्यवेक्षकांचे सक्षमीकरण, नियमित भेटी, मार्गदर्शन व तपासणी हाच खरा उपाय आहे. केवळ परिपत्रके, शासन निर्णयांवर हे काम होत नाही. अनेक पर्यवेक्षक मनापासून काम करत नाहीत, काहींना इतर कामांत गुंतविले जाते, पदे वर्षानुवर्षे रिक्त राहतात आणि निष्क्रिय व्यक्तींवर कारवाईही होत नाही.
>
> **- महेंद्र गणपुले,** माजी उपाध्यक्ष, मुख्याध्यापक संघटना

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय रुग्णालयात स्तनाशी संबधीत सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत



**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, शिवाजीनगर, पंचवटी चौक, मोर्शी रोड येथील सर्जरी विभाग व अमरावती सर्जिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर, २०२५ या दरम्यान स्तनाशी संबंधीत सर्व प्रकारचे आजारांवर (जसे गाठी व कॅन्सर) तज्ञ डॉक्टरांकडून मोफत व माफक दरात उपचार केल्या जातील. त्यामध्ये शस्त्रक्रिया मोफत करण्यात येतील व लागणा-या आवश्यक तपासण्या अतिशय अल्पदरात करण्यात येईल. रूग्णांची तपासणी डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालयाचे ओ.पी.डी. क्रमांक ०४ येथे सकाळी ०९ ते दुपारी ०१ वाजेपर्यंत केल्या जाईल.

अमरावती जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील रूग्णांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, पदाधिकारी, सदस्य, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे तसेच सर्जरी विभाग प्रमुख व अमरावती सार्जिकल असोसिएशनचे पदाधिकारी यांनी केले आहे.

# मल्लखांब कसरतपटूंनी साजरा केला आगळावेगळा दिवाळी उत्सव



**अमरावती/प्रतिनिधीः-** शरीराची समृद्धी आणि बळकटी ही केवळ व्यायामातूनच प्राप्त होते. दिवाळीच्या तेजासारखे बलिष्ठ शरीर हे उत्तम आरोग्याचे प्रतीक असते. याच विचारातून 'द विनर अकॅडमी' येथे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दीपोत्सव आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

या वेळी पारंपरिक दिव्यांची आरास न करता, नियमित मल्लखांबचे प्रशिक्षण घेणाऱ्या कसरतपटूंनी आपल्या कलाकौशल्याच्या माध्यमातून दीपावलीचा प्रकाश पसरवला. मल्लखांब खेळत असताना त्यांनी विशेष प्रकारे दिव्यांची रोषणाई केली आणि उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमात मल्लखांब प्रशिक्षिका तेजस्विनी लोणकर तसेच प्रशिक्षक संदीप इंगोले आणि धीरजकुमार काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सरावाचे दर्शन घडवले.

'द विनर अकॅडमी'त मल्लखांबासारख्या पारंपरिक आणि शरीराला घडवणाऱ्या खेळाचे प्रशिक्षण देण्यात येते. या निमित्ताने खेळाच्या माध्यमातून दिवाळीच्या आनंदात भर घालण्याचा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

# श्री हव्याप्र मंडळाला क्रिकेटपटू जितेश शर्मा यांची भेट



**अमरावती/प्रतिनिधीः-** भारताच्या क्रिकेट संघातील युवा क्रिकेटपटू व श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा विद्यार्थी जितेश शर्मा याने सोमवारी सायंकाळी मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके व सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांच्या निवासस्थानी भेट दिली.

यावेळी चेंडके परिवारातर्फे क्रिकेटपटू जितेश शर्मा यांचे स्वागत करीत त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. विशेष म्हणजे, जितेश शर्मा यांनी त्यांचे मित्र व मंडळाचे आंतरराष्ट्रीय समन्वयक प्रा. प्रणव चेंडके यांना स्वाक्षरीसह क्रिकेट चा बॉल भेट दिला.

# ... अखेर 'त्या' महिलेच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

## -रुग्णालयातून उपोषण मंडपात ठेवला होता मृतदेह

**अमरावती /प्रतिनिधीः-** जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करणाऱ्या महिलेचा घरी पडून मृत्यू झाला होता. परंतु, नातेवाइक मागण्यांवर ठाम असल्याने अंत्यसंस्कार लांबले होते. अखेर रविवार, १९ ऑक्टोबर रोजी नातेवाइकांनी महिलेचा मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर अंत्यसंस्कार पार पडले.

शांता उकर्ड अठोर (७२) रा. भोवते ले-आउट, यशोदानगर, अमरावती असे मृतक महिलेचे नाव आहे. शांता उकर्डा अठोर व त्यांची मुलगी विजया उकर्डा अठोर (४४) या दोघी आपल्या काही मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलनाला बसल्या होत्या. दरम्यान, ११ ऑक्टोबर रोजी शांता अठोर या घरीच पडून जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना १२ ऑक्टोबर रोजी उपचाराकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

मात्र, उपचारादरम्यान १३ ऑक्टोबर रोजी त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, मुलगी विजया अठोर यांनी मागण्या मान्य होईपर्यंत मृतदेह न उचलण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे गाडगेनगर पोलिसांनी रात्री धरणे मंडपातून शांता अठोर यांचा मृतदेह ताब्यात घेऊन तो जिल्हा सामान्य रुग्णालयातील शवविच्छेदनगृहात ठेवला होता. त्यांचा मृतदेह रविवारी नातेवाइकांनी ताब्यात घेतला. त्यानंतर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले

# दिपावलीनिमित्त सामुदायिक फटाके फोडण्यासाठी शहरातील विशिष्ट स्थळांची निवड

**अमरावती/प्रतिनिधीः-** दिपावली हा आनंद, प्रकाश आणि उत्साहाचा सण असून, या पार्श्वभूमीवर नागरिकांनी फटाके फोडताना सुरक्षितता, स्वच्छता आणि पर्यावरणाचा विचार करावा, यासाठी अमरावती महानगरपालिकेतर्फे एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. शहरातील विविध भागांमध्ये 'सामुदायिक फटाके फोडण्याकरिता' विशिष्ट स्थळांची निवड करण्यात आली असून, या निर्णयामुळे नागरिकांना ठराविक जागांवर सुरक्षित वातावरणात सणाचा आनंद घेता येणार आहे.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली, सर्व झोन अधिकारी, अग्निशमन दल, पोलीस विभाग आणि आरोग्य विभाग यांच्या संयुक्त समन्वयातून ही ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. नागरिकांची सुरक्षितता, प्रदूषण नियंत्रण व सणातील शिस्त अबाधित ठेवण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, दिपावलीचा सण हा आनंदाचा असला तरी त्यात सुरक्षिततेचे भान ठेवणे तितकेच आवश्यक आहे. फटाके फोडताना अपघात, आगीचे प्रसंग अथवा धूर प्रदूषण यांचा धोका टाळण्यासाठी सामुदायिक पातळीवर फटाके फोडणे हे एक उत्तम पाऊल आहे. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन स्वच्छ, सुरक्षित आणि हरित दिपावली साजरी करावी.

निश्चित करण्यात आलेली सामुदायिक फटाके फोडण्याची स्थळे :झोन क्र. १ (रामपुरी कॅम्प परिसर): वाघमारे चौक मैदान, नवसारी जवळील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, प्रभाग क्रमांक ३, बजरंग नगर, संतोषीनगर, जयसियाराम नगर वस्तीजवळील मैदान.

झोन क्र. २ (राजापेठ परिसर): दसरा मैदान, अंबिकानगर मैदान.

झोन क्र. ३ (दस्तुरनगर परिसर): छत्री तलाव उद्यान समोरील मैदान, वडरपूरा मैदान खुली जागा. झोन क्र. ४ (बडनेरा परिसर): गणेश नगर मैदान, खुली जागा, सावता मैदान जुनी वस्ती बडनेरा. झोन क्र. ५ (भाजीबाजार परिसर): महानगरपालिका झोन क्र.५ कार्यालयासमोरील खुली जागा, आनंद नगर चौक पुलाजवळ, आदिवासी होस्टेल समोरील खुली जागा आणि वल्लभनगर.

या सर्व ठिकाणी अग्निशमन दलाची यंत्रणा, वैद्यकीय पथक, तसेच सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येणार आहे. नागरिकांनी फटाके फोडताना लहान मुलांवर विशेष लक्ष ठेवावे, तसेच इमारतींच्या परिसरात, रस्त्यांवर किंवा गर्दीच्या ठिकाणी फटाके फोडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शहरात स्वच्छतेसाठी अतिरिक्त मनपा पथकेही तैनात करण्यात येणार असून, 'नो प्लास्टिक – नो कचरा' या उपक्रमांतर्गत फटाक्यांच्या अवशेषांची योग्य विल्हेवाट लावली जाईल.

# निराधारांचे आधार ज्योती राठोड व राजू बसवनाथे यांचे कार्य प्रेरणादायी

## -डॉ. सुभाष गवई यांचे प्रतिपादन

**बडनेरा/प्रतिनिधीः-** बेघर, बेवारस, निराधारांना आधार देऊन त्यांच्या अन्न वस्त्र निवारा आणि आरोग्याची काळजी वाहणारे एवढेच नव्हे तर त्यांचा अंत्यसंस्कारविधीची जबाबदारी स्वीकारणारे राजू बसवनाथे व ज्योती राठोड यांचे कार्य खरोखर प्रेरणादायी आहे. बेघर मायबापाची सेवा करणेच पुण्य कर्म असून त्यासाठी मंदिरात जाण्याची काहीच गरज नसल्याचे सांगून राजू बसवनाथे व ज्योती राठोड यांचे कार्य अनुकरणीयप्रिय असल्याचे प्रतिपादन डॉ. सुभाष गवई यांनी केले. ते जागतिक बेघर दिनाच्या कार्यक्रमांत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष समाजसेवक सुदर्शन गांग हे होते.

अमरावती महानगरपालिका अमरावती राष्ट्रीय उपजीविका अभियानांतर्गत पब्लिक एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित आधार शहरी बेघर लोकांसाठी निवारा बडनेरा येथे १० ऑक्टोंबर जागतिक बेघर दिवसानिमित्त समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले नंतर अमरावतीतील प्रसिद्ध गायिका सरिता हनुमंते यांनी आपल्या सुमधुर आवाजाने स्वागत गीत सादर केले यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय शिंदे सहाय्यक आयुक्त मनपा यांनी केले. एक आक्टोंबर



ते १० ऑक्टोबर दहा दिवसीय सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन व्यसनमुक्ती कार्यशाळा आरोग्य तपासणी शिबिर, डोळे तपासणी शिबिर, दंत व मुख रोग चिकित्सा शिबिर, महिला बचत गट वस्तीस्तर संघ व इतर सामाजिक संघटनेचा सहभाग, समाजकार्य महाविद्यालयाचे निवाराभेट, रक्त तपासणी शिबिर, आधार केंद्रातील रहिवाशी आजी-आजोबांचा सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी लिंबू चमचा संगीत खुर्ची जोऱ्याने चालण्याची स्पर्धा नृत्य गीत गायन भजन इत्यादी सुद्धा आयोजित करण्यात आले होते. अशा विविध विषयाला घेऊन हा सप्ताह साजरा करण्यात आला. समारोपिय कार्यक्रमाला कार्यक्रमाचे उद्घाटक सौम्या शर्मा आयुक्त महानगरपालिका अमरावती, तर प्रमुख पाहुणे योगेश पिठे उपायुक्त अमरावती महानगरपालिका , डॉक्टर गोविंद कासट ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ,डॉ.सुभाष गवई अध्यक्ष विदर्भ महारोगी संस्था अमरावती तपोवन, जवाहर गांग, धनंजय शिंदे सहाय्यक आयुक्त मनपा अमरावती नरेंद्र वानखडे उपायुक्त महानगरपालिका अमरावती, श्रीरंग तायडे इंजिनीयर बांधकाम विभाग मनपा अमरावती, राजेंद्र तांबेकर इंजिनियर मनपा बडनेरा झोन अमरावती ,भूषण बाळे व्यवस्थापक ए न्यू एल एम विभाग मनपा अमरावती, ज्येष्ठ पत्रकार सुभाष दुबे , निवारा संचालक राजीव बसवनाथे , व्यवस्थापक ज्योती राठोड, समुदाय संघटिका रेणुका कापूसकर, प्रफुल कुकडे , काळजीवाहक रोहित घोंगडे, विलास थोरात, किशोर मरकाम व निवारावासी बांधव प्रामुख्याने उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजीव बसवनाथे यांनी तर आभार प्रदर्शन ज्योती राठोड यांनी केले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ४५
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर**
**वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा**

**आर.एम.जे.सी.क्र.२६०/२०२५** **ने.ता.१५.१०.२०२५**

**अर्जदार :** १. **अक्षय सुभाष चौधरी (मुलगा),** वय ३३ वर्ष, व्यवसाय- शेती
रा.वाढोणा रामनाथ, ता.नांदगाव खंडे. जि. अमरावती
२. **मोहिनी प्रीतम खडसे (मुलगी),** वय ३६ वर्ष, व्यवसाय- गृहिणी
रा.शिवाजी चौक, वर्धा, ता.जि.वर्धा
३. **अनिता सुभाष चौधरी, (पत्नी),** वय ५६ वर्ष, व्यवसाय- गृहिणी
रा.वाढोणा रामनाथ, ता.नांदगाव खंडे. जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :-** निरंक

ज्याअर्थी **मयत स्व. सुभाष मोतीराम चौधरी यांचा मृत्यू दि.२१/०८/२०२५ रोजी वाढोणा रामनाथ, ता.नांदगाव खडे.,जि.अमरावती येथे मरण पावले आहेत.** त्यांचा कायमचा पत्ता रा.वाढोणा रामनाथ, जि.अमरावती येथील आहे. त्यांना अर्जदार यांच्या व्यक्तीरिक्त कोणीही वारस नाही.अर्जदार हे उपरोक्त मयतांचे कायदेशीर वारस आहेत. उपरोक्त मयतांचे कायदेशिर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत दिनांक **०४.१०.२०२५** रोजी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक **१८.११.२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर,नांदगाव खंडे. येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १६/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक १२.०९.२०२५

आज दिनांक १२.०९.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी, यांनी बोलाविल्यानुसार **ग्रामपंचायत कार्यालय** येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **रेषमा अंजुम मोहम्मद शरीफ** अर्जात नमुद **जन्म**/मृत्यू दिनांक **१९/०७/१९८६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिति देत आहोत.

१. **जन्म** /मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **साऊर** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२. सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटूंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३. सदरील **जन्म**/मृत्यू नोद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करावे)

४.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

**पंचाचे नांव**
१. सौ.पद्माताई सं.मेसकर (सरपंच)
२. श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच)
३. श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार (त.भू.अ.)
४. श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.)
५. श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.स.)

सही,
सौ.पद्मा सं.मेसकर
श्री.अतुल सा.दारोकर
श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार
श्री.कांतीकुमार रा.काळे
श्री.नंदकिशोर भि.वासनकर

समक्ष

शिक्का

निबंधक,
जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत, ब्राम्हणवाडा थडी

**स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा**

दिनांक २८.०९.२०२५

आज दिनांक २३.०९.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी, यांनी बोलाविल्यानुसार **ग्रामपंचायत कार्यालय** येथे हजर झालो. **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **शेख सुलतान शेख रहेमान** अर्जात नमुद **जन्म**/मृत्यू दिनांक **०३/०६/१९७६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१. **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२. सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने **जन्म**/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटूंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३. सदरील **जन्म**/मृत्यू नोद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करावे)

४.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

**पंचाचे नांव**
१. सौ.पद्माताई सं.मेसकर (सरपंच)
२. श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच)
३. श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार (त.भू.अ.)
४. श्री.कांतीकुमार रा.काळे (पो.पा.)
५. श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.स.)

सही,
सौ.पद्मा सं.मेसकर
श्री.अतुल सा.दारोकर
श्री.इजाजोद्दीन मो.इनामदार
श्री.कांतीकुमार रा.काळे
श्री.नंदकिशोर भि.वासनकर

समक्ष

शिक्का

निबंधक,
जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत, ब्राम्हणवाडा थडी



दिवाळी आणि खरेदी हे अतुट नाते आहे। आज दिवाळीच्या पर्वावर शहरातील मुख्य बाजारपेठा गर्दीने फुलल्या आहेत। तर ठिकठिकाणी लागलेल्या दुकानांमध्ये ग्राहकांची गर्दी दिसून येत आहे।
**(छाया प्रदीप इंगोले)**















# ‘ते’ क्रांतिकारक ३ कृषी कायदे परत आणा - अरविंद नळकांडे

## १२ डिसेंबर रोजी दर्यापूर येथे राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन

**दर्यापूर/ वार्ताहर**

२०१४ मध्ये राजकीय कारणांनी देशाच्या सत्तेत पोहचलेल्या नरेन्द्र मोदी यांनी स्वातंत्र्योतर काळात पहिल्यांदा शेतकरी विरोधी धोरणांच्या थेट मुळालाच स्पर्श करीत ते बदलण्याच्या हेतूने २०२१ मध्ये ३ कृषी कायदे आणले होते; परंतु विरोधकांच्या दबावामुळे सरकारला ते तीन कायदे मागे घ्यावे लागले; मात्र आता पुन्हा ते कायदे अंमलात आणावे, अशी मागणी अरविंद नळकांडे यांनी केली आहे. याबाबत १२ डिसेंबर रोजी दर्यापुरात राज्यस्तरीय बैठकीचे आयोजनसुध्दा करण्यात आले आहे.



नीती आयोगाची स्थापना करून २०२० पर्यंत ‘शेतीत नफा वा उत्पन्न कोणत्या उपाययोजना वा बदलातून मिळू शकेल’ याचा जगभरातील तज्ज्ञांशी विचारविनीमय करून सादर करण्याचे काम नीती आयोगाकडे सरकारने सोपविले होते. नीती आयोगाने आपले काम चोखपणे बजावत एक रिपोर्ट केन्द्र सरकारला २०१९ मध्येच दिला होता. ते ३ कृषी कायदे त्याचेच फलीत होय; परंतु विरोधकांनी सरकारवर दबाव आणल्यामुळे ते तीन कायदे सरकारला मागे घ्यावे लागले; मात्र त्या कायद्यांची सध्या गरज असल्यामुळे यासंदर्भात १२ डिसेबर रोजी दर्यापुरात राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शेतकरी नेते व श्रमराज्य परिषदेचे अध्यक्ष अरविंद नळकांडे यांनी एका पत्रकाद्वारे दिले आहे.

# बुधवारी विद्याभारती महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक विद्याभारतीय महाविद्यालयात येत्या २२ ऑक्टोबर रोजी जेम्स अंतर्गत माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याव्दारे माजी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा आपल्या प्रिय महाविद्यालयाशी नातं जोडण्याची आणि नव्या पिढीशी अनुभवांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळणार आहे.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विद्याभारती शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब शेखावत आणि विद्याभारती जेम्सच्या अध्यक्ष मंजरीताई शेखावत यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली तयारीला सुरुवात झाली आहे. संस्थेच्या उपाध्यक्षा मेजर डॉ. मिथिलेश राठौर, सचिव डॉ. अशोक चौहान आणि कोषाध्यक्ष रघुनाथ रोडे यांच्या सहकार्याने हा उपक्रम अधिक प्रभावीपणे पार पडणार आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर यांच्या नेतृत्वाखाली आयक्युएसी संयोजक डॉ. पी. जी. बनसोड तसेच जेम्स समन्वयक एच. के. सिसोदिया कार्यक्रमाचे बायोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता एच. आर. डायरेक्टर प्रा. मनिंदर मोंगा, माजी विद्यार्थी मेळावा संघटनेचे अध्यक्ष डॉ. योगेश आखरे, समन्वयक डॉ. एस. एच. राठोड तसेच कॅम्पस मधील सर्व विद्याशाखेचे विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी परिश्रम घेत आहेत. मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांचे अनुभवकथन, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच सध्याच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी सत्रांचे आयोजन करण्यात येणार असून, महाविद्यालयीन परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाविद्यालयातील शिस्त, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे आज अनेक माजी विद्यार्थी सरकारी सेवेत कार्यरत असून, या मेळाव्याला त्यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या प्रेरणादायी मनोगतांचे श्रवण करण्यात येणार आहे. कार्यक्रमाव्दारे माजी विद्यार्थ्यांमध्ये एकात्मतेची भावना दृढ होऊन महाविद्यालयाच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर यांनी व्यक्त केला आहे.

# वातावरणाच्या बदलामुळे साथीचे आजार बळावले

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात कधी पाऊस तर कधी उन्ह, अशी स्थिती असल्याने डासांचे प्रमाण पुन्हा एकदा वाढले आहे. त्यामुळे खोकला, तापाचे रुग्ण वाढले आहे. शहरातील वेगवेगळ्या रुग्णालयात मोठ्या प्रमाणात पहायला मिळत आहेत. डेंग्यू, चिकनगुण्या, मलेरिया असे आजार होऊ नयेत म्हणून नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, अशी स्थिती सध्या निर्माण झाली आहे.



वातावरणाच्या बादलामुळे शहरासह जिल्ह्यात खोकला, तापाच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे रुग्णालयांत रुग्णांची गर्दी वाढू लागली आहे. या रुग्णांमध्ये लहान मुलांपासून ज्येष्ठांचा समावेश असल्याचे दिसून येत आहे. सध्या ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. त्यात ऑक्टोबर महिना सुरू असल्याने कधी कडक ऊन, तर कधी ढगाळ वातावरण याचा आरोग्यावर परिणाम होत असल्याचे डॉक्टर सांगत आहेत.ढगाळ सद्यस्थितीत वातावरणामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. डासांची उत्पत्ती उघडे रांजण, हौद, पाण्याच्या टाक्या, कूलर, फ्रीजच्या मागील बाजूस, कारंजी, फुलदाण्या, नारळाच्या करवंट्या, प्लास्टिकची भांडी, रिकाम्या कुंड्या, टायर अशा ठिकाणी या डासांची उत्पत्ती होते. टाकाऊ वस्तूमध्ये पाणी साचणार नाही, याकडे लक्ष ठेवावे. आपल्या परिसरात डासोत्पत्ती होऊ नये यासाठी गृहोपयोगी वस्तूची नियमित देखभाल घ्यावी, टाकाऊ वस्तूची विल्हेवाट लावावी, अशा सूचना आरोग्य विभागाच्यावतीने देण्यात येत आहेत.

# आनंदवाडी येथे डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेची विटंबना

-तिवसा शहरातील आंनदवाडी येथील घटना

-शेकडो आंबेडकरी अनुयायीची पोलीस ठाण्यावर धडक



**तिवसा-** शहरातील आनंदवाडी परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेल्या एलइडी बॅनरला दगड मारून प्रतिमेची विटंबना केल्याची घटना रविवार ता.१९रोजी मध्य रात्री ३वाजता दरम्यान घडली. या घटनेने तिवसा शहरातील आंबेडकरी अनुयायीमध्ये संतापाची लाट उसळली असून आरोपी विरुद्ध कारवाई करण्याची मागणी तिवसा पोलीस ठण्यात तक्रारीतून करण्यात आली आहे.

शहरापासून एक किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या आंनदवाडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कमान असून या कमानीवर डॉ.आंबेडकर यांचा फोटो असलेल्या झगझम रोशनाईचे एलइडी बॅनर येथील तरुणांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने लावले होते.याच बॅनरला दगड मारून त्याची तोडफोड करण्यात आली.सकाळी ही बाबत येथील नागरिकांच्या लक्षात येताच हे कृत्य करणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी तिवसा पोलीस ठण्यावर शेकडो महिला, पुरुष,तरुणांनी धडक देत आरोपीला अटक करण्याची मागणी केली असून पोलीसांनी अज्ञात विरुद्ध गून्हा दाखल केला आहे पुढील तपास पोलीस करीत आहे.

# जि.प.तर्फे‘एक दिवा बळीराजासाठी’



**अमरावती/का.प्र.**

जि. प. तर्फे ‘एक दिवा बळीराजासाठी’ या उपक्रमांतर्गत दीपोत्सव साजरा करण्यात आला.

जिल्हापरिषदेच्या आवारात अधिकारी-कर्मचारी यांनी एकत्र येऊन शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या संघर्षमय जीवनात पुन्हा प्रकाश फुलावा, या भावनेने दीप प्रज्वलित केले. ‘एक दिवा बळीराजासाठी’ हा संदेश देत सर्वांनी शेती हे केवळ उत्पादनाचे नव्हे तर जीवनाचे अधिष्ठान आहे, याची जाणीव करून दिली. या उपक्रमाचा उद्देश केवळ दिवाळीचा आनंद साजरा करणे नसून, अतिवृष्टीमुळे नुकसानीला सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांप्रती आपुलकी आणि सहानुभूती व्यक्त करणे हा होता.

यावेळी जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांनी या प्रसंगी सांगितले की, शेतकऱ्यांच्या अडचणी ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रशासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे.दिवाळीच्या या पर्वातआपण शेतकऱ्यांच्या वेदनेत सहभागी होऊन त्यांच्यासाठी एक दिवा लावला, तर तो खऱ्या अर्थाने संवेदनांचा प्रकाश ठरेल. या उपक्रमात विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी सहभाग घेतला. तसेच यावेळी परिसर दीपप्रज्वलनाने उजळून निघाला आणि प्रत्येकाच्या मनात बळीराजाबद्दल आदर, सहानुभूती आणि एकात्मतेची भावना जागवली. ‘एक दिवा बळीराजासाठी’ हे केवळ प्रतीक नव्हे, तर शेतकऱ्यांच्या वेदनेतून प्रकाश शोधण्याचा एक संवेदनशील प्रयत्न आहे, असे उद्गार ’एक दिवा बळीराजासाठी’ या उपक्रमात सहभागी झालेल्या जिल्हा परिषदेच्या अधिकारी कर्मचारी वर्गांनी काढले.

# ‘महावितरण’च्या गो-ग्रीन योजनेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## जिल्ह्यातील दहा हजार वीज ग्राहक झाले पर्यावरणस्नेही

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात १०,९०९ ग्राहकांनी वीज बिलासाठी छापील कागदी बिलाऐवजी डिजिटल पर्याय निवडला आहे. हे ग्राहक ‘महावितरण’च्या गो-ग्रीन योजनेचा लाभ घेत पर्यावरणस्नेही झाले आहे.



त्यामुळे या ग्राहकांची प्रत्येक बिलावर दहा रुपये याप्रमाणे वर्षाला १२० रुपयांची बचतही होत आहे.

‘महावितरण’ने ग्राहकांसाठी पर्यावरणपूरक ‘गो-ग्रीन’ योजना सुरू केली आहे, ज्याचा उद्देश कागदाचा वापर कमी करून पर्यावरणाचे रक्षण करणे आणि डिजिटल माध्यमांचा वापर वाढविणे आहे. या योजनेंतर्गत महावितरण ग्राहकांना त्यांचे वीज बिल ई-मेलद्वारे मिळते, ज्यामुळे कागदी बिलांचा वापर टाळता येतो. या योजनेमुळे झाडे वाचविण्यास मदत होते, कारण प्रत्येक महिन्यात लाखो कागदी

गो-ग्रीन योजनेसाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाइटवर किंवा मोबाइल ॲपवर नोंदणी करण्याची स्वतंत्र सोय उपलब्ध आहे. केवळ ग्राहक क्रमांक सबमिट करावा लागेल आणि छापील बिलाची प्रत रद्द करून संबंधितांना नोंदणीकृत मोबाइल क्रमांक व ई-मेलवर दरमहा बिल पाठविण्यात येईल. नोंदणीकृत मोबाइल किंवा ई-मेल बदलण्याची सोयही ग्राहकांना उपलब्ध आहे.

बिले पाठविण्याची गरज कमी होते. या योजनेमुळे कागदाचा वापर कमी करणे, कागदी बिलांच्या छपाईसाठी आवश्यक असलेल्या कागदाचा वापर टाळून झाडांची कत्तल कमी होते, डिजिटल बिलांसह कागदी बिलांचे वितरण, छपाई आणि वाहतूक यामध्ये होणारा ऊर्जा वापर कमी होत आहे.

## शेफ विष्णू मनोहर यांचा नवा विक्रम

# विक्रमी १५ हजार ७७३ डोसे बनवले

**अमरावती/का.प्र.**

विख्यात शेफ विष्णू मनोहर यांनी अमरावती शहरात सलग २५ तासात एकूण १५ हजार ७७३ डोसे बनवण्याचा नवा विक्रम नोंदवला आहे. विशेष म्हणजे, अमरावतीतनंतर आता ते थेट अमेरिकेत २६ तास डोसे बनवण्याच्या नव्या विक्रमासाठी सज्ज झालेत. यापूर्वी गत वर्षी विष्णू मनोहर यांनी नागपुरात २४ तासात १४ हजार ४०० डोसे बनवण्याचा विक्रम नोंदवला होता. आजच्या या नव्या विक्रमाची राज्यभरात चर्चा आहे.

## अमरावतीनंतर आता थेट ‘मिशन अमेरिका’



शहरात गुणवंत लॉन येथे शनिवारी सकाळी ७ वाजल्यापासून विष्णू मनोहर यांनी सलग २५ तास डोसे बनवण्याच्या विक्रमला सुरुवात केली. रविवारी सकाळी ६ वाजता त्यांनी १५ हजार ७०० डोसे बनवून आपला जुना विक्रम मोडीत काढला. पंचांनी मधात २० मिनिटं ब्रेक दिल्यावर विष्णू मनोहर यांनी गरम तव्यावर पुन्हा चवदार डोसे तयार करून अनेक अमरावतीकरांची सकाळ चवदार केली. ८ वाजता अखेरचा म्हणजे १५ हजार ७७३ वा डोसा विष्णू मनोहर यांनी तयार केला आणि त्यांच्या नव्या विक्रमाचा जल्लोष त्यांचे सहकारी आणि उपस्थित अमरावतीकरांनी टाळ्यांच्या कडकडाटाने केला. याप्रसंगी ‘इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड’चे प्रतिनिधी असणारे पंच प्रवीण राऊत यांनी पदक आणि प्रशस्तीपत्र विष्णू मनोहर यांना बहाल करत त्यांच्या नव्या विक्रमाची घोषणा केली.

# अमरावती जिल्हा कृषी साहित्य विक्रेता सेवा संघ, अमरावती.

नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र /८७७७/ अमरावती
कार्यालय - प्रगती कृषी सेवा केंद्र, तहसिल कार्यालयासमोर अमरावती.

समस्त शेतकरी बांधवांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

- अध्यक्ष - श्री. मिलिंद विलासराव इंगोले, अमरावती. ९८२२२२६३०४
- सचिव - श्री. संजय उर्फ प्रवीण श्री. उंबरकर, अमरावती मो. ९८६००९१२६३
- कोषाध्यक्ष - श्री. वीरेंद्र रामनाथजी शर्मा, अमरावती मो. ९४२२१९००८८

• उपाध्यक्ष : श्री. मनोहर मोहनलालजी अग्रवाल (परतवाडा), श्री. सुहास नारायणराव ठाकरे (मोर्शी), श्री राजेश गौरीशंकरजी अग्रवाल (अमरावती), श्री. सुजित पुखराजजी मुधंडा (धामणगाव रेल्वे), श्री. अभिषेक अरुणराव कडू (अमरावती)
• सहसचिव : श्री. उमेश गोविंदरावजी सोनोने, • सहयोगी खजिनदार : श्री. पंकज बन्सीलालजी गांधी (अमरावती)

: कार्यकारिणी सदस्य :
• श्री. कैलाश बाबूलाल मालवीय (धारणी)
• श्री. जगदीश नरसिंगदासजी सारडा (अंजनगाव सुर्जी)
• श्री. पुरुषोत्तम रतनलालजी अग्रवाल (अचलपूर)
• श्री. गिरीश दिनेशचंद्रजी राठी (वरुड)
• श्री. श्रीकृष्ण भिमरावजी काळमेघ (दर्यापूर)
• श्री. जयेंद्र हरकुलालजी टावरी (चांदूर रेल्वे)
• श्री. सुनीत नामदेवरावजी शिरभाते (नांदगाव खंडे.)
• श्री. अमित गिरीषजी गांधी (तिवसा)
• श्री. योगेश सुरेशचंद्रजी भट्ड (भातकुली)
• श्री. सुनिल सुखदेवरावजी सावरकर (चांदूर बाजार)
• श्री. घनशाम ठाकूरदासजी राठी (अमरावती)
• श्री. राजेश भगीरथजी बजाज (अमरावती)
• श्री. निलेश राधाकिसनजी गांधी (अमरावती)
• श्री. जयेश संजय लड्ढा (अमरावती)
• श्री. निलेश नामदेवरावजी कणेरकर (अमरावती)

अमरावती जिल्हा कृषी साहित्य विक्रेता सेवा संघ, अमरावती

## समस्त जनतेस दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!

--शुभेच्छूक--
सौ. विद्याताई शेषराव शिंदे, सरपंच/उपसरपंच
कु. प्रतिमा जमदाडे, सचिव
तथा सर्व ग्राम पंचायत सदस्य व कर्मचारी वृंद
खिर्डा ता. मालेगांव जि.वाशिम


















































जाहिरात संकलन
दादी मां
ॲड. हरिष पुरोहित,
ता. प्रतिनिधी ,अचलपूर .
मो.९४२२८५८०१४.























# दीपशृंखला उजळे अंगणा...



**'दीपशृंखला उजळे अंगणा, आनंदाची वृष्टी होई।**
**स्नेहसंबंध जुळती नव्याने, प्रेमाची गंध फुलवी।।**
**लक्ष्मीपादस्पर्शाने घर, समृद्धीचा साज चढे।**
**शुभेच्छांचे दीप उजळती, मंगलमय दीपोत्सव घडे।। '**

शब्दांची रांगोळी माझ्या हातून कागदावर उतरता उतरता त्याचा अंगणात दीपांची रांग उजळते जणू प्रकाशाचे मोती जमिनीवर विखुरले गेलेत. त्या तेजात आनंदाची सळसळती वृष्टी होते, जी मनाच्या प्रत्येक कोपऱ्यात झिरपत जाते. प्रत्येक दिवा स्नेहाचा नवा धागा विणतो आणि त्या प्रकाशात प्रेमाचा गंध दरवळतो जणू कोवळं फूल मनातल्या शांत बागेत उमलतं. जिथे लक्ष्मीच्या पावलांनी घरात समृद्धीचं पावित्र्य उतरते तिथे प्रत्येक कोपरा तिच्या स्पर्शाने उजळतो, मग शुभेच्छांचे दीप एकमेकांशी बोलू लागतात आणि त्यांच्या तेलमय वातींतून संवाद झिरपत राहतो आणि त्या संवादातून साकारतो एक मंगलमय दीपोत्सव जिथे प्रकाश फक्त बाहेरच नाही, तर अंतर्मनातही साजरा होतो. हा अर्थ देखील मनाच्या अंगणात सहज रांगोळी रेखून गेला.

माझ्या शब्दात 'दिवाळी'चा अर्थ फारच वेगळा आहे. दिवाळी या शब्दाची सुरुवातच 'दि'ने होते आणि त्या अक्षरातच लपलेली आहे एक गूढ शक्ती 'दिग्विजयाची', हा सण केवळ प्रकाशाचा नाही तर, तो अंधारावर मिळवलेल्या विजयाचा उत्सव आहे. घरातल्या प्रत्येक कोपऱ्यात दीप लावून आपण जणू जीवनाच्या प्रत्येक दिशेला उजळतो भयावर, दुःखावर आणि अस्थिरतेवर विजय मिळवतो. दिव्यांच्या त्या रांगोळीत दिशा हरवलेल्या मनाला मार्ग सापडतो आणि त्या प्रकाशात साकारतो एक 'आत्मविजय', लक्ष्मीचा पावित्र्यस्पर्श केवळ धनसंपत्तीचा नाही तर, तो मनाच्या समृद्धीचा संकेत आहे जिथे, विचार, भावना आणि कृती यांचं एकत्व घडतं. दिवाळी म्हणजे 'दिग्विजयाचा आरंभ' जिथे प्रत्येक दिवा एक यशाची दिशा दाखवतो आणि प्रत्येक शुभेच्छा मनाच्या आकाशात नवा तारा उजळते.

दिवाळीच्या नावातला 'वा' म्हणजे जणू वाटेवरचा प्रवासी जो जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मार्गक्रमण करत आहे. हा प्रवास केवळ भौतिक नाही, तर तो आत्म्याचा आहे. प्रत्येक जन्म म्हणजे एक 'नवे वळण' आणि प्रत्येक मृत्यू म्हणजे एक 'थांबा' जिथे पुन्हा नव्याने सुरुवात होते. ही वाट सरळ नसते, ती वळणदार असते, 'अनुभवांनी भरलेली तसेच भावनांनी ओथंबलेली', सात्त्विकतेच्या दिव्यांच्या प्रकाशात हा वाटसरू स्वतःला शोधतो आणि मग आपल्या कर्माच्या तेजात न्हाऊन अनुभवांच्या वातींनी उजळत जातो. त्याच्या पावलांखाली स्नेह, श्रद्धा आणि समर्पणाचे दीप रचलेले असतात. तो कायम चालत राहतो, कधी थांबतो, कधी हरवतो, कधी स्वतःच्या सावलीतच गोंधळतो पण, प्रत्येक दिवाळी त्याला आठवण करून देते की, 'प्रकाश हेच अंतिम ध्येय आहे आणि अंधार हा केवळ एक टप्पा आहे, अंतिम सत्य नव्हे'. म्हणूनच 'दिवाळी' म्हणजे त्या वाटसरूचा एक थांबा असतो, जिथे तो स्वतःच्या कर्मांची उजळणी करतो आणि पुन्हा नव्या तेजाने पुढे निघतो. हे तेज म्हणजेच त्याचा आत्मप्रकाश आणि ही वाट म्हणजेच जीवनाची लीला. त्या लीलांमध्ये प्रत्येक दीप एक दिशा दाखवतो आणि प्रत्येक वळण एक शिकवण देतो ज्यामुळे दिवाळीच्या त्या प्रकाशात वाटसरू केवळ चालत नाही तो जागृत होतो, उजळतो आणि पुन्हा नव्याने जन्म देखील घेतो नव्या दीपोत्सवाकरिता.

'ळी' म्हणजे 'लिपी' जीवनाची, नियतीची आणि ईश्वरी संकेतांची अदृश्य पण अनुभूतीशील रचना. दिवाळीच्या नावातली 'ळी' म्हणजे जणू एक अदृश्य लिपी असते जी आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षणावर, प्रत्येक श्वासावर, एक अर्थ कोरते. ती लिपी केवळ शाईने लिहिलेली नसते, ती कर्मांनी, भावनांनी आणि नात्यांच्या रेशीमगाठींनी विणलेली असते. ती वाचता येत नाही, पण ती जाणवते दीपांच्या प्रकाशात, रांगोळीच्या रेषांमध्ये. हा 'वाटसरू' जो 'दि'च्या दिग्विजयातून आणि 'वा'च्या जीवनप्रवासातून पुढे आला आहे, तो आता या 'ळी'च्या लिपीत स्वतःचं अस्तित्व शोधतो. त्याला वाटतं की, प्रत्येक दीप म्हणजे एक शब्द आहे, प्रत्येक रंग म्हणजे एक भावना आणि प्रत्येक नातं म्हणजे एक ओळ जी मिळून त्याच्या जीवनाची लिपी घडवते. ही लिपी कधी स्पष्ट असते, कधी धूसर; कधी गहिरा अर्थ सांगते, तर कधी फक्त शांततेचा स्पर्श देते. त्या सप्तरंगी रांगोळीच्या रेषांमधून, त्या तेजस्वी दीपांच्या उजेडातून आणि न सुटणाऱ्या नात्यांच्या रेशीमगाठींतून तो त्या लिपीचा अर्थ शोधू लागतो. ती लिपी त्याला सांगते की, प्रकाशातच अर्थ आहे आणि त्या अर्थातच ईश्वर आहे, कारण जेव्हा मन उजळतं तेव्हा शब्द नव्याने उमटतात. जेव्हा भावना पाझरतात, तेव्हा ही लिपी स्वतःच बोलू लागते. म्हणूनच माझ्या मते 'दिवाळी' म्हणजे केवळ सण नाही ती आपल्या 'जीवनलिपींची उजळणी' आहे. जिथे आपण आपल्या कर्मांची पुनर्रचना करतो, नात्यांची पुनरावलोकन करतो आणि आत्म्याच्या गाभ्यातून उमटणाऱ्या प्रकाशाच्या ओळी पुन्हा एकदा वाचतो. ही उजळणी म्हणजेच 'आत्मप्रकाशाचा उत्सव' आहे जिथे, आपण स्वतःला नव्याने ओळखतो, नव्याने लिहितो तसेच नव्याने जगतो देखील.

म्हणूनच माझ्या हृदयपटलावर कायमच दिवाळी म्हणजे केवळ दीपांचा उत्सव नाही तर ती एक अर्थांची रांगोळी आहे. जिथे 'दि'च्या दिग्विजयात यशाची दिशा आहे, 'वा'च्या वाटचालीत जीवनप्रवासाची गूढता आहे तर 'ळी'च्या लिपीत आत्म्याच्या गाभ्यातून उमटणारा प्रकाश आहे. या तीन अक्षरांनी विणलेली दिवाळी म्हणजे एक 'मोरपंखी रांगोळी' जिथे प्रत्येक रंग एक भावना आहे, प्रत्येक वळण एक शिकवण आहे आणि प्रत्येक दीप एक शब्द आहे. या रांगोळीत स्नेहाचे रंग आहेत, समर्पणाचे वळण आहे आणि आत्मप्रकाशाची झळाळी आहे.

ती रांगोळी केवळ अंगणात नाही, ती मनात सजते की जिथे, विचारांचे मोती, भावनांचे कण आणि नात्यांचे रेशीमगाठी एकत्र येऊन जीवनाची उजळलेली लिपी रेखाटतात. दिवाळी म्हणजे 'त्या लिपीची उजळणी' जिथे आपण स्वतःला नव्याने ओळखतो, नव्याने लिहितो आणि नव्याने जगतो. म्हणूनच, ही दीपशृंखला केवळ उजळतच नाही, तर ती मनाच्या गाभ्यात एक इंद्रधनुषी रांगोळी रेखते, जी काळाच्या पटलावर कायमस्वरूपी झळकते.

**ऋतुजा केळकर**

# प्रकाशाचा महोत्सव

**जैसी पूर्व दिशेच्या राऊळी।**
**उदया येताची सूर्य दिवाळी।**
**की येरही दिशा तियेची कला।**
**काळिमा नाही।**

संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीत दीप, दिव्याचे महत्त्व, दिव्यामुळे उजळणारा प्रकाश अंधःकाराचा नाश यावर अनेक ओव्या लिहिलेल्या आहेत. प्रकाशामुळे साऱ्या जगाचा अंधःकार जसा नाहीसा होतो तसा मनातला अंधःकारही नाहीसा व्हावा आणि आत्मतेजाने आपले जीवन उजळून जावे अशी प्रार्थना केली आहे. पूर्व दिशेला सूर्य उगवताच प्रकाशाचा उत्सव म्हणजे दिवाळी सुरू होते. दशदिशांचा अंधःकार नाहीसा होतो तसा प्राणिमात्रांच्या मनाचा अंधःकार नाहीसा व्हावा असे त्यांचे मागणे आहे. पसायदानातही हे विश्व स्वधर्म सूर्ये पाहो। अशी मागणी ते करतात. हा स्वधर्म म्हणजे मानवता प्राणिमात्रांबद्दल बंधुभाव आणि द्वेष, आसक्ती आणि मोहापासूनची मुक्ती!

साऱ्या देशभरात आणि इंग्लंड, अमेरिका, मॉरिशस, ऑस्ट्रेलिया या देशात जिथे भारतीयांची वस्ती आहे तिथे आपल्या प्राचीन सांस्कृतिक परंपरेनुसार दिवाळीच्या प्रकाश पर्वाचा उत्साहाने प्रारंभ होतो आहे. शरदाच्या पहाटे अमावास्येच्या आदल्या दिवशी पहाटेच घरासमोरचे अंगण, घरेदारे, रस्ते, मंदिरे हे सारेकाही दिव्यांच्या प्रकाशाने झगमटाने उजळून निघते. घरासमोरच्या अंगणात काढलेल्या सप्तरंगी मोहक रांगोळ्या तुळशीवृंदावन आणि घरासमोरच्या अनेक पणत्यांच्या मंद प्रकाशाने आसमंतही प्रकाशमय होते. बालगोपाळांच्या, फटाक्यांच्या आतषबाजीचा आणि घराघरावर टांगलेल्या आकाशकंदिलांच्या लीलया चित्तोभनीय आनंदाच्या वातावरणात सारेच आनंदात रंगून जातात.

नरकासुराचा वध श्रीकृष्णाने केला. त्याने तुरुंगात डांबलेल्या सोळा हजार युवतींची मुक्तता केली. त्याच्या छळाच्या राजवटीतून प्रजा सुटली. तेव्हापासून आनंदसोहळा सुरू झाल्याची कथा प्राचीन पुराणात आहेत तर याच दिवशी प्रभू श्रीराम रावणाचा वध करून सीतेसह अयोध्या नगरीत आले आणि त्यांच्या स्वागतासाठी अयोध्या वासीयांनी गुढ्या उभारत, घराघरावर तोरणे लावत लाखो दिव्यांच्या प्रकाशात त्यांचे स्वागत केल्याचीही कथा आहे. वैदिक कालापासून गेली हजारो वर्षे दिवाळी, धनत्रयोदशी, भाऊबीज, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, पाडवा असा हा पाच दिवसांचा सणांचा समूह हे भारतीय संस्कृती आणि वैभवाचे प्रतीक आहे. दिवाळीच्या दीप महोत्सवाच्या या परंपरेत बदलत्या काळानुसार काही बदल झाले पण दिवाळीचा मुख्य सणाचा हेतू मात्र कायम राहिला. दिवाळीच्या निमित्त नोकरी, कामधंद्यासाठी घराबाहेर असलेली मुले बाळे आवर्जून दिवाळीलाच घरी येतात. आप्तस्वकीय मित्रपरिवाराशी अनोख्या भेटीचा सो-हळा होतो. परस्परांचे क्षेमकुशल विचारले जाते. गोडधोड खाऊ घातले जाते. घरोघरी जाऊन दीपावलीच्या शुभेच्छाही दिल्या जातात. थोरामोठ्यांना नमस्कार करून त्यांचे आशीर्वाद घेतले जातात तर बालचमू आनंदाने वाजवत फटाके, चंद्रज्योतीसह अनेक फटाके उडवत मनमुरादपणे उडवायचा आनंद लुटतात. त्यांना घरचे कुणीही रागावत नाहीत तर महाराष्ट्रात दिवाळीच्या सणात बालगोपाळांकडून किल्ल्यांच्या प्रतिकृती बांधायचीही परंपरा आहे. त्यांचे हे किल्ले पाहणे हा सुध्दा



आनंदाचा सोहळा !

ही दिवाळी साजरी करताना आपण अवघ्या महाराष्ट्रातल्या अतिवृष्टी आणि नद्यांच्या महापुराने घरे, दारे, शेती वाहून गेलेल्या लक्षावधी अन्नदात्या शेतकऱ्यांची आठवण ठेवायलाच हवी. त्यांची ही दिवाळी आनंदाची व्हावी यासाठी त्यांना आपल्यापरीने मदतीचा हात द्यायला हवा. या अन्नदात्याच्या घरासमोर मदतीचीही पणती तेवती ठेवल्यास त्यांना नवनिर्धार, जिद्द आणि आपुलकीही मिळेल. आपण माणुसकीचा नंदादीप जागवत त्यांच्यासाठी सहाय्य करायलाच हवे. मानवता धर्माचा नंदादीप अखंड तेवता ठेवणे हीच आपली खरी दिवाळी.

**श्रीहरी**

# दिवाळी अंक म्हणजे पर्वणीच!

**आ**पल्या देशात दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. आताही देशात दिवाळीची धामधूम सुरू आहे. वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. सर्वत्र दिवाळीच्या खरेदीची धामधूम सुरू आहे. आकाशकंदील, मिठाई, फटाके, नवीन कपडे, नवीन वाहने, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या खरेदीसाठी दुकाने फुलून गेली आहेत. दिवाळीमुळे सर्वांच्या उत्साहाला उधाण आले आहे. दिवाळी म्हटले की गोडाधोडाचा फराळ, आकाशकंदील, पणत्या, नवीन कपडे, नवीन वस्तू असे जे समीकरण आहे तसेच दिवाळी म्हणजे दिवाळी अंक असेही समीकरण आहे.

दिवाळी आली की वाचकांना वेध लागतात ते दिवाळी अंकाचे आणि वाचकांचे पाय आपसूकच दिवाळी अंकाच्या खरेदीसाठी पुस्तकांच्या दुकानाकडे वळतात. महाराष्ट्रात तर दिवाळी अंकाची परंपरा खूप पूर्वीपासून आहे. महाराष्ट्रात पहिला दिवाळी अंक १९०९ साली प्रसिद्ध झाला होता. त्याचे नाव मनोरंजन असे होते. पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध होऊन आज ११६ वर्ष झाली आहेत. आपल्या राज्यात दरवर्षी विविध विषयांवरील दर्जेदार दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. महाराष्ट्रात जवळपास हजाराच्या आसपास दिवाळी अंक प्रकाशित होतात. दरवर्षी त्यात नव्या अंकाची भर पडतेच. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी मेजवानीच. कला, क्रीडा, साहित्य, राजकारण, अर्थकारण, विनोद, कथा, कादंबरी, कविता, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आहार, व्यंगचित्र, भविष्य, चित्रपट, नाटक अशा विविध विषयांवरील दिवाळी अंक वाचणे म्हणजे पर्वणीच. अनेक वृत्तपत्रे आपल्या वाचकांसाठी दिवाळी अंक काढत असतात. यावर्षीही अनेक वृत्तपत्रांनी आपल्या वाचकांसाठी दिवाळी अंक काढले आहेत. फटाके, मिठाई, फराळ यासोबतच दिवाळी अंक ही सुशिक्षित आणि साहित्यप्रेमी घरांसाठी एक आवश्यक घटक आहे.




मधल्या काळात दिवाळी अंकांना घरघर लागली होती. कोरोना काळात दिवाळी अंकाच्या छपाई आणि वितरणाला मर्यादा आल्या होत्या. त्यामुळे तुलनेने कमी दिवाळी अंक प्रसिद्ध झाले होते. असे असली तरी काही संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले अंक ऑनलाईन प्रसिद्ध केले होते. वाचकांना ते डिजिटल प्लॅटफॉर्म वर उपलब्ध झाले होते. काहींनी आपले अंक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून दिले होते. वाचकांनी त्याची प्रिंट काढून ते वाचले होते.कोरोनाचे दुष्चक्र संपल्यानंतर दिवाळी अंकांना पुन्हा सुगीचे दिवस आले. यावर्षी अनेक संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. काहींनी ऑडिओ आणि व्हिज्युअल दिवाळी अंकही बाजारात आणले आहेत. वाचक पूर्वीच्याच उत्साहाने दिवाळी अंकाचे स्वागत करीत आहे.

दिवाळी अंक आपल्या साहित्य संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. दिवाळी अंकामुळे वाचन संस्कृती रुजायला खूप मदत झाली आहे. वाचन संस्कृती रुजवण्यात आणि नव्या पिढीला वाचन संस्कृतीकडे घेऊन जाण्यात दिवाळी अंकांचा मोलाचा वाटा आहे. यावर्षी आपण आपल्या नातेवाईकांना आणि मित्र परिवाराला दिवाळीच्या शुभेच्छा आणि फराळासोबत दर्जेदार दिवाळी अंक भेट द्यावीत. वाचनाची गोडी वाढवण्यासाठी दिवाळी अंक हा चांगला मार्ग आहे. गोडाधोडाच्या फराळासोबतच वाचनाचा हा फराळही दिला तर दिवाळीची गोडी आणखी वाढेल आणि वाचन संस्कृती टिकायलाही मदत होईल.

**श्याम ठाणेदार**

# दिवाळी - एक आनंदोत्सव



**आ**काश कंदिल लागले दारात
**उजळल्या ज्योती दीप अंगणांत**
**सडा सन्मार्जने सजल्या अंगणी**
**आली आली आली सणांची ही राणी**

होय... दिवाळी म्हणजे खरोखरच सर्व सणांची महाराणीच. ती महाराणी म्हणूनच तिचा मोठा थाट आणि ती येते ही अखंड दिव्यांच्या झगमगाटात.ह्या सणाची सुरवात वसुबारसेपासून होते आणि भाऊबीज साजरी केल्यानंतर दिवाळीची सांगता होते. सर्व अबाल वृद्ध, मुले, स्त्रीया ह्यांचा हा लाडका सण. दिवाळी येणार म्हटलं की आवराआवर, रंगरंगोटी. नव्या कपड्यांची, दागिन्यांची, घरातील वस्तूची खरेदीची ही पर्वणी. फटाक्यांची आतिषबाजी अन्? चविष्ट दिवाळी फराळाचा स्वाद हे ह्या सणाचं आणखी एक वैशिष्ट्य.

आपला भारत देश हा कृषीप्रधान देश. आपली थोर संस्कृती सुद्धा सर्वांवर प्रेम करायला शिकवणारी. म्हणूनच की काय वसुबारस ह्या दिवशी आपण गाय आणि वासरू ह्यांची पूजा करतो. त्यांना गोडाचा घास खाऊ घालतो. दुध-दुपत्यासाठी होणारा गायीचा उपयोग, शेतीच्या कामी बैलाची होणारी मदत ह्या गोष्टी लक्षात घेऊन त्या गोधनाची केलेली ही कृतज्ञता पूजा.

धनत्रयोदशीला तिन्ही सांजेला केली जाणारी धनाची पूजा, नैवेद्याला ठेवला जाणारा धने-गुळाचा प्रसाद ह्याला ही फार मोठे महत्त्व आहे. ह्याच दिवशी एक दिवा तयार करून तो यमदेवतेसाठी लावला जातो. दक्षिण दिशा ही यमाची दिशा म्हणून त्या दिवशी त्या दिव्याची ज्योत ही दक्षिणेला केली जाते.

नरक चतुर्दशी हा मुख्य दिवाळीचा पहिला दिवस. ह्या दिवशी पहाटे उठून अभ्यंग स्नान करायचे, नवीन वस्त्रे परिधान करायची. देवदर्शन घ्यायचे मग सर्वांनी एकत्र जमून दिवाळी फराळ करायचा असा हा आनंद साजरा करण्याचा दिवस. ह्या दिवसाची एक पौराणिक कथा जोडली आहे ती अशी की श्रीकृष्णानी अत्याचारी नरकासुराचा वध करून त्याच्या बंदी शाळेतल्या सोळा सहस्त्र कन्यांची मुक्तता केली. तो हा दिवस, दुष्टाचा नाश आणि मुक्तचा आनंद हे या दिवसामागचे आनंद साजरा करण्याचे कारण आहे.

अश्विनातले शेवटचे दोन दिवस आणि कार्तिकाचे पहिले दोन दिवस अशी ही चार दिवसांची मुख्य दिवाळी. अश्विन वद्य अमावस्येला संध्याकाळी घरोघरी, दुकानातून सोन्या-चांदीच्या पेढ्यातून, ऑफिसातून लक्ष्मीपूजन केले जाते. घरातलं सोन, नाणं, रोकड ह्यांची पूजा करतात. व्यापारी सर्व हिशेबाच्या वह्यांचं पूजन करतो. ह्या धनलक्ष्मीच्या पूजनाबरोबरच त्या दिवशी आरोग्य लक्ष्मी (केरसुणी) हिची पण पूजा करतात. लक्ष्मी पूजनानंतर फटाक्यांची अतिषबाजी करून आनंद साजरा केला जातो.

पाडवा म्हणजे बलिप्रतिपदा साडेतीन मुहुर्तातला एक मुहुर्त.ह्या दिवशी अनेक नवे प्रकल्प चालू केले जातात. पाडव्याच्या दिवशी पत्नी पतीला ओवाळते. पती पत्नीला पाडव्याची भेट म्हणून वस्तू, दागिना किंवा साडी भेट देतो.

कार्तिक शुद्ध द्वितीयेलाच यमद्वितीला किंवा भाऊबीज असे म्हणतात. बहिण भावाच्या उत्कट प्रेमाचा हा दिवस. बहिण भावाला स्नान घालते, गोड भोजन देते, ओवाळते आणि भाऊ बहिणीला ओवाळणी घालतो.

दिवाळीच्या सणातला लहान मुला मुलींचा आनंदाचा भाग म्हणजे आकाशकंदिल तयार करणे, किल्ला करणे, त्यावर चित्रे मांडणे, संध्याकाळी दारापुढे छान छान रांगोळ्या काढणे आणि फटाके वाजविणे इ.

दिपावली हा सण सर्वत्र आनंद व उत्साहाने साजरा होतो. परस्परांना भेट वस्तू, शुभेच्छापत्रे इ. देवून आनंद दिला घेतला जातो. अज्ञानाचा नाश आणि ज्ञानाचा प्रकाश देणारी ही दिवाळी सर्वांनाच प्रिय आहे. जो तो आपापल्या परीने ती साजरी करतो आणि आनंद लुटतो. दिवाळी म्हणजे अत्यंत आनंदी. सुखद दिपावलीच्या अनेक सुखद आठवणींपुढे अनेक दिवस मनांत रेंगाळत राहतात.



## 'दीपावली आली'

वाट बघता बघता दीपावली आली ।।
साफ-सुफ करण्याची घाई खूप झाली ।।
वहीमधली चित्रकला भिंतीवर आली ।।
दिवाळीच्या निमित्ताने नक्षीदार झाली ।।
वर्षभर धुळीने सामानं सर्व माखली ।।
दिवाळीमायची कृपा सर्वच साफ झाली ।।
पाहून असं वाटे दिवाळी बरी आली ।।
कितनं चढली असती दिवाळी नसती आली ।।
उंदिरांनी तर घराचे भुयार केले असते ।।
मांजर - उंदराच्या युद्धात सर्वच दंग असते ।।
मच्छरांची बरसात घराघरात झाली असती ।।
ढेकणांनी तर घरात केली असती वस्ती ।।
बेडच्या आतून ढेकणं निश्चितच येणार होते ।।
मच्छर वरून मारा खात्रीने करणार होते ।।
दर दिवशी दवाखाने खच्चून भरले असते ।।
डॉक्टरांचे भाव मग खूपच वाढले असते ।।
बरं आहे दिवाळीमाय वर्षातून एकदा येतं ।।
लोकांचे घरदार आंगण साफ-सफू करून देतं ।।

**प्रा.अरुण बुंदेले,**
अमरावती मो.८०८७७४८६०९

# आली माझ्या घरी ही दिवाळी...



दिवाळी.. वर्षातला मोठा सण, ज्याची आतुरतेने वाट पाहिली जाते, स्वागताची तयारी केली जाते असा सण. 'हसले मनी चांदणे' असा सूर लावत कोजागिरीच्या चांदण्यात भेळ आणि मसाला दूध याचा आस्वाद घेतल्यानंतर ठळकपणे तारीखवारांसह मनात डोकावणारा हा सण. दिवाळीच्या दिवसांत कोणत्याही व्यापात अडकण्याची वेळ येऊ नये यासाठी विचारपूर्वक नियोजन करायला लावणारा सण. तांबडं फुटलं की केशरी पिवळ्या रंगाच्या पायघड्या घातल्या जातात. त्या पार्श्वभूमीवर कौतुकाची निरांजन ओवाळून घेत डोंगराआडून 'तेजोनिधी लोहगोल' असे सूर्यबिंब वर येते, तशी दिवाळी उत्सवी, सजलेल्या वातावरणात हजर होते. ती येण्यापूर्वीच तिच्या येण्याचे पडघम निनादू लागतात. बाहेरून वेगवेगळ्या स्थूल, व्यक्त स्वरूपात ती घरांत डोकावते हे जरी खरं असलं तरी सूक्ष्म, अव्यक्त रूपाने ती 'मनांत' असतेच असते. म्हणूनच काही कारणाने त्या सुमारास आलेल्या बहिणीला कौतुकानं भाऊबीज दिली जाते. ज्या घरांवर दुःखाची छाया आहे तिथे आठवणीने फराळ पाठवायचा आहे, हे गृहीत धरूनच तशी तयारी 'घरांत' केली जाते.

खरं तर दिवाळी आली की परिसर आकाशकंदील, साध्या रंगीत पणत्या, लुकलुकणाऱ्या विजेच्या दिव्यांच्या माळा, मिठाईचे बॉक्सेस, कपड्यांनी भरलेल्या दुकानांच्या शोकेस, रांगोळीचे रंग आणि गर्दीने सजून जातो. तर घरं फराळाच्या पदार्थांनी भरून जातात. म्हणजे दरवर्षी तेच तेच असतं, पण काळानुसार, पिढीनुसार त्यात बदल घडून येतात. म्हणजे वरचं रंगीत कागदाचं वेष्टन वेगळं, आतली वस्तू मात्र तीच! काळाची पाने उलटत अर्धशतक मागे गेलो तर जे दिवाळीचं चित्र दिसायचं, त्यात आता आमूलाग्र बदल झाला आहे.

फराळ म्हणजे फराळाचे जिन्नस घरीच करायचे असतात असा अलिखित नियमच असायचा. त्यामुळे घरांत असलेल्या ज्येष्ठांचा सल्ला घेऊन, मागच्या वर्षीचा अनुभव जमेस धरून पदार्थ बनवले जायचे. सगळ्यांची आवडती चकली प्रत्येक घरांत वेगवेगळ्या चवीत, वेगळ्या रूपात समोर यायची. कुणाची अतिशय खुसखुशीत, कुणाची कुरकुरीत तर कुणाची 'कडक' अवतार धारण केलेली तर कुणाची ठसठशीत मीठ तिखटाने चविष्ट झालेली. कशीही असली तरी मोठमोठ्या पत्र्याच्या डब्यात ती जागा अडवून बसायची. त्यामुळे लहानथोर मनात आलं की चकली तोंडात टाकताना दिसत. घरं संमिश्र गंधानं भरभरून जायची. एका घरात बेसन भाजायला सुरुवात झाली की दुसऱ्या घरातली 'नाकं' वास घेण्याच्या कामात बुडून जायची. घरी केलेलं स्वस्त पडतं, भरपूर होतं हे 'अर्थ' कारण त्याच्यामागे असे. जी गोष्ट चकलीची तीच इतर जिनसांची. घराघरातून आलागेला, पैपाहुणा, शेजारीपाजारी, शेजाऱ्यांचे पाहुणे यांना फराळाचं निमंत्रण असे. आढेवेढे न घेता तेही ज्येष्ठांच्या आग्रहाचा मान ठेवत असत. ताटांत फराळ ठेवलाय आणि सगळे गोल करून त्यावर ताव मारताहेत, असं चित्र आता कागदावर काढलंही जाणार नाही. फराळाचं वाटपही चाले. प्रत्येक घराची 'चव' वेगळी, सुगरणींची अशी जाहिरात होत असे. शिवाय पारंपरिक पदार्थ करण्याची परंपरा जपल्याचा आनंद आणि अभिमान मिरवला जात असे. एवढं मात्र खरं की सारखे सारखे 'हे' पदार्थ होत नसत. त्यामुळे अप्रूप वाटत असे.

आता दिवस बदलले आहेत. करियरच्या 'उंच झोक्या'मुळे 'वेळ' हातात नाही. साहजिकच फराळाचे पदार्थ तयार होताना बघणं, त्यात लुडबूड करणं, 'हात'चलाखी दाखवणं या आनंदाला ग्रहण लागलं आहे. चिवडा, लाडू, चकलीची पाव किलो, अर्धा किलोची पाकिटं घरी आणली जातात. परंतु सगळी सर्वसाधारण एकाच ब्रँडची. स्वतः काहीही करायचं म्हटलं की विचार केला जातो, पण तीच गोष्ट सहज उपलब्ध होत असेल तर मनात इच्छा झाली की लगेच आणले जाते, खाल्ले जाते. मग दिवाळी म्हणून त्याचं फारसं महत्त्व वाटत नाही. मग कौतुकानं खाणं तर दूरची गोष्ट. देणेघेणंही आपोआप मागे पडतं. हातावर ठेवायला जावं तर उमलती पिढी तोंड वाकडं करते. त्यांना हवा असतो पिझ्झा, बर्गर, पावभाजी. त्यामुळे फराळाला बोलावणं ही संकल्पनाच हळूहळू नामशेष होत चालली आहे. त्याऐवजी 'दिवाळी पार्टी' सुरू झाली आहे.

नरकचतुर्दशीचा फराळ तर घरातून रस्त्यावरच होऊ लागला आहे. बापरे, रस्ता फुलतो म्हणजे काय ते त्यावेळी कळतं. कितीही खड्डे पडले असले तरी रस्ते खऱ्या अर्थाने तरुण होतात. हसणं, खिदळणं, गळ्यात गळे घालून मैत्रीचं फोटोसेशन करणं, असं आनंदाला उधाण येतं. कपड्यातील वैविध्य लक्षणीयच. ऊन चढू लागले की रस्ते शांत होतात आणि सगळे वातानुकूलित खोलीत निद्राधीन होतात. चरणे म्हणजे चरणे आणि चारणे संस्कृतीत जसा बदल होत गेला तसा कपडेपटातही झालाय. पूर्वी फक्त तीन चार कपड्यांचे जोड असायचे. त्यामुळे दिवाळीला नवीन कपडे मिळाले की आनंद अवर्णनीय असे. आजकाल कपड्यांच्या रूपात, संख्येत आणि प्रकारात भरघोस वाढ झालेली आहे. कपाटातून कपडे ओघळत असतात. कित्येक दिवसात हवा लागली नाही अशी वस्तुस्थिती असते. एखादा फाटका कपडा 'नवा' म्हणून वापरला जातो. आर्थिक सुबत्ता असली तरी कमी कापडातले 'डिझायनर' कपडे वापरण्याकडेही कल आहे. पण खरेदीशिवाय दिवाळी नाही आणि मॉल मालामाल झाल्याशिवाय रहात नाही.

दिवाळी म्हणजे पाहुणे हे समीकरण पूर्वी पक्कं होतं. काकू, मावशी, आत्या, मामी कोणी ना कोणी तरी दिवाळीला यायचंच. 'सह'वास, 'सह'भाग, 'सह'योग छान जमून यायचा. नात्यांच्या उत्साहामुळे मंतरलेले दिवस असायचे.पुढच्या पिढीत सख्खी भावंडं नाहीत. त्यामुळे एकमेकांत अडकलेली नात्यांची वर्तुळं नाहीत. साहजिकच स्वतःतच रमण्याकडे कल झुकू लागला आहे. त्यामुळे घरी कोणी राहायला आलेलं जसं फारसं आवडत नाही, तसं कोणाकडे राहायला जायला फारसं रुचत नाही. दिवाळीनिमित्त कोणाकडे जाण्यायेण्यासाठी वेळ काढणं हेही स्पर्धेच्या युगात कठीण झालंय. शिवाय सुट्टीच्या तारखा एकमेकांना वाकुल्या दाखवत असतातच. मग सर्वानुमते कुठलं तरी डेस्टिनेशन ठरवून तिथेच एकत्र दिवाळी साजरी करण्याची कल्पना उचलून धरली जाऊ लागली आहे. पायांना चाकं लागलेलीच असतात. धाडधाड सगळे जमतात. अंगतपंगत होण्याऐवजी इच्छाभोजन म्हणजे इच्छा असेल तिथे मांडीवर ताट नव्हे प्लेट घेऊन केलेलं भोजन, हवं ते स्वेच्छाभोजन, खुसखुशीत गप्पा, मधूनच जरा 'गेमचं' खेळणं, छोट्यामोठ्यांचे विविध कलागुण दर्शन होतं. जे 'घरी' व्हायचं ते 'दारी' होतं इतकंच. पण काळानुसार बदल करत जाणं हेही महत्त्वाचं.

दिवाळी म्हटलं की आकाशदिवा हवाच. पूर्वी माळ्यावर आकाशकंदिलाचा सांगाडा जपून ठेवलेला असायचा. त्याला रंगीत कागद चिकटवून वरच्या बाजूला करंज्या आणि खाली झिरमिळ्या चिकटवण्याचा एक सोहळाच असायचा. अर्थात त्यात होणारा वेळेचा अपव्यय, आता कसा परवडणार, हे बरोबरच आहे.प्रत्येक घरासमोर दिसणारी मान मोडून काढलेली ठिपक्यांची रांगोळी आता सार्वजनिक चौकात वेगळ्या रूपात रंगू लागली आहे. दोन बोटांच्या चिमटीतून पडण्याऐवजी पाच बोटांच्या सहयोगाने ती आकारास येऊ लागली आहे. रेडीमेड किल्ला ही कल्पना मात्र अजून प्रत्यक्षात उतरलेली नाही. त्यामुळे मनसोक्त मातीत खेळण्याची हौस भागविण्याची हवी तेवढी संधी आहे. एकेकाळी पोस्टकार्डवर चित्र काढून भेटकार्ड तयार करण्याची अनोखी प्रथा होती. शुभचिंतनाबरोबर ख्यालीखुशालीही आवर्जून विचारली जात असे. या 'हळव्या' भेटकार्डानंतर 'तयार' शुभसंदेश लिहिलेली छापील भेटकार्डे पाठवली जाऊ लागली. आता तर मोबाइलमुळे 'सर्वांसाठी' एकाच क्लिकवर शुभेच्छा पाठवल्या जातात. खरं तर दिवाळी म्हटलं की फराळ, नवीन कपडे, आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, सगळं थोडसाफार फरकाने दरवर्षी तेच तेच असतं. तरीही आपण 'दिवाळी सण मोठा, नाही आनंदा तोटा' असं म्हणतो. कारण आपण मनाने तसं ठरवलेलं असतं की आज दिवाळी आहे, आनंदाचा दिवस आहे. वास्तविक सकाळी उजाडल्यापासून संध्याकाळी मावळेपर्यंत दिवसामध्ये काहीच फरक नसतो. फरक असतो आपल्या 'मनात' जे- आपल्या हातात असते. म्हणूनच घरातील अवकाशात दुःखाचे ढग जमलेले असतानाही पहिला पाडवा म्हणून घरी आलेल्या लक्ष्मीला चांदीचं ताट, रांगोळी काढून, शास्त्र म्हणून खीरपुरण करून जेवायला बसवतो. कारण ही आनंदाची 'दिवाळी' आहे. दरवर्षी या आनंदाची पुनरावृत्ती व्हावी म्हणून गुणगुणत राहतो की, 'आली माझ्या 'घरी' ही दिवाळी.'

**सुचित्रा साठे**

# दिवाळीत घरात सकारात्मक आणि समृद्ध वातावरण टिकवून ठेवण्यासाठी..



**दिवाळीच्या दिवशी काही कामे टाळली पाहिजेत, ज्यामुळे घरातील वातावरण चांगले राहील**

**दिवाळीच्या धूमधडाक्यात मान्यता संपूर्ण भारतभर सध्या दिवाळीचा भव्य उत्सव चालू आहे. या पर्वात विविध रीती-रिवाज पाळले जातात आणि काही गोष्टी करू नये असे म्हणतात.**

**पूजा साहित्यातील बंधन मान्यतेनुसार दिवाळीच्या दिवशी घरातील पूजा करण्यासाठी लोखंड, स्टील, प्लास्टिक किंवा काचेची भांडी वापरणे टाळले पाहिजे. या दिवशी तांबे, पितळ आणि चांदीच्या भांड्यांचा वापर केला जाऊ शकतो.**

**घराची स्वच्छता अनिवार्य दिवाळीच्या दिवशी संपूर्ण घर स्वच्छ करणे आवश्यक आहे. पूजास्थळी किंवा घरात चप्पल-बूट, कचऱ्याचे डबे अशा अशुद्ध वस्तू ठेवू नयेत.**



**घरातील महिलांचा सन्मान दिवाळीच्या दिवशी कुणाचाही अपमान करणे टाळले पाहिजे, विशेषतः घरातील महिला आई, बहीण, मुलगी आणि पत्नी यांचा सन्मान करावा.**



**पैशांचे व्यवहार टाळावे मान्यतेनुसार दिवाळीच्या दिवशी कोणालाही पैसे देणे किंवा घेणे टाळावे. पैशांचे व्यवहार दिवाळीनंतर करणे सोयीस्कर ठरते. दिवाळी दिवशी उधार घेणे किंवा देणे, व्यक्तीला संपूर्ण वर्षभर कर्जात बुडवू शकते.**

**तामसिक पदार्थांचा त्याग दिवाळीच्या दिवशी मांस, मद्य किंवा मंदिराशी संबंधित तामसिक पदार्थांचे सेवन करणे टाळले पाहिजे.**

**पारंपरिक पोशाख आणि रंग दिवाळीच्या दिवशी पारंपरिक पोशाख करणे महत्त्वाचे आहे. या दिवशी पूजा करताना काळ्या आणि निळ्या रंगाच्या कपड्यांचा वापर टाळावा असे म्हटले जाते.**





# दिवाळी कशाला हवी..



दसरा ते दिवाळी हा काळ मराठी माणसाच्या वर्षभराच्या धबडग्यात सगळ्यात आनंदाचा. कोणतेही कर्मकांड नसलेले आणि मंगलमय उत्साह वाढवणारे असे हे दोन सणांच्या मधले दिवस. पाऊस संपलेला असतो. थंडीला सुरुवात होत असते. वातावरणात एक प्रकारची उत्फुल्लता असते आणि सगळे जण या आनंदाच्या उत्सवाच्या तयारीला लागतात. गेल्या काही वर्षांत ही तयारी वेगळी करावी लागतच नाही, कारण अनारसे, चिरोटे, शंकरपाळे हे पदार्थ फक्त दिवाळीतच खात असत, यावर आजच्या तरुणांचा विश्वास बसेल, असे वाटत नाही. किंवा त्यापैकी काही जणांना, हे पदार्थ दिवाळीचे म्हणून माहीतच नसले, तरी हरकत नाही. कपड्यांची खरेदी वर्षातून दोनच वेळा करण्याचे दिवस संपले आता. दिवाळी आणि वाढदिवस या मुहूर्तांना आता तसा अर्थही उरलेला नाही. वर्षभर सगळे मॉल कसे फुल्ल झालेले असतात. घरी, दारी, कार्यालयात आणि अगदी प्रवासातही हातातल्या मोबाइलवर खरेदीचा धूमधडाका वर्षभर साजरा होणाऱ्या या काळात कुणाला दिवाळीची वाट पाहणे हा एके काळी खरेदीच्याही आनंदाचा भाग होता, हे कदाचित खरेही वाटणार नाही. फटाके, फराळ आणि कपडे या सगळ्यामुळे वातावरणच आनंदी होई. आता नोकरीच्या दिवसातले बारा तास असतात आणि ती केव्हाही जाण्याची सतत भीती असल्याने दिवाळीच्या निमित्ताने रजा घेण्याची सोयही राहिलेली नाही. काळ बदलला, हे खरे. पहाटे उठून फटाके उडवणे आणि घरातल्या सगळ्यांबरोबर एकत्र राहून दिवस घालवणे, ही आजकालची चैन झाली आहे. अभ्यंगस्नान करून पहाटे पहाटे घराबाहेर पडून एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमाला हजेरी लावणे हा बदल आता सगळ्यांच्याच अंगवळणी पडू लागला आहे.

आपण आता सगळेच उत्सव घरातून बाहेर काढू लागलो आहोत, याची ही स्पष्ट दिसणारी खूण. जगण्याच्या धावपळीत संगीताचा आनंद लुटणे हे निर्व्याज आनंदाचे ठिकाण असते. जगण्याच्या प्रत्येक पायरीवर भारतीय संस्कृतीने संगीताची संगत घेतली आहे. आनंदाच्या क्षणी मनाच्या शांतावस्थेत माणसाला संगीत जेवढे श्रीमंत करते, त्याची सर अन्य कोणत्याच भौतिक गोष्टींना वा वस्तूंना येऊ शकत नाही. आपल्या लोकसंगीतात निसर्गाच्या या सगळ्या घडामोडींचे स्वरवर्णन करण्याची क्षमता आहे. पंडित कुमार गंधर्वांनी सादर केलेल्या 'गीतवर्षा', 'मालवा की लोकधुनें' यांसारख्या केवळ लोकसंगीताशी जवळिकीचे नाते सांगणाऱ्या कार्यक्रमांनी, आपला सगळा सांस्कृतिक आसमंत या स्वरांनी कसा भरून राहिला आहे, याचे मनोज्ञ दर्शन घडवले आहे. केवळ संवेदना चेतवणारे हे संगीत जनमानसाच्या जगण्याचा अविभाज्य भाग बनले ते या लोकसंगीतामुळेच. नवरात्रातल्या भोंडल्याची गाणी असोत की वर्षाऋतूचे आगमन सांगणारी जनसंगीतातली गीते असोत, ती माणसाचा निसर्गाशी असलेला अतूट संबंध स्थापित करत असतात. त्यामुळेच दिवाळीच्या वातावरणात संगीताचे श्रवण ही आनंदमयी घटना असते. गेल्या काही वर्षांत पहाटेचे आणि उत्तररात्रीचे संगीत जाहीरपणे ऐकण्याची सोय राहिलेली नाही. या कार्यक्रमांनी तीही काही अंशी भरून निघते. परंतु त्याचेही एक अर्थशास्त्र असते. बाजारी असलेल्या मंदीने या कार्यक्रमांच्या प्रायोजकत्वालाही ओहोटी लागलेली आहे. यंदा या कार्यक्रमांची संख्या रोडावली. राजकीय पक्षाचे नेते अशा कार्यक्रमांचे प्रायोजक असण्याची रीत. पण यंदा तेही सगळे निवडणुकीच्या रणधुमाळीत अडकलेले आणि निकाल काय लागेल, याची निश्चिती नसल्याने निकालापाठोपाठ कार्यक्रम ठरवायची त्यांनाही धास्तीच. त्यामुळे यंदा अशा कार्यक्रमांनी साजऱ्या होणाऱ्या दिवाळीच्या आनंदाला आर्थिक अरिष्टाची किनार आहे खरी. त्याच्या जोडीला राज्याच्या अनेक भागांत आलेल्या पुरांचीही एक हळवी किनार यंदाच्या दिवाळीला आहे, हे विसरता येत नाही. जगता जगता जमवलेले सगळे वाहून गेल्यानंतर येणारी विषण्णता आणि वैराग्य भाळी लिहिलेल्या राज्यातील लाखो नागरिकांसाठी यंदाची दिवाळी अशी खिन्न आहे.

गेल्या दोन-तीन दशकांचा विचार करायचा, तर दिवाळी पहाटच्या कार्यक्रमांनी महाराष्ट्रात नवाच पायंडा पडला. घरातली दिवाळी आपण सगळे जण घराबाहेर सुखाने साजरी करू लागलो. फराळाचे पदार्थ बाराही महिने मिळू लागले. वर्षाकाठी किमान दिवाळीला कपडे खरेदी करण्यातला आनंद ऑनलाइन खरेदीने हिरावून घेतला. घरबसल्या खरेदीने रस्तोरस्ती होणाऱ्या वाहतूक कोंडीतून सुटका झाल्याचा आनंद अधिक असल्याने त्याकडे वाढलेला कल समजून घेण्यासारखा ठरू लागला. एरवी मुहूर्तावर खरेदी करण्याचे समजही नव्या बाजारव्यवस्थेने पालटले. वाहन खरेदी असो की घर खरेदी, गेल्या काही वर्षांत अशा खरेदीचे मुहूर्तही बावचळू लागले. यंदा दिवाळीच्या आनंदाला चिंतेने ग्रासले असले, तरीही माणसे आनंदाची नवनवी ठिकाणे शोधतच असतात. त्यांना करमणुकीच्या पलीकडे जाऊन अधिक समृद्ध होण्यात रस असतो. वाचन, श्रवण, भटकंती, नव्या ठिकाणांचा शोध अशा सगळ्यांमध्ये माणसे आपले सुखनिधान शोधत असतात. त्यांना मनाच्या तळातली विश्रांती हवी असते. ती मिळण्यासाठी केवळ पैसे उपयोगी पडत नाहीत. त्यासाठी स्वस्थचित्तता हवी असते. ती शोधणे हे आताच्या काळातले सगळ्यात मोठे आव्हान ठरते आहे.

उत्कटता हा मानवी मेंदूला मिळालेला वर आहे. तो वर आहे, हे ज्यांना कळले, त्यांना जगण्यातला उत्साह, त्यातून मिळणारी ऊर्जा आणि त्या ऊर्जेतून निर्माण होणारा आनंद यांची साखळी बनवता येते. जीवनातला असा उत्कट आनंद टिकाऊ असतो, त्यात पुन:प्रत्ययाची शक्यता असते. केवळ जाणिवेनेही तो मिळवता येतो. मात्र त्यासाठी आपल्याला स्वतःची तयारी करावी लागते. ही तयारी पाठ्यपुस्तकातून किंवा एखाद्या शिकवणीतून होत नाही. आनंद मिळवण्याच्या क्षमता वाढवण्यातूनच हे घडू शकते. त्यासाठी गृहपाठ नाही, की परीक्षा नाही. उत्तीर्ण होण्याचेही बंधन नाही. हवी फक्त मनाची तयारी. मेंदूच्या मदतीने आनंद मिळवू लागल्यावर मग तो किती अक्षय्य असतो, हे सहजपणे लक्षात येऊ लागते. संपन्नता केवळ इंद्रियांतून मिळत नाही. त्यापलीकडे असलेल्या सर्जनाचा अनुभव संपन्नता देतो. इंद्रियांना होणारा आनंद त्यामुळे अधिकच खुमासदार होतो. सुवास, चव, स्पर्श या प्रत्यक्ष आनंदाच्या, तर श्रवण आणि दर्शन या अप्रत्यक्ष आनंदाच्या गोष्टी. त्यातले तारतम्य कळले की सगळेच सोपे होऊन जाते. प्रत्यक्षातल्या आनंदाला जेव्हा उत्कटतेची झालर येते, तेव्हा तोच आनंद आत्मनिरपेक्ष ठरतो आणि आपल्याला संपन्न बनवतो. असे संपन्न होण्याची इच्छा नसलेला समाज आता वाढणे हा खरा धोका आहे. समाजाला त्यातला खरेपणा समजणे आवश्यक अशासाठी आहे, की त्यामुळे त्याला भवतालाचे खरे भान प्राप्त होते. इंद्रियांच्या आनंदाला या उत्कटतेची जोड मिळण्यासाठी पाश्चात्त्य देशांत केवढे प्रयत्न होत असतात. त्याकडे मात्र आपण ढुंकूनही पाहत नाही. मग इतिहासाची उपेक्षा होते, भूगोल ऑप्शनला पडतो, कला विषयांना उत्पन्नाची साधने ठरत नाहीत, नागरिकशास्त्र तर पाठ्यपुस्तकापुरतेच उरते. असे जगायचे, तर त्याला दिवाळी कशाला हवी, असा प्रश्न कुणालाही पडू शकतो. परंतु तरीही आपल्या सांस्कृतिक भवतालात या दिवाळीला महत्त्व उरतेच. मनाची उभारी वाढवण्यासाठी, जगण्याच्या दुर्दम्य इच्छांच्या पूर्तीसाठी आणि जगण्याच्या समृद्धीसाठी ही दिवाळी आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात यायलाच हवी असते. दिवाळीचा हा सांगावा ऊर्मी आणि विश्वास वाढवणारा ठरो, एवढीच कामना याप्रसंगी करायला हवी.

**संग्रहित लेख**

## ग्रामपंचायत खल्लारच्या वतीने समस्त नागरिकांना दिपावली व नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

-ःशुभेच्छुक ः-

आरिफ शहा युनूस शहा (सरपंच ), सौ पूजाताई विजय खंडारे (उपसरपंच ), श्री के. एन. घोंगळे (ग्रामविकास अधिकारी ) ग्रामपंचायत सदस्य सर्वश्री सलिम बेग नज्जू बेग, श्री योगेश अरुणराव मोपारी, हिना परविन जमिल शहा, सौ मालतीताई बापूराव राक्षसकर, सौ रजनीताई प्रकाश इंगळे, श्री गजानन आप्पा हिंगमिरे(ग्रामपंचायत कर्मचारी)इरफान शहा (संगणक परिचालक) तथा समस्त गावकरी मंडळी खल्लार, लांडी, मलकापूर ता. दर्यापूर जि. अमरावती

## नवदुर्गा एंटरप्रायजेसतर्फे दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

**श्री गोपाल रामदासजी भोंडे**
मो. नं. ९५७९५८८३१२ C/o- भोंडे कॉटन ट्रेडींग सर्व प्रकारचे धान्य विकत घेतल्या जाईल.
.टिप :-आमच्याकडे कपाट, शोकेस, सोफासेट, टेबल फॅन, मिक्सर, इलेक्ट्रॉनिक्स, फर्निचर योग्य दरात मिळेल .
**प्रो. प्रा :-अनिकेत गोपालजी भोंडे**
मो. नं. ७०३८१५८८५४ पाहुणे बाबा मंदिरासमोर खल्लार ता. दर्यापूर

## श्री गुरुदेव ॲग्रो एजन्सीकडून सर्व शेतकरी, शेतमजूर, व नागरिकांना दिपावली तथा नविन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

श्री अमेय शिवदासरावजी मोपारी
मो. नं. ९५५२२८८२२३

ऋषिकेश शिवदासरावजी मोपारी
. मो. नं. ९१४६५५७३४६

श्री गुरुदेव एग्रो एजन्सी
खल्लार फाटा, ता. दर्यापूर जि. अमरावती

टिपः- आमच्याकडे सर्व प्रकारचे रासायनिक खते, बी बियाणे, किटक नाशक योग्य दरात मिळतील

## दिवाळी व नववर्षाच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

**सोपान पाटील गोंडचोर**
अध्यक्ष स्वामी विवेकानंद एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट, आसाळा ता. दर्यापूर संचालक शिवराय फायनान्स सर्विसेस, दर्यापूर मो न ९६०४९०८०२१, ८२०८१५०६३४

## किसान समृद्धी कृषी सेवा केंद्राकडून सर्व शेतकरी, शेतमजूर, व नागरिकांना दिपावली तथा नविन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा ही दिपावली सर्व नागरिकांना सुख, समृद्धी व भरभराटीची जावो हीच सदिच्छा...

शुभेच्छुक



श्री गोवर्धनसिंहजी सोहनसिंहजी शेखावत



श्री रंजितसिंह गोवर्धनसिंहजी शेखावत

मो. नं.९८८१६९०८९७
किसान समृद्धी कृषी सेवा, केंद्र
चंद्रपूर (खल्लार) ता. दर्यापूर

टिप :-आमच्याकडे सर्व प्रकारचे बी बियाणे, रासायनिक खते, किटक नाशक योग्य दरात मिळतील.



समस्त देशवासीयांना दिपपर्व तथा नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा ही दिवाळी सर्वांना सुख समृद्धी व भरभराटीची जावी ही आई भवानी चरणी प्रार्थना

शुभेच्छुक

**श्री प्रतिक पाटील राऊत**
युवासेना जिल्हा सरचिटणीस
पंचायत समिती खल्लार सर्कल
ता. दर्यापूर

विर बाजीप्रभू व्यायाम व क्रिडा, मंडळ बेलोरा द्वारा संचालित छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयाच्या वतीने समस्त नागरिकांना दिपावलीच्या व नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा ही दिपावली व नविन वर्ष सर्वांना सुख, समृद्धी व भरभराटीचे जावो हिच सदिच्छा

-ःशुभेच्छुकः-

डॉ. रविंद्र इचे( प्राचार्य),
डॉ हरीश काळे(शारीरिक शिक्षण संचालक )डॉ. भारत कल्याणकर (समाजशास्त्र विभागप्रमुख) , प्रा. विपीन लिल्हारे( ग्रंथपाल )डॉ. प्रविण सदार (इतिहास विभाग प्रमुख) डॉ. आशिष काळे( राज्यशात्र विभागप्रमुख )डॉ. सुवर्णा जवंजाळ( गृह अर्थशास्त्र विभागप्रमुख)व समस्त कर्मचारी, विद्यार्थी वर्ग छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा ता.चांदुर बाजार जि. अमरावती

## सर्व नागरिकांना दर्यापूर शहर व ग्रामिण काँग्रेस कमिटीच्या वतीने दिवाळी व नविन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

**श्री आतिश बबनरावजी शिरभाते**
अध्यक्ष दर्यापूर शहर काँग्रेस कमिटी

आनंदी कृषी कृषी सेवा केंद्र व ट्रेडर्स कडून सर्व शेतकरी, शेतमजूर, व नागरिकांना दिपावली तथा नविन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा ही दिपावली सर्व नागरिकांना सुख, समृद्धी व भरभराटीची जावो हीच सदिच्छा

शुभेच्छुक




**गौरव प्र. सगणे**
संचालक आनंदी कृषी सेवा केंद्र, व आनंदी ट्रेडर्स, उपराई ता. दर्यापूर मो. नं. ८९९९२३९५८६.
टिप :-आमच्याकडे सर्व प्रकारचे बि- बियाणे ,रासायनिक खते, किटकनाशके योग्य दरात मिळतील. तसेच आमच्याकडे सर्व प्रकारचे धान्य सोयाबीन, तुर , चना, कापूस खरेदी केल्या जाईल.

शेतकरी, शेतमजूर व आमचे ग्राहक तथा सर्व नागरिकांना दिपावलीच्या व नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा ही दिपावली सर्वांना सुखाची जावो ही सदिच्छा

शुभेच्छुक

**रामेश्वर जयरामसा पाचकवडे**
**तेजस रामेश्वर पाचकवडे**
**रामेश्वर पाचकवडे ज्वेलर्स**
बाजार चौक,
खल्लार ता. दर्यापूर, जि. अमरावती



समस्त देशवासीयांना दिपपर्व तथा नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा ही दिवाळी सर्वांना सुख समृद्धी व भरभराटीची जावो ही सदिच्छा

शुभेच्छुक


**श्री अंकुश पाटील कावडकर**
युवासेना जिल्हाप्रमुख, अमरावती (उबाठा)




## ग्रामपंचायत कार्यालय, उपराई ता. दर्यापूरच्या वतीने सर्व नागरिकांना दिपोत्सव व नविन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा



निरज प्रभाकर नागे (सरपंच)



सौ अर्चनाताई सुरेंद्र खंडारे (उपसरपंच)



श्री प्रविण पाचघरे (ग्रामपंचायत अधिकारी)

ःशुभेच्छुकः-

सर्वच ग्रामपंचायत सदस्य,ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक व समस्त गावकरी मंडळी, उपराई ता. दर्यापूर जि. अमरावती

समस्त देशवासीयांना दिपावली तथा नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा ही दिवाळी सर्वांना सुख समृद्धी व भरभराटीची जावो ही सदिच्छा

शुभेच्छुक



**सलीमभाई**
**शासकीय ठेकेदार**
दर्यापूर
जि. अमरावती

श्री ट्रेडिंग अँड धान्य अडत दुकान, दर्यापूरकडून सर्व शेतकरी, शेतमजूर व समस्त नागरिकांना दिवाळीच्या व नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा शुभेच्छुक



**श्री गजानन पाटील धुमाळे**
चांदई ता. दर्यापूर
मो. नं ९४२१७८६७५५
टिपः-आमच्याकडे सर्व प्रकारचे धान्य, कपाशी योग्य भावाने खरेदी केल्या जाईल

## नागरिकांना दिपावली तथा नविन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक



**ऋषिकेश पाटील गावंडे**
उपसरपंच ग्रामपंचायत
म्हैसपूर(मोचर्डा )
ता. दर्यापूर
जि. अमरावती

## नागरिकांना दिपावली तथा नविन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा




**श्री अतुल काशीनाथराव सोळंके**
व सोळंके परिवार सामाजिक कार्यकर्ता रा. घडा (सांगवा )
ता. दर्यापूर

सर्व शेतकरी, शेतमजूर, व नागरिकांना दिपावली तथा नविन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा
ही दिपावली सर्व नागरिकांना सुख, समृद्धी व भरभराटीची जावो हीच सदिच्छा

शुभेच्छुक

**श्री ज्ञानेश्वर उर्फ नानाभाऊ मधुसूदनजी धाबे**
तालुकाध्यक्ष काँग्रेस सेवादल, दर्यापूर जि. अमरावती



चांदूरबाजार तालुक्यातील समस्त गॅस धारकांना धनत्रयोदशी व दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा


जी हाँ!

लक्ष–लक्ष दिव्यांनी उजळून निघो ही निशा घेऊनी येवो नवी उमेद नवी आशा!

**HP GAS**

शुभेच्छुक

**कल्पना गॅस सर्व्हीस (H P Gas)**
महाराष्ट्र बँकवर, मेन रोड, चांदूरबाजार, जि. अमरावती
संचालक : कल्पना विलास तायवाडे



-ःशुभेच्छुकः-

**विलास तायवाडे**

शेतकरी, शेतमजूर व आमचे ग्राहक तथा सर्व नागरिकांना दिपावलीच्या व नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा ही दिपावली सर्वांना सुखाची जावो ही सदिच्छा

शुभेच्छुक

**शैलेशभाऊ मेटकर**



संचालक माऊली कृषी केंद्र, खल्लार फाटा
तालुका सचिव युवा स्वाभिमान पार्टी,
दर्यापूर कार्याध्यक्ष
शिव संभाजी स्वराज्य प्रतिष्ठान, दर्यापूर

समस्त देशवासीयांना दिपपर्व तथा नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा ही दिवाळी सर्वांना सुख समृद्धी व भरभराटीची जावो ही सदिच्छा

शुभेच्छुक



**रणविरसिंह शंकरसिंह राठोड**
श्री गजानन ट्रेडर्स अँड कॉन्स्ट्रक्शन कंपनी गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर
रा. बेंबळा बु,
ता. दर्यापूर, जि. अमरावती

## समस्त नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा



**डॉ. श्रेयस गणेशराव काळे**
वैद्यकीय अधिकारी
प्राथमिक आरोग्य केंद्र, चंद्रपूर
(खल्लार )ता. दर्यापूर जि. अमरावती

जाहिरात संकलन :-युवराज डोंगरे, दै जनमाध्यम प्रतिनिधी, दर्यापूर
मो. नं. ९९२३४२१४७६

## दिवाळीची सर्व जनतेला हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

**मुस्तफा बुरानी**
शासकीय कॉन्ट्रॅक्टदार
अमरावती



## ग्रा.पं. बेलोरातर्फे सर्व जनतेस दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

-ःशुभेच्छुकः-



भैय्यासाहेब कडू
सरपंच प्रहार



अतुल भाऊ सिंगन
उपसरपंच प्रहार

सदस्य गन सचिव साहेब कर्मचारी

## समस्त जनतेस दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!



**भारत पुष्पा दिगांबर ब्राम्हणकर**
महामंत्री भाजप यवतमाळ
भोसा,यवतमाळ

जाहिरात संकलनः-युवराज डोंगरे,
दै जनमाध्यम प्रतिनिधी, दर्यापूर
मो नं ९९२३४२१४७६

## चांदूर बाजार व ब्रा. थडी पोलीस स्टेशनकडुन दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा



पीएसआय विनोद इंगळे चांदूरबाजार



हे.कॉ.नितीन डोंगरे बेलोरा बीट



हे.कॉ.सुशिल धवसे ब्रा.थडी पोलीस स्टेशन



हे. कॉ.शेषरावजी कोकरे, बीड जमदार घाटलाडकी ब्राह्मणवाडा पोलीस स्टेशन


यवतमाळ व पुसद जिल्ह्यातील सर्व जनतेस
दिपावली
निमित्त सहृदयी
हार्दिक शुभेच्छा !
आ.किसनराव मा. वानखेडे
आमदार, उमरखेड-महागाव विधानसभा
नितीन सुरेशचंद्र भुतडा


स्नेहाचा सुगंध दरवळला,
आनंदाचा सण आला
प्रार्थना आमची परमेश्वराला,
सौख्य,समृद्धी लाभो तुम्हाला
शुभ दिपावली
मंगळमय शुभेच्छा
प्रतिभा बाळूभाऊ धानोरकर
खासदार चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्र


श्री संत
उद्धव बाबा संस्थान
सौ. सुनिताताई प. जयस्वाल
श्री. पवनभाऊ शा. जयस्वाल
समस्त जनतेस दिपावली च्या हार्दिक शुभेच्छा
व माणकी आंबा येथे होत असलेल्या उद्धवबाबा जन्मोत्सव सोहळ्यास उपस्थित सर्व भाविक भक्तांचे हार्दिक स्वागत...


NABH मान्यता प्राप्त
श्री दत्त हॉस्पीटल अँन्ड रिसर्च सेंटर
(मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल)
राज्वी होंडा च्या बाजुला, आर्णी रोड, वडगांव, यवतमाळ
संपर्क क्र. 9405981010, 8625035910
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा


Somayya
GROUP OF INSTITUTIONS
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
B.Tech
BAMS
B. Pharm | D. Pharm
B.Sc. Nursing


सर्व विद्यार्थ्यांना, वाचकांना दिवाळीच्या मनपूर्वक शुभेच्छा!
Vidhyashri Plus
COACHING INSTITUTE
CBSE AND STATE BOARD [7 DAYS FREE DEMO BATCH]
GRADE:-8th, 9th, 10th
PROF. PRAMOD DERE, ARCHANA DERE
VIDHYASHRI PLUS COACHING CLASSES
Prof.Janhavi Dere
Prof.Pramod Dere


RockWell
सर्व ग्राहकांना
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
रॉकवेल मिनरल्स, एमआयडीसी वणी


दिपावली च्या हार्दिक शुभेच्छा
संजीवन
मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल अँन्ड रिसर्च इंस्टिट्युट, यवतमाळ
रतनलाल प्लॉट, महादेव मंदिर रोड, यवतमाळ- ४४५००१
एकाच छताखाली सर्व उपचार/महात्मा फुले जन आरोग्य योजना कार्यान्वित
/आरोग्य इन्शुरंस सुविधा / शासकीय कर्मचारी प्रतिपुर्ती योजना
संपर्क : 07232 - 256601-09 इमरजन्सी नं. 9552625262
संजीवन नर्सिंग कॉलेज, यवतमाळ (ANM/GNM)
महाराष्ट्र शासन / INC/ MSBNPE मान्यताप्राप्त संपर्क :7350048082


AN ISO 9001-2008 Certified
यवतमाळ जि.प.कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.यवतमाळ र.नं.१०९
आपल्या कष्टाची रक्कम आपण आमच्याकडे ठेवा... आणि बिनधास्त रहा...!
शुभ दिपावली
हार्दिक शुभेच्छा..!


शुभ दीपावली
हे नववर्ष आपणास आनंदी, भरभराटीचे, प्रगतीचे, आरोग्यदायी जावो ह्याच मनोकामना : !
हिराचंद मुणोत मेमोरियल क्रिटीकेयर हॉस्पिटल
सिंघानिया नगर, यवतमाळ


दैनिक जनमाध्यम
दिवाळी विशेषांक निमित्त हार्दिक शुभेच्छा..!
मुदत ठेव (F.D.) योजना
30 ते 45 दिवस 7.00%
46 ते 180 दिवस 8.00%
181 ते 365 दिवस 9.00%
366 दिवसांहून अधिक 10.00%
₹900/-
₹850/-
90 महिन्यात दाम दुप्पट
455 दिवस 10.00%
उपलब्ध सुविधा
वैयक्तिक कर्ज • मुदत ठेव योजना • आवर्त ठेव योजना • पर्यटन कज • व्यवसाय कज • गृहकर्ज
गोदावरी अर्बन
विश्वास तुमचा, जबाबदारी आमची!


दि यवतमाळ अर्बन को ऑप.बँक लि.,यवतमाळ
दत्तोपंत ठेंगडी
गृह कर्ज योजना
८.२५%
पंच परिवर्तन
कर्जाचे अत्यंत माफक व्याज दर ८.२५%* पासून पुढे


सर्व नागरिकांना
शुभ दिपावली
डॉ.विजय मुन सरांचे
साईश्रध्दा
मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल अँन्ड रिसर्च इन्स्टिट्युट, यवतमाळ
उपलब्ध सुविधा
डॉ.विजय शं. मुन डॉ.पुजा विजय मुन सुशांत बाला
महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ तसेच सर्व कंपनीचे इंन्सुरंस सेवा
...हॉस्पीटलचा पत्ता ....
सत्यसाई ज्योत मंगल कार्यालयाजवळ,
आर्णि नाका, यवतमाळ 9850708957


सर्व नागरिकांना व कर्मचारी यांना
हार्दिक शुभेच्छा
मुकेश हरीचंद्र राठोड
अध्यक्ष जागृती बहुउद्देशीय संस्था धानोरा( खुर्द) तालुका दिग्रस जि.यवतमाळ


दीपावलीच्या सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा
किरण पवार
माजी सरपंच खु धानोरा तालुका दिग्रस


ग्रामपंचायत रामगाव पंचायत समिती दिग्रस
दिपावलीच्या सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा
सौ.वनिता अनिल राठोड सरपंच
सचिव कु. प्रियंका गणेश राव मस्के
व सदस्य सर्व गावकरी रामगाव तालुका
दिग्रस जिल्हा यवतमाळ


ग्रामपंचायत शिंगद पंचायत समिती
दिग्रस दीपावलीच्या
हार्दिक हार्दिक शुभेच्छा
विठ्ठल जाधव
सरपंच व उपसरपंच सचिव सदस्य तसेच
गावकरी


आर्णी तालुक्यातील सर्व शेतकरी,
व्यापारी, अडते व कामगार बांधवांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक : समस्त संचालक मंडळ
तथा कर्मचारी वृंद, कृ.उ.बा.स.आर्णी


सर्व नागरिकांना व कर्मचारी यांना
दिपावली च्या
हार्दिक शुभेच्छा
भारत लंबे
शासकीय ठेकेदार दिग्रस जिल्हा यवतमाळ


दिपावलीच्या सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा
बाळू राठोड
ग्रामपंचायत सदस्य भिलवाडी शिवसेना शिंदे गट दिग्रस


डेक्कन शुगर प्रा. लि. मंगरुळ व डिस्टीलरी डिव्हीजन गुंज (सवना)
सर्व ऊस उत्पादक शेतकरी बंधु-भगीनी, हितचिंतक, व्यापारी आणि
सर्व कर्मचारी वर्ग यांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..
D S P L
श्री. एस. बी. पाटील
श्री. आय. एच. थावराणी


मागील २३ वर्षापासून जनतेच्या अविरत सेवेत...
आपण ठेवलेला विश्वास...
हाच नेर अर्बनचा विकास...
नेर अर्बन
को-ऑप. क्रेडीट सोसायटी मर्या., नेर र.नं. 464
मुख्य कार्यालय : छत्रपती भवन, श्री शिवाजी हायस्कूल समोर, नेर परसोपंत जि. यवतमाळ
आपल्या शाखा
नेर 07238-267777
यवतमाळ 07232-245000
लाडखेड 09403498241
वणी 07239-226000
आर्णी 07234-266000
अकोला बा. 07232-276777
दिग्रस 07234-222888
बुटीबोरी 07103-263333
कारंजा लाड 07256-299110
अमरावती राजकमल 0721-2990000
संचालक मंडळ
आकर्षक सुविधा
कर्ज सुविधा
वैयक्तीक कर्ज
सोने तारण कर्ज
व्यापारी कर्ज
कर्मचारी कर्ज
गृह तारण कर्ज
फोर व्हिलर कर्ज
टू-व्हिलर कर्ज
F.D. वर कर्ज
माल तारण कर्ज
दिपावली
निमित्त सर्व जनतेस मनःपूर्वक शुभेच्छा


दिपावली
निमित्त सर्वांना
मंगलमय
शुभेच्छा!
डॉ.सुनील भवरे वैद्यकीय अधीक्षक ग्रा.रु.आर्णी


दिपावलीच्या सर्व
नागरिकांना
हार्दिक
शुभेच्छा
अंबादास भवाळ
सामाजिक कार्यकर्ता फेटरी तालुका दिग्रस


"फुलांसारखं हसत रहा, दिव्यांसारखं उजळत रहा,
तुमच्या आयुष्यात प्रत्येक दिवस दिपावली सारखा आनंदी राहो"
शुभ दीपावली
आपणास आणि आपल्या परिवारास
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...!
संदीप कोवे
भावी जिल्हा परिषद सदस्य पारवा सर्कल
भारतीय जनता पार्टी सदस्य


शुभ दिपावली
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
MIS
जनता


शहराचे विकास, भ्रष्टाचार मुक्त, स्वच्छ प्रशासन,
नशामुक्त, गुंडगीरी हद्दपार करायचे असल्यास,
पर्याय केवळ एक - वन मॅन आर्मी
समस्त आदरणीय नागरिक आणि भगिनींना
दिपउत्सव आणि लक्ष्मीपुजनाची
मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा !
रजनिकांत डालूरामजी बोरेले,

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
शुभ दिपावली

















































# सांस्कृतिक व अध्यात्मिक दिवाळी

दिवाळी... सर्व सणांमधला ागळ्यात महत्त्वाचा सण. याला णांचा राजा म्हटलं तरी काही ावगं ठरणार नाही. आपल्या हेंदू धर्मातील संस्कृतीमध्ये तसं र सगळ्या सणांचं स्वतःचं असं क महत्त्व आहे. प्रत्येक सणामागे ाध्यात्मिक अर्थ आहे. पण दिवाळी हा सण सर्वात मोठा ण म्हणून साजरा केला जातो.

पाच दिवसांचा हा सण एक वेगळंच चैतन्य आणि उत्साह घेऊन येतो. पणत्यांच्या रांगा, दिव्यांची रोषणाई, विविध धाटणीचे कंदील, फटाक्यांची आतिषबाजी आणि नाकात दरवळणारा फराळाचा सुगंध मनामध्ये आनंदाचे उधाण घेऊन येतो. सर्वत्र उत्साहाचे वारे वाहू लागतात. दिवाळी नुसता सण नसून तिला सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक अशा विविध पैलूंची किनार आहे. दिवाळी समाजात ऐक्याची भावना जागृत करते. ही अशी संस्कृती व परंपरा आहे जी पिढ्यानपिढ्या हिंदूंच्या मनात चैतन्य आणि प्रकाशाचा झोत निर्माण करते. भले तिचं स्वरूप पिढी दर पिढी बदललेलं का असेना. आता हेच पाहा ना... गावाकडे आजपासून तीस-चाळीस वर्षांपूर्वीची दिवाळी फार वेगळी होती. जवळ जवळ पंधरा-वीस दिवस आधीपासूनच दिवाळीच्या तयारीला सुरुवात व्हायची. दिवाळी येणार म्हणून नवीन अंगण तयार करण्यासाठी गावाबाहेरच्या टेकड्यांवरून मुरूम आणि तांबडी माती आणली जायची. अंगण कुदळीने खणून मुरूम व तांबडी माती घालून पाणी शिंपडले जायचे आणि धोपटण्याने चोपून चोपून अंगण तयार केले जायचे. तिथेच बाजूला रांगोळी काढण्यासाठी चौकोनी छोटा ओटाही बनवला जायचा.

अंगण शेणाने छान सारवले जायचे आणि ओटाही तांबड्या गेरूने सारवला जायचा. घरीच आकाशकंदील बनवला जायचा. दिवाळी येण्याच्या दोन दिवस आधीपासूनच संपूर्ण घर दिवाळीच्या स्वागतासाठी सज्ज व्हायचं. चुना थोड्या पाण्यात कालवून चुण्याच्या ठिपक्यांची रांगोळी काढली जायची. तसेच दरवर्षी नवीन रांगोळीचे पुस्तक आणून कोणत्या दिवशी कोणती रांगोळी काढायची हे आधीपासूनच घरातील आणि आजूबाजूच्या मुली ठरवून ठेवायच्या. मग प्रत्येकीकडे सगळ्या जाऊन एकमेकींना रांगोळी काढायला मदत करायच्या. घराघरांतून दिवाळी फराळाचा खमंग सुवास दरवळायचा. दिवाळीला रोज अभ्यंगस्नानासाठी उठणं म्हणजे लहानग्यांसाठी मोठं दिव्यच असायचं. कारण थंडीचे दिवस असल्याने ऑक्टोबर, नोव्हेंबर महिना म्हटलं की कडाक्याची थंडी असायची. पहाटे तुळशीपुढे आणि अंगणात पणत्या लावल्या जायच्या आणि पाट मांडून त्यावर प्रत्येकाला बसवून उटणे लावले जायचे. स्नान करून आल्यावर 'कारंट' डाव्या पायाच्या अंगठ्याने फोडण्याची प्रथा आहे. श्रीकृष्णाने नरकासूर राक्षसाचा वध याच दिवशी केल्यामुळे त्याच्या वधाचे प्रतीक म्हणून हे कारंटे गोविंदा गोपाळा म्हणत फोडले जाते. सगळ्यांचे अभ्यंगस्नान झाल्यानंतर देवपूजा करून देवाला फराळाचा नैवेद्य दाखवला जायचा आणि मग सगळेजण एकत्र बसून फराळ करायचे. आता जरी अंगणाची जागा कोबा किंवा पॅसेजने घेतली असली, ठिपक्यांचा कागद आणि ठिपक्यांची रांगोळी कालौघात मागे पडून झटपट रांगोळीसाठी छाप आले असले, अभ्यंगस्नान भल्या पहाटेऐवजी पहाटे (सहाच्या दरम्यान) बिना कारंट फोडून होत असलं, विकतचा कंदील, विकतचा फराळ जरी घरात येत असला, थंडी सुद्धा कडाक्याची पडत नसली ना तरीही दिवाळीचा तोच उत्साह, तेच चैतन्य अजूनही पूर्वीसारखंच आहे. फक्त तिचं स्वरूप बदलले आहे. काळ कितीही बदलो, पण काही लोक मात्र ही दिवाळी पारंपरिक पद्धतीने मोठ्या धूमधडाक्यात दरवर्षी साजरी करतात. आपल्या पारंपरिक संस्कृतीशी घट्ट नातं त्यांनी अजूनही जपलं आहे. दिवाळीचं जसं सांस्कृतिक महत्त्व आहे ना तसंच तिच्या अध्यात्मिक स्वरूपाचं महत्त्व देखील तितकच महत्त्वाचं आहे. दिवाळी म्हणजे अंधारावर प्रकाशाचा विजय मिळविणारे एक प्रकाशपर्व आहे. म्हणूनच आपल्या अंतर्मनातील अंधार दूर करण्यासाठी आपल्या मनात एक आत्मज्ञानाचा दिवा लावला पाहिजे. या आत्मज्ञानाच्या प्रकाशात वासना, क्रोध, लोभ, द्वेष, आसक्ती, अहंकार आणि आळस यासारख्या अंधाराला जाळून टाकून प्रेम, शांती, समाधान, नम्रता यांना अध्यात्मिक भावनांचे कोंदण लावले पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाने आपल्यामध्ये जर आत्म्याचा दिवा लावला तर आत्म्याचा प्रकाश जागृत झाल्यानंतर प्राप्त होणारा आनंद हा निश्चितच अवर्णनीय असेल यात शंका नाही.

हिंसा, वासना, गुन्हेगारी, व्यसनाधीनता, कर्तव्याचा अभाव, मलिनता, स्वार्थ, लबाडी, अप्रामाणिकता, अन्याय, अहंकार, भ्रष्टाचार इत्यादींचा अंधार सर्वत्र पसरलेला असताना दिवाळी हा पारंपरिक सण एकमेकांमधील मतभेद विसरून सर्वांना आपली हजारो वर्षांपूर्वीची संस्कृती, परंपरा अधिकाधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न करायला लावतो. दिवाळी सणाने आता धर्म मर्यादा ओलांडून त्याने राष्ट्रीय उत्सवाचे स्वरूप प्राप्त केले आहे ही खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे, तर अशा उद्यावर येऊन ठेपलेल्या दिपोत्सवाच्या सर्वांना लक्ष लक्ष शुभेच्छा. युवा पिढीचे भविष्य उज्ज्वल होवो, ज्येष्ठांना निरोगी स्वास्थ्य लाभो व सर्वांच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत याच दिवाळीनिमित्त सर्वांना अनंत शुभेच्छा! आपणा सर्वांना यंदाची दीपावली सुखा समाधानाची, आनंदाची व भरभराटीची जावो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना!

**अर्चना सरोदे**

# मनामनातलं प्रकाशपर्व...!

दिवाळीचा अर्थ सर्वांसाठी वेगवेगळा आहे. सुख-दुःखांनी व्यापलेलं मन उत्सवाच्या दिवशी आनंदाचा ण अनुभवतं. दसऱ्याचा सण वेजयपर्व, तर दिवाळीचा सण ा दिव्यांचं प्रकाशपर्व! वेजयादशमीनंतरच दिवाळी सणाचे ध लागतात आणि उत्सवी ातावरणाला उधाण येऊ लागतं. ारदाचं चांदणं मन मोहित करतं, यामुळं मनात उत्साह आणि रणेची भावना वाढीस लागते. दिवाळी हा तर भारताचा क प्रमुख सण असून, जगाच्या पाठीवर जिथं-जिथं हेंदू समुदाय, भारतीय नागरिक असतात, तिथं भारतीय रंपरा, प्रथेनुसार हा सण साजरा केला जातो.

अंधारावर प्रकाशाचा विजय म्हणून दीपोत्सव हा रवर्षी आणि प्राचीन काळापासून उत्साहानं, आनंदानं ाजरा करत आलो आहोत. पुराणातील दाखले आणि ार्मिक श्रद्धेचा आधार असलेलं पर्व साजरा करताना ाळानुसार अनेक बदल झाले; मात्र या पर्वाचा मूळ ाभा आणि उद्देश हा अंतर्गत-बाह्य जगात सर्वत्र सत्य, ांतता, प्रेम, आनंदाचा प्रसार करण्याचा असून, तो ाजही कायम आहे. असं म्हणतात, विजयादशमीच्या दवशी श्रीरामांनी रावणावर विजय मिळवला. या विजयाकडे ापण वाईटावर चांगल्याचा विजय म्हणून पाहतो. ास्तविक, रामकथा ही संपूर्ण जगात व्यापलेली आहे. ोड्याफार फरकांनी ही कथा विश्वव्यापी संस्कृतीचा ाग बनली आहे. एवढेच नाही, तर कथा, कादंबऱ्यांतही ामकथेचा व्यापक प्रभाव दिसतो. श्रीरामांनी लंकेत जाऊन ावणाचा वध केला आणि तेथून परत येत असताना ायोध्येत उत्सव साजरा होणारच. एकार्थानं संपूर्ण ंस्कृतीच राममय असेल, लोकांत, संस्कारात, गीतात, ाख्यायिकेत रामच रामच असेल तर विवाह सोहळा, त्र जन्म आदींसारख्या प्रसंगांतही रामांचा उल्लेख होतोच ाणि त्याशिवाय आपल्याकडील धार्मिक कार्यक्रम, वेधी, कौटुंबिक कार्यक्रम पूर्ण होत नाहीत.

दिवाळीचा संबंध हा प्रामुख्यानं श्रीराम अयोध्येत रतण्याशी आहे. श्रीराम, सीता आणि लक्ष्मण हे वनवास संपवून अयोध्येत आल्यानंतर अयोध्यावासीयांनी सर्व ठिकाणी मातीचे दिवे प्रज्वलित करून उत्सव साजरा केला. अयोध्यावासीयांनी या सुवर्णक्षणी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी तुपाचे दिवे लावून प्रभूंचं स्वागत केलं. म्हणूनच हा दिवस म्हणजे कार्तिक अमावास्येच्या तिथीला दिवाळीचा सण साजरा होऊ लागला. दिवाळीच्या दिवशी लक्ष्मी पृथ्वीवर विराजमान होते आणि त्यामुळं लक्ष्मीचं स्वागत करतानादेखील दिवे लावण्याची प्रथा आहे. त्यामुळं दिवाळीला आतषबाजी केवळ श्रीरामांच्या स्वागतानिमित्तच नाही, तर धन-धान्यांची देवी लक्ष्मीचं पूजन करण्याच्या निमित्तानंदेखील होऊ लागली. पुराणकथेनुसार समुद्रमंथनातून निघालेल्या चौदा रत्नांपैकी एक देवी लक्ष्मीदेखील होती.



कार्तिक अमावास्येला प्रकट होत असल्यानं तिचं स्वागत आणि पूजेची परंपरा विकसित झाली. याप्रमाणे दिवाळी शतकानुशतकं साजरी केली जाऊ लागली. पद्मपुराण आणि स्कंदपुराणातदेखील याचा उल्लेख सापडतो. पौराणिक कथेनुसार दिवाळी ही दिवा, सूर्यदेवाचं प्रतीक आहे. आणखी एका संदर्भानं प्रकाशपर्व म्हणूनही दिवाळी साजरा केली जाते; कारण दिवा लावणं हे भौतिक रूपानं परिसर उजळून टाकणं आहे. दिवा प्रज्वलित करताना त्याचा आणखी खोलवर विचार केला, तर मनातील अंधकार आणि अज्ञान दूर करण्याचाही विचार त्यामागं दडलेला आहे.

दिवाळीचे प्रकाशपर्व पाचही दिवस उत्सवाच्या रंगात न्हाऊन निघणारे असते. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज. वसुबारसनं सुरू झालेलं प्रकाशपर्व केवळ भाऊबीजपर्यंत नाही, तर देवदिवाळीपर्यंत म्हणजे तुळशीच्या लग्नापर्यंत चालतं. कार्तिक पौर्णिमेला समस्त देवगण वाराणसीच्या घाटावर एकत्र येऊन दिवाळी साजरा करतात. त्यामुळं दिवाळी सण हा एक महापर्वाच्या रूपानं साजरा केला जातो. श्रीरामांच्या अयोध्येतील आगमनाचा आनंद हा प्रत्येकाच्या मनातील उत्साह द्विगुणीत करणारा आहे आणि तो सर्वांसाठी मंगलमय पर्व ठरला. हा उत्सव एकमेकांना भेटवस्तू देण्याचंही कारण ठरला. सण कोणताही असो, या काळात फराळ, मिठाईची आणि भेटवस्तूंची देवाणघेवाण होतेच आणि याशिवाय सण साजरा होतच नाही. यात सर्वजण आनंदानं सामील होतात. बाजार दिव्यांच्या माळांनी उजळून निघालेला असतो.

दिवाळी दरवर्षी येते. दरवर्षी आपण दिवे लावून अंधकाराला पळून लावण्याचा प्रयत्न करतो; पण अंधकार दूर होताना दिसत नाही. काळजीपूर्वक पाहिलं तर विज्ञानाचा प्रकाश आपण खूप पाडला आहे; परंतु अज्ञान, अधर्म, विश्वासघात, अंधविश्वासरूपी असणारा अंधकार मिटवू शकलो नाही. हा अंधार आजही आपल्याभोवतीच घुटमळत आहे. वेद, पुराणकथा, उपनिषदं, महाभारत आणि रामायणासारख्या ग्रंथांत ज्ञानाचा सागर पाहावयास मिळतो. हे आपले धर्मग्रंथ आहेत. त्यांचा आपण अभ्यास करत आलो आहोत; पण आजही भारतातील मोठी लोकसंख्या अशिक्षित आणि सुविधांपासून वंचित आहे. चला, दिवाळीच्या या महाप्रकाशपर्वात मनातील आणि बाह्य जगातील अंधार व अज्ञान संपवून टाकण्यासाठी पुढे या आणि लक्ष्मीची पूजा करताना मनातील सरस्वतीचा सन्मान करण्यास विसरू नका; कारण हीच सरस्वती समाजात रुजलेल्या अनिष्ट प्रथा, अज्ञानावर आणि अविचारांवर प्रहार करते. मगच आपला समाज, आपली संस्कृती, सभ्यता ही खऱ्या अर्थानं प्रकाशमान होईल आणि ठिकठिकाणी द्वेषभाव, कटूतेऐवजी प्रेमाचा प्रकाश दिसून येईल.

**डॉ. ओम निश्चल**



## शुभ दीपावली

वाट बघता बघता
आली शुभ दीपावली

दिवाळीचे बघा आले शुभ पर्व
अभ्यंग स्नान करून न्हाले सर्व
मोदमय जीवन,घेऊन आली,
ही सुंदर दिवाळी,
भाऊ सुंदर दिवाळी

दिवाळी सुंदरता घेऊन आली
रांगोळीने अंगणं शोभिवंत झाली
एक दुसरीची,रांगोळी बघते,
स्पर्धा रांगोळीची,
जणू स्पर्धा रांगोळीची

श्रीमंता घरी लाडू अनारसा करंजी
गरिबाच्या घरी नाही साधी सातरंजी
अशी ही होते,घरी गरिबाच्या,
साधीच दिवाळी ,
भाऊ साधीच दिवाळी

**प्रा.अरुण बुंदेले,** अमरावती
मो.८०८७७४८६०९

## करा दिवाई साजरी

आली दिवाई हासत
इसरा आता जात पात
करा गावची सफाई
होऊन डेबुजीचे हात

तुमी सजवा बंगले
घ्यारे मोठ्या मोठ्या गाळ्या
द्यारे लुळ्या पांगळ्याले
दोन आधाराच्या काळ्या

घ्यारे बईनीच्या साटी
भरजरीचा तो शालु
दयारे अनाथ पोरीले
तीच्या आंगापुरता पालू

तुमी लावा चीरांगण
कंदील अगाशी बांदुन
आये अंधार डोंगरी
दिवे पेटवा जाऊन

ठेवा लक्ष्मीच्या पुळे
पाची पक्वांन्याच ताट
करा दिवाई साजरी
जाऊन वृद्ध आश्रमात

**प्रकाश जगन्नाथ डोबाळे**
लाजनापूर
ता.आकोट
मो.९७६३२५१८७४

# फटाक्यांमुळे होणारे प्रदूषणः आनंदीक्षणातून निसर्गविनाश

भारतीय समाज हा ाण-उत्सवप्रिय समाज म्हणून ागात ओळखला जातो. ापल्या संस्कृतीतील प्रत्येक ाण हा आनंद, ऐक्य, परंपरा ाणि श्रद्धेचे प्रतीक असतो. ाण आधुनिक काळात या ाणांच्या साजरीकरणात अनेक ाव्या प्रथा समाविष्ट झाल्या ाहेत, ज्यामुळे निसर्गाच्या ाारोग्यावर आणि मानवी ाीवनावर गंभीर परिणाम होत ाहेत. त्यातीलच एक म्हणजे फटाक्यांचा अतिरेकी वापर, ज्यामुळे निर्माण होणारे ध्वनी ाणि वायू प्रदूषण आज ाापल्या समाजासाठी चिंतेचा ावषय बनला आहे. दिवाळी, ााताळ, नवीन वर्ष, ाग्नसोहळे, क्रिकेटमधील ावजय किंवा राजकीय कार्यक्रम अशाप्रकारचा कोणताही प्रसंग असो, फटाक्यांच्या आवाजाशिवाय ाो अपूर्ण वाटतो. परंतु या ाकाही क्षणांच्या आनंदामागे ादडलेले प्रदूषणाचे सत्य ाापण वारंवार विसरतो.

फटाक्यांचे उत्पादन हे रासायनिक पदार्थांच्या जटिल मिश्रणावर आधारित असते. पोटॅशियम नायट्रेट, सल्फर, कोळशाची भुकटी, बॅरियम, मॅग्नेशियम, लीड, आर्सेनिक, ॲल्युमिनियम, स्ट्रॉन्शियम यांसारख्या अनेक धातू आणि रासायनिक घटकांचा वापर त्यात केला जातो. हे पदार्थ जळताना हवेमध्ये नायट्रोजन ऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि सूक्ष्म धूलिकण सोडतात. या प्रदूषक वायूंमुळे वातावरणातील हवा विषारी बनते. विशेषतः PM२.५ आणि इश१० या सूक्ष्मकणांचे प्रमाण फटाक्यांच्या दहनावेळी अनेक पट वाढते. (PM२.५ म्हणजे अतिशय बारीक, आणि PM१० म्हणजे थोडे मोठे कण) हे सूक्ष्मकण इतके लहान असतात की ते थेट फुफ्फुसांमध्ये जाऊन रक्तप्रवाहात मिसळतात, ज्यामुळे श्वसनाचे आजार, दमा, ब्रॉन्कायटिस, फुफ्फुसाचे संक्रमण आणि हृदयविकारांची जोखीम वाढते.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, भारतातील प्रमुख शहरांमध्ये दिवाळीनंतर हवेमधील प्रदूषणाची पातळी नेहमीपेक्षा चार ते पाच पट वाढते. दिल्ली, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये दिवाळीच्या रात्रीनंतर इश२.५ च्या प्रमाणात अत्यंत झपाट्याने वाढ होते. दिल्लीमध्ये तर AQI (Air Quality Index) 'गंभीर' या श्रेणीत म्हणजे ४००-५०० पर्यंत पोहोचतो. ही परिस्थिती श्वसनास त्रास देणारी आणि जीवघेणी ठरू शकते. हवेमध्ये सल्फर डायऑक्साइड व नायट्रोजन ऑक्साइडचे प्रमाण वाढल्यामुळे डोळ्यांत जळजळ, घसा खवखवणे, डोकेदुखी, थकवा आणि श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे सामान्यपणे दिसून येतात.



फटाक्यांच्या दहनामुळे केवळ वायू प्रदूषणच नाही, तर ध्वनी प्रदूषणही प्रचंड प्रमाणात वाढते. साधारण मानवी कानाला सुरक्षित ध्वनीमर्यादा ७५ डेसिबेल इतकी असते, परंतु फटाक्यांच्या स्फोटावेळी आवाजाची तीव्रता १२० ते १५० डेसिबेलपर्यंत पोहोचते. अशा तीव्र आवाजामुळे कानातील श्रवणशक्तीवर परिणाम होतो, झोपेच्या गुणवत्तेत घट येते, रक्तदाब वाढतो आणि मानसिक ताण निर्माण होतो. वृद्ध व्यक्ती, लहान मुले आणि रुग्ण यांच्यासाठी हा आवाज विशेषतः त्रासदायक असतो. पक्षी, प्राणी यांनाही ध्वनी प्रदूषणाचा मोठा फटका बसतो. अनेक पक्षी दिशाभूल होऊन झाडांवरून पडतात, पाळीव प्राण्यांमध्ये भीती आणि अस्वस्थता निर्माण होते, तर वन्यजीवांमध्ये प्रजननाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो.फटाक्यांचा परिणाम फक्त हवेमध्येच मर्यादित राहत नाही. त्यांचे अवशेष म्हणजे कागदाचे तुकडे, धातूंचे कण, प्लास्टिकचे कवच आणि राख जमिनीवर साचतात. हे सर्व नाल्यांत, पाण्याच्या स्त्रोतांत आणि शेतीच्या जमिनीत मिसळून जमिनीचे आणि जलस्त्रोतांचे प्रदूषण निर्माण करतात. जड धातूंचे हे अवशेष जमिनीतील पोषक घटकांची हानी करतात, त्यामुळे पीक उत्पादनावरही परिणाम होतो. नद्या आणि तलावांमध्ये मिसळलेले हे रसायन जलीय जीवसृष्टीसाठी घातक ठरते.फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर तो सामाजिक आणि आर्थिक प्रश्नही आहे. दरवर्षी फटाके फोडताना शेकडो अपघात होतात. मुलांच्या आणि तरुणांच्या हातांना, चेहऱ्यांना व डोळ्यांना गंभीर दुखापती होतात. अनेकांना आयुष्यभरासाठी अपंगत्व येते. या दुर्घटनांमुळे रुग्णालयांवरील भार वाढतो आणि कुटुंबांवर मानसिक तसेच आर्थिक ओझे येते. प्रदूषणामुळे वाढणाऱ्या आजारांमुळे आरोग्यखर्च वाढतो, कामकाजातील उत्पादकता कमी होते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो.भारतामध्ये 'वायू प्रदूषण प्रतिबंधक कायदा,१९८१', 'पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६' आणि 'ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियम, २०००' यांद्वारे फटाक्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही दिवाळीच्या काळात केवळ 'ग्रीन फटाके' वापरण्याची शिफारस केली आहे. हे ग्रीन फटाके पारंपरिक फटाक्यांपेक्षा सुमारे ३० टक्के कमी प्रदूषण निर्माण करतात. तसेच रात्री १० नंतर फटाके फोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. तथापि, या नियमांचे पालन नागरिकांनी मनापासून केले नाही, तर कायदे कागदावरच राहतील.यावर उपाय म्हणून जनजागृती आणि जबाबदार वर्तन अत्यंत आवश्यक आहे. सण साजरे करणे हे आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे, पण सण साजरा करताना निसर्गाचा अपमान न करता, पर्यावरणपूरक पद्धती अवलंबणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आपण सणाचा आनंद फटाक्यांशिवायही साजरा करू शकतो. पारंपरिक दिवे, एलईडी लाइट्स, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि पर्यावरण रक्षणाचे संकल्प यांद्वारे. शाळा-कॉलेजांतून विद्यार्थ्यांना फटाक्यांच्या दुष्परिणामांबद्दल शिक्षित केले पाहिजे. माध्यमांनीही याबाबत जबाबदार भूमिका घेत जनतेला जागरूक करणे आवश्यक आहे.खरी दिवाळी, खरा आनंद, खरा प्रकाश तोच जो निसर्ग, समाज आणि मानव यांच्या समन्वयातून जन्मतो. चला, या सणासुदीला आपण सर्वांनी मिळून ठरवूया की 'फटाके नाही, फुलझड्यांऐवजी फुलांची सजावट, धूर नाही तर स्वच्छ हवा, आवाज नाही तर आनंदाचा गजर.'कारण सणाचा खरा अर्थ आहे प्रकाशाचा उत्सव आणि तो प्रकाश पर्यावरणपूरक, स्वच्छ आणि शाश्वत असेल, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने उज्ज्वल ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**मो. ९९६०१०३५८२**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

शुभ दिपावली

# ज्ञानियांची दिवाळी




**दी**पावलीचा सण म्हणजे आनंदपर्व, या आनंद सोहळ्यात सर्व लहान थोर मंडळी हरवून गेलेली असतात. दुःखाचा कुठे लवलेश उरलेला नसतो. दीपावली म्हणजे खऱ्या अर्थाने मनाच्या अंधकाराला दूर करून ज्ञानाच्या प्रकाशात स्वतःला प्रज्वलित करण्याचा अविष्कार होय. दीपसोहळा मनाला तेजोमय करत असतो. दीपावली सणाबाबत संत ज्ञानेश्वर महाराजांनी अनेक ओव्या सांगितल्या आहेत. जीवनात प्रकाशमय दीप लाभो, ज्ञानरूपी प्रकाशाकडे घेऊन जाते ती ज्ञानेश्वरी

*'जैसी दीपकळिका धाकुटी।*
*परी बहु तेजाते प्रकटी।*
*तैसी सद्बुद्धि हे थेकुटी।*
*म्हणो नये।।'*

संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात दीपकळिका धाकुटी म्हणजे दिव्याची ज्योत होय. ती लहान असते पण प्रकाश मात्र भरभर देत असते, त्यामुळे सद्बुद्धी जरी अल्प असली, कमी असली तरी तिला लहान कमी समजता कामा नये. समाजात अनेक बुद्धिमान माणसे आहेत. तरी त्यांचे जीवन कधी कधी स्वतःच्या स्वार्थासाठी खर्च केलेले असते. अशी माणसे काय कामाची आहेत? पण काही माणसे छोटी असतात. वाट्याला आलेली सेवा छोटी असते, पण हेच परम कर्तव्य समजून पार पाडत असतात. मागील काळात कोरोना सारख्या महामारीत अनेक कोरोनायोद्धांनी आपापल्या परीने बाजी लावली हीच खरी सुबुद्धी होती. छोटी कामे असली तरी सर्वस्वपणे केलेले कार्य हे महानच असते.

*मी अविवेकाची काजळी ।*
*फेडुनी विवेकदीप उजळी ।*
*ते योगिया पाहे दिवाळी निरंतर ।।*

दिवाळीचा सण साजरा होताना समाजामध्ये अनेक उपेक्षित वंचित घटक नांदत असतात. अशा घटकाच्या अंगणात अंधारमय वातावरण असते. नोकरदारांना बोनस तर कष्टकऱ्यांना मात्र वेळेतही पगार उपलब्ध नाही. अशा द्विधास्थितीत कष्टकरी मालक व भांडवलदारांच्या कात्रीत अडकलेला आहे. अशा धनिक वर्गाच्या विवेक बुद्धीला आलेली काजळी ही नाहीशी व्हावी, हेच ज्ञानेश्वर महाराजांना अपेक्षित आहे. हीच ज्ञानेश्वरांनी सांगितलेली दीपावली होय, तीच या क्षणाची अपेक्षा आहे. संत ज्ञानेश्वर या ओवीतून सांगतात की, विवेक दिपास आलेली



अविवेकाची काजळी झाडून तो विचाररुपी दिवा प्रज्वलित करतो. चांगल्या अर्थाने योगी लोकांना निरंतर दिवाळी सणाचा आनंद द्विगुणीत होताना दिसतो. ज्ञानेश्वरीतील या ओवीत अनेक प्रकारे जीवनातील नैराश्य घालून ज्ञान ज्योत तेजावत ठेवतात.

*दीपा आणि प्रकाश ।*
*एकवंकीचा पाडू कैसा ।*
*तो माझ्या ठाई कैसा*
*मी तया माजी।।*

दिवा आणि प्रकाश यांचे नाते एकसंध असते. असेच मानवी जीवनात मनात पेटवलेली ज्ञानज्योत त्या ज्योतीच्या प्रकाशात स्वतःला तेवत ठेवणे ही गरज असते. अंधकाराचा बिमोड करत तेजस्वी जीवन जगत असतो. एकवंकीचा पाडू कैसा म्हणजे दिवा आणि प्रकाश यांचे एकत्वाचे नाते होय. तो माझ्या ठाई मी त्याच्या ठाई ऐकतेने आहोत. असेच माणसाच्या जीवनातील नाती एकतेने टिकवले जातात. दिवाळी सणात खऱ्या अर्थाने अशा प्रकारे साजरा करावयाचा असतो. अंगणी आलेला पाहुणा, अंगणी आलेला उपेक्षित माणूस त्याच्याही ओंजळीत आनंद उत्सव देताना खऱ्या अर्थाने दीपावलीचा सण साजरा होतो. दिवाळीच्या सणात लहानांपासून मोठ्यांपर्यंत या सणाची आतुरता लागलेली असते. अखंड आनंद उत्सव चालू असतो. मांगल्याचा वर्षाव होत असतो. नवनिर्मितीचा अविष्कार अंगिकारल्यावर नवे कपडे, सुवास भोजन, नातीगोती गोळा झालेली असतात. त्या आनंदाचा पारावारा कुठे गगनात मावत नसतो. यावर माऊली म्हणतात.

*अंधारी अभंगु दिवा ।*
*आवडी समर्थ बोळावा ।*
*तैसा प्रणवो जाणावा कर्मारंभी ।।*

अंधारमय जीवनात ज्ञानरूपाने न विसरणारा दिवा असावा, तसाच संकटमय जीवनात अरण्यातून जाताना बलवानाची सोबती लागते, त्याचप्रमाणे कर्म करताना अभंग असणाऱ्या ज्ञानरूपी दिव्याच्या प्रकाशाने कार्य सुखरूप पार पडत असते. अशा आनंदी सणात एकमेकांच्या जीवनातील एकमेकांचा अंधारमय प्रवास खंडित करून संकटांना समजून घेत, त्यांना सोबती केले पाहिजे.

*'सूर्ये अधिष्ठिली प्राची।*
*जगा राणीव दे प्रकाशाची।*
*तैशी वाचा श्रोतयां ज्ञानाची।*
*दिवाळी करी।।*

सूर्यदेवतेने पूर्व दिशेला अंगीकार केला म्हणजे सूर्य उगवल्यावर तो सर्व जगाला प्रकाशमय करत असतो. भेदभाव कसलाच न करता तो प्रकाश सर्वांसाठी असतो. त्या प्रकाशावर मनुष्य व बरोबर प्राणिमात्र, सजीव, निर्जीवांचा अधिकार असतो. तसाच मानवी जीवनात प्रकाशाची जाणीव झाल्यावर त्याची योग्यता व वाणी यातून प्रकट होणारी भाषा यामुळे श्रोत्यांना अर्थात जनमाणसांना ज्ञानाची दिवाळी करता येते.

ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानाची दिवाळी दिल्याने ती आपण सातशे वर्षानंतरही साजरी करतो.

ज्याप्रमाणे ओवीतून माऊली दिवा व प्रकाश यांचे मानवी जीवनातील महत्व व योगदान सांगितले आहे. तसेच त्यांनी पसायदानातून सुद्धा त्या विश्वात्माकडे विश्वाच्या कल्याणाचे मागणे मागितले आहे.

*दुरितांचे तिमिर जावो।*
*विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।*
*जो जे वांछील तो ते लाहो।*
*प्राणिजात।।*

दुरित म्हणजे पापी, समाजकंटक, दुष्ट, दुर्जन होय. तर तिमिर म्हणजे अंधार, अज्ञान, अंधश्रद्धा अशा पापरूपी अंधाराचा नाश होऊन सगळ्या जगाने सुधर्मरूप सूर्याच्या प्रकाशात पाहावे, माणूस लोभ, मद, माया, मोहो, मत्सर याने तो बांधला जातो.

याने शत्रू बलवान होतात व समाजात त्राही त्राही निर्माण करतात. जो धर्म निष्काम वृत्ती शिकवतो त्या निष्काम वृत्तीने कर्म केल्यास स्वधर्म आचरणाच्या प्रकाशात सर्वांना ज्ञानरूपी प्रकाश मिळेल. असे संत ज्ञानेश्वर त्या विश्वात्म्याकडे मागणे मागतात. पसायदानातून विश्व कल्याणाचा व्यापक संदेश दिला असून तो संदेश आचरणात आणणे म्हणजेच मनाचा दीपोत्सव साजरा करणे होय. अशी ज्ञानी माणसे दुसऱ्याच्या जीवनातील अंधार नाहीसा करण्यात आपले आयुष्य वेचतात. अशी माणसे जगाच्या कल्याणाची दिवाळी साजरी करु पाहत असतात. हीच ज्ञानियांची दिवाळी होय...

**ज्ञानेश्वर मिडगुले**
**जेष्ठ पत्रकार, पुणे**
**मो.७७७४०१८६५५**

# दिवाळी सण मोठा आनंदाला नाही तोटा



**म**राठी सणांचे एक - वैशिष्ट्य आहे. यात सर्वसामान्यांना सामावून घेण्याचा विचार आहे. आता साधा दिवाळी सण सुरु आहे. दिवाळी सण फक्त श्रीमंतांनीच साजरा करावा असे कुठेच नाही. समाजात प्रत्येक वर्गातील, उत्पन्न गटातील व्यक्ती हा सण आनंदाने साजरा करत असते. कदाचित श्रीमंतांकडे साजूक तुपातील मिठाई असेल तर चंद्रमौळी झोपडीत राहणाऱ्याच्या घरात गूळ वा साखर घालून केलेली मिठाई असेल. आनंदाची मात्रा दोन्हीकडे समान असणार. फरक फक्त दर्जाचा असतो. झोपडीवरही आकाशदिवा टांगलेला असतो. त्यात विजेचा दिवा नसेल तर पणती तेवत असते.

मला आठवते, ज्यावेळी विजेचा शिरकाव घरात झाला नव्हता तेव्हा दैनंदिन व्यवहार कंदिलाच्या उजेडातच होत असत. आकाश कंदिलात पणती वा मेणबत्ती लावलेली असायची. आज वीज आली असल्यामुळे आणि हा कालखंड अनुभवलेली पिढी आता हळूहळू इतिहासजमा होत असल्यामुळे नव्या पिढीला याची माहिती असण्याचे कारण नाही.

आज दिवाळीचे संदर्भ बदलले आहेत. आजही दिवाळी साजरी केली जाते. पण विकतचा फराळ घेण्याकडे बहुतांश गृहिणींचा कल असतो. अर्थात त्याला कारणेही तशीच असतात. आज नवरा-बायको दोघेही जॉब करत असल्यामुळे घरी पदार्थ नाहीच) असे करणे जमतेच (शक्यतो नाही. त्यामुळे ऑर्डर देऊन पदार्थ आणले जातात आणि दिवाळी साजरी केली जाते. घरात एखादा पदार्थ देवाला नैवेद्य म्हणून केला जातो. पण इतर फराळ मात्र विकतचा आणण्याकडे भर असतो. यात काही वावगे आहे, असेही नाही.

दिवाळी फराळ ही संकल्पना केवळ कुटुंबापुरता मर्यादित राहू नये यासाठी आज अनेक सेवाभावी संस्था मतिमंद, अस्थिव्यंग वा अन्य महिला बचत गटांकडून दिवाळी फराळ तयार करून घेतात व तो करून देतात. दरात उपलब्ध यामध्ये अनेक सेवाभावी संस्था आहेत. दिवाळी फराळ, दिवाळी साबण, उटणे, उंबरठा पट्टी, पणती, सुगंधी तेल असलेला बॉक्स आज अल्प किमतीत बनवून तो उपलब्ध केला जातो. यामुळे त्या संस्थेलाही मदत मिळते व समाजालाही आपण काहीतरी मदत केल्याची भावना निर्माण होते.

आज अनेक सेवाभावी संस्था दिवाळी फराळ जमा करून तो झोपडपट्टीत पोहोचवण्याचे काम करत आहेत. या संस्थादेखील मोठ्या माणसांनी (समाजात असलेल्या) चालवलेल्या असतात. सेवा हा त्यांचा मूळ उद्देश असतो. त्यासाठी ते चांगल्या दर्जाचे पदार्थ बनवून घेऊन त्याचे वाटप अशा वस्त्यांमधून करण्यात येते. आज दिवाळी घरातून बाहेर पडून खऱ्या अर्थाने समाजात आली आहे.

**विकास धुळेकर**

# संस्काराचे महत्त्व

**मु**ले सांभाळत नसल्याने पुण्यातील २२४ जेष्ठ नागरिकांनी पोटगी साठी प्रशासनाचे दार ठोकले आहे. ही समस्या फक्त पुण्याची नसून देशभरात अशा अनेक घटना रोज घडत आहेत. काही समोर येतात काही येत नाही. अपत्याच्या जन्मापासून निर्माण झालेल्या या नात्यातील भावनिक वीण दिवसेंदिवस कमकुवत होत चालली आहे याचे कारण म्हणजे मनो वेगाने स्वीकारलेल्या पाश्चात्य विकृतीचा हा परिपाक भारतीयांना एकमेकांपासून तोडत आला आहे.भारतीय संस्कृतीचा पाया म्हणजे संस्कार आणि त्या संस्काराचा केंद्रबिंदू म्हणजे ईश्वर भक्ती 'मातृदेवो भव, पितृ देवो भव' ही ओळ ईश्वर कोणात आहे हे सांगतो. ही शिकवण भारतीय समाजाच्या भावनात्मक आणि नैतिक जीवनाची दिशा ठरवणारी आहे.

१९ -२० व्या शतकात इंग्रजी शिक्षण, औद्योगिक क्रांती आणि पाश्चात्य विचारसरणी भारतात आली त्यानंतरच कर्तव्य केंद्रबिंदू असलेली भारतीय संस्कृती व्यक्तिवाद या पाश्चात्य विकृतीमुळे लयास जाऊ लागली त्यामुळेच भारतीय समाजाचे नैतिक संतुलन ढळत गेले आहे. आता पालक वृद्ध झाले की त्यांना वृद्धाश्रमात ठेवणे ही नवीन सामान्य गोष्ट झाली आहे. नागरिक आता आपल्या अधिकाराविषयी जागरूक आहे,कायद्याचाही त्यांना पाठिंबा आहे,त्यांना पोटगी मिळेल ही पण समाजातून बेपत्ता झालेली आपुलकी, घरोबा, स्नेह, बांधिलकी कोण आणि कुठे शोधणार! भारताचा आत्मा संस्कार आहे धर्म या संस्काराचे पोषण करतो. मुलांना बालपणापासून धर्मग्रंथातील ज्ञान आत्मसात करायला शिकवले गेले तर ते पालकांचा अनादर करूच शकणार नाही. आजची पिढीही धर्मशास्त्रापासून पूर्णतः दुरावली आहे. परिणामी पालकांविषयी आदर कर्तव्य न राहता पर्याय झाला आहे. स्वातंत्र्य म्हणजे पालकांपासून दूर करणे नव्हे तर त्यांच्या प्रति उत्तरदायित्व ही शिकवण केवळ हिंदू धर्मच देतो. भारतीय समाजाचे बळ असणारी कुटुंब व्यवस्था हे रक्ताच्या नात्याचा एकत्र सहवास नसून परस्पर कर्तव्याची जाण निर्माण करणारे केंद्र आहे. माझे जीवन माझे निर्णय या आधुनिक घोषणेमुळे आपलेपणाचा बंध कमकुवत झाला आहे त्यामुळे वृद्धांची काळजी घेण्याचे उत्तरदायित्व प्रशासनावर आले आहे त्यामुळे समाजाचा नैतिक पाया ढळलेला आहे. आज वृद्ध सेवा नाकारणारे उद्या वृद्ध होणार आहे याचे भान ठेवून आजच्या पालकांनी मुलांना चांगले शाळेत पाठवण्यापूर्वी संस्कार करण्यावर भर दिला पाहिजे. जेव्हा धर्म मनात उतरतो तेव्हा कर्तव्यभाव स्वाभाविक बनतो. वृद्धांची सेवा हे कायदेशीर बंधन न राहता तो व्यक्तिमत्व आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी पोषक आहे. हे समाजात रुजवण्यासाठी धर्माधिष्ठित मूल्यशिक्षणाचे पुनरुज्जीवन म्हणजे धर्मशिक्षण देण्याची सोय करणे, हाच उपाय आहे.

**लीना गाडगीळ**





### 'दिपमालिका दारोदारी'

दिवाळीच्या दिवसात
दिवे लावू अंगणात।
प-रसात झाडांवर
विद्युत काजवा बागेत।।

माळ फुलांची सजवू ।
लक्ष्मी श्रीहरी बसवू ।।
लिन होऊ भक्ती भावे ।
लक्ष्मीकलशा सजवू ।।
काजव्यांची झगमग ।
जिकडे तिकडे लगबग ।।
दा-री रांगोळी काढुया ।
अंगण रंगवुनिया ।।
रो-षणाई लाल निळी ।
हिरवे फुले पिवळी।।
दा-री उधळू उल्हासे ।
प्रेमानंदे हर्षोल्हासे ।।
गीत चालवू फुलवू ।
फटाके छान उडवू ।।

**डॉ. मिलिंद इंदूरकर**
**मो. ९५५२६०७६४६**

# नल कुबेर व मणिग्रीव उद्धार

**द्वा**पार युगातील गोष्ट आहे. कुबेराला नल कुबेर व मणिग्रीव नावाची दोन मुले होती. पित्याच्या अमाप संपत्ती मुळे ती अतिशय गर्विष्ठ झाली होती. एके दिवशी ते मंदाकिनी नदीच्या तीरावर वारुणी मदिरा प्राशन करून नशेने धुंद झाले होते. सोबत अप्सरा ही गाणे बजावणे करीत होत्या. त्याच वेळी देवर्षी नारद तेथून जात होते. नारदांना पाहून अप्सरांनी आपल्या शरीराभोवती वस्त्रे गुंडाळली व नम्रपणे उभ्या राहिल्या. नलकुबेर व मणिग्रीव मात्र नशेमध्ये मदोन्मत्त झाल्याने नल कुबेर व मणिग्रीव यांना त्याचे भान नव्हते. त्यामुळे त्यांनी नारदाकडे दुर्लक्ष करून उपहास केला.

देवर्षी नारद यांना त्यांच्या या कृतीचा राग आला व त्यांनी दोघांनाही भूतलावर गोकुळात नंदाचे घरासमोर वृक्ष होऊन पडण्याचा शाप दिला. त्याप्रमाणे ते दोघेही नंदाच्या घरासमोर अर्जुन वृक्ष होऊन यमलार्जुन नावाने ओळखले जाऊ लागले. मुलांची ही अवस्था पाहून कुबेराला अत्यंत वाईट वाटले. त्याने मुलांच्या वर्तणुकीबाबत नारदांची क्षमा याचना केली. तेव्हा नारदाने द्वापार युगातच जेव्हा कृष्णावतार होईल त्यावेळेस भगवान कृष्णांच्या स्पर्शाने त्यांचा उद्धार होईल असा उःशाप दिला.

कालांतराने मथुरेचा राजा कंस याच्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या जनतेला तसेच कंसाने कैदेत टाकलेल्या आपल्याच बहिण देवकी व जावई वासुदेव यांना त्रासातून मुक्त करण्यासाठी कारागृहातच प्रत्यक्ष भगवंताने देवकीच्या पोटी जन्म घेतला. वासुदेवांनी मध्यरात्रीच भर पावसात बालकृष्णाला गोकुळात नंदाकडे नेऊन ठेवले. यशोदेने कृष्णाचे संगोपन वात्सल्याने केले. कृष्णाने बालपणापासूनच आपल्या लीलाद्वारे गोकुळ वासियांना लळा लावला व त्यांची मने आकर्षित केली. लोणी चोरणे, छकडा मोडणे तृणावर्ताचा वध, पूतना वध, यशोदेला मुखातून ब्रह्मांड दर्शन करविणे असा नंद यशोदेला तसेच गोकुळातील



गोपगोपिकांना विस्मयकारक वाटतील अशा अनेक लिला केल्या.

एक दिवस कृष्णाने मटके फोडून लोणी खाल्ल्याने यशोदेला राग आला, व तिने बालकृष्णाला दोरीने बांधून दोरी उखळाला बांधून ठेवली. तेव्हा कृष्ण रांगू लागले व रांगत रांगत अंगणात आले. तसेच नारदाचे म्हणणे सत्य करण्यासाठी ते तसेच रांगत जाऊन त्या दोन वृक्षांच्या मधून जाऊ लागले. कृष्ण दोन झाडांमधून निघाले परंतु उखळ त्या दोन झाडांमध्ये अडकले. थोडे ओढताच व प्रत्यक्ष भगवंताचा धक्का लागताच दोन्ही झाडे मोठा कडकडाट करीत जमिनीवर कोसळली. त्यातून दोन सुंदर पुरुष म्हणजे नल कुबेर व मणीग्रीव बाहेर पडून कृष्णासमोर हात जोडून उभे राहिले व भगवंताची स्तुती करू लागले. नारदाच्या अनुग्रहामुळे आपले दर्शन झाले आता आम्हाला जाण्याची अनुमती द्यावी असे म्हणून परवानगी मागू लागले.

तेव्हा भगवंताने ' तुम्ही मदाने आंधळे झाले होते, व देवर्षी नारदांनी तुम्हाला शाप देऊन तुमचा गर्व जाण्यास मदत केली. ही तुमच्यावर कृपाच होती. आता तुम्ही माझे चिंतन करीत आपापल्या निवासस्थानी जा. संसार चक्रातून सोडविणाऱ्या अनन्य भक्तीची प्राप्ती तुम्हाला झालेली आहे असे सांगून त्यांना परवानगी दिली. यावर दोघांनीही उखळाला बांधलेल्या देवाला प्रदक्षिणा घालून व त्याची आज्ञा घेऊन ते उत्तर दिशेला निघून गेले. अशा प्रकारे भगवान श्रीकृष्णाने नल कुबेर व मणिग्रीव यांचा उद्धार केला.

**भालचंद्र ठोंबरे**
**मो.९८३४३५०८९५**

# भाऊबीज : काळानुसार दिलेली ओवाळणी

**का**र्तिक शुक्ल द्वितीयेला भाऊबीज साजरी केली जाते.या दिवशी मृत्यूची देवता यम आपल्या बहीण यमुना हिच्या घरी जेवायला गेला; म्हणून या दिवसाला 'यमद्वितीया' असेही म्हटले जाते. या दिवशी बहीण भावाला ओवाळते आणि त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते.भाऊ, बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देतो, तसेच ओवाळणी म्हणून भेटवस्तू, कपडे, अलंकार देतो.

सहजच मनात विचार येतो की, अशा भेटवस्तूंसोबतच जर भावाने बहिणीला आजच्या काळानुसार आवश्यक असणारी ओवाळणी दिली, तर नक्कीच तिला त्याचा खरा लाभ होईल. कारण आजची स्थिती पाहता कोणतीही स्त्री सुरक्षित नाही. दररोज कुठे ना कुठे स्त्रियांवर बलात्कार, अत्याचार, एकतर्फी प्रेमातून होणारी हत्या अशा घटना घडतच आहेत. अशा परिस्थितीत भावाचे कर्तव्य आहे की त्याने बहिणीचे रक्षण करावे. तसेच स्वतःचे रक्षण करण्यासाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे, याचे महत्त्व बहिणीला पटवून द्यावे.

आज हिंदू तरुणींवरील अजून एक संकट म्हणजे लव्ह जिहाद! लव्ह जिहादच्या जाळ्यात न



अडकण्यासाठी धर्मशिक्षण देणे ही काळाची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर लव्ह जिहादविरुद्ध कायदा बनवावा याकरिता महाराष्ट्रात नवरात्रोत्सवाच्या काळात हिंदू जनजागृती समितीने स्वाक्षरी अभियान चालवले. हा अतिशय स्तुत्य उपक्रम होता, ज्याद्वारे व्यापक प्रमाणात समाजात जागृती निर्माण झाली.भाऊबीजेच्या निमित्ताने बहिणीला स्वसंरक्षणार्थ सिद्ध होण्यासाठी प्रोत्साहित व प्रशिक्षित करणे, हीच खऱ्या अर्थाने काळानुसार दिलेली ओवाळणी ठरेल.

**वैशाली परांजपे**
**नागपूर**












































जाहिरात संकलन – विवेक वानखडे यवतमाळ, लक्ष्मण कांबळे पुसद, किरण नरवडे महागाव, ताहीर मिर्झा उमरखेड, अरविंद जाधव घाटंजी, अशोक जाधव दिग्रस, दिगांबर चांदेकर वणी, तन्वीर शेख पांढरकवडा, अरविंद तेलंग राळेगाव, बंडू फूलकोडवार ढाणकी, गौरव तातेड बाबुळगाव.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

शुभ दिपावली


























































जाहिरात संकलन - तनवीर शेख जनमाध्यम तालुका प्रतिनिधी पांढरकवडा मो. न.९८२३३१३४२०/७७७५९६०४४४


जनसेवा ते आरोग्यसेवा
वर्धा जिल्हा नेहमी अग्रगण्य
धन्यवाद पंकजभाऊ
आरोग्य तपासणी व मोतीबिंदू विरहित वर्धा जिल्हा
33000 रुग्ण तपासणी | 14000 चष्मा वाटप
4500 मोतीबिंदू शस्त्रक्रिया
सेवा पंधरवडा 78000 + लाभार्थी
शुभेच्छुक:
भारतीय जनता पार्टी, वर्धा जिल्हा


वर्धा तह. गो-दुग्ध उत्पा. सह. संघ मर्यादित,
गो - संवर्धन गोरस भंडार, मगनवाडी, वर्धा.
समस्त जनतेला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
मा. सहा. निबंधक सह.संस्था (दुग्ध), वर्धा.


स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटना
आपणास व आपल्या कुटुंबास
दिपावली मंगलमय
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक: उमेश अग्निहोत्री


वर्धा अर्बन
ॲण्ड रूरल को-ऑप. क्रेडीट सोसायटी मर्या., वर्धा
वर्धा अर्बन परिवाराकडुन
सर्व खातेदार बंधु-भगिनींना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा !
चिंतामण डफरे
मुख्यकार्यकारी अधिकारी
सोने खरेदी झाले सोपे
वर्धा अर्बन महालक्ष्मी सुवर्ण कर्ज योजना
सोन्याला द्युमती आर्थिक ताकद बनवा


हर घर... लक्ष्मी
फ्री गोल्ड कॉइन!
100%
MID ढोमणे


शुभ दिपावली
सर्व वर्धा वासियांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
ढोबळे फटाका सेंटर
ठोक व चिल्लर विक्रेते


नगरपरिषद वर्धा जि. वर्धा
जाहीर आवाहन
सर्व नागरिकांना याद्वारे विनंती करण्यात येते की, दिवाळी उत्सव स्वच्छ दिवाळी म्हणुन साजरा करण्याकरिता पुढील प्रमाणे सहकार्य करावे !
1) शक्यतोवर हवा प्रदुषण व ध्वनी प्रदुषण टाळण्यासाठी फटाके विरहीत दिवाळीचा सण साजरा करण्याचा प्रयत्न करावा.
2) घरातुन निघणारा कचरा वर्गीकृत करुन आपल्याघरी येणाऱ्या संकलण वाहणात टाकावा.
3) आपल्या घरातील टाकाऊ वस्तु नगर परिषदेच्या RRR (Reuse, Reduce, Recycle) केंद्राकडे सोपविण्यात यावा.
4) फटाका व्यावसाईकांनी रितसर परवानगी घेऊन आपला व्यवसाय थाटावा तसेच आगीच्या घटना घडु नये यास्तव नगरपरिषदेद्वारे सुचविलेल्या उपाययोजनांचे तंतोतंत पालन करावे.
5) ही दिवाळी प्लॅस्टीक मुक्त राहील या करिता सर्व नागरिकांनी सहकार्य करावे.
6) नगर परिषदेचा कर व पाणीपट्टीचा भरणा तात्काळ नगरपरिषदेकडे करुन सहकार्य करावे.
मुख्याधिकारी
नगरपरिषद, वर्धा


Happy Diwali
YARNS
FABRIC
FINISH FABRICS
GARMENTS


अधिकोषाच्या सर्व सभासद, खातेदार व हितचिंतकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
वर्धा नागरी सहकारी अधिकोष (बँक) मर्यादित, वर्धा
वर्धा जिल्हयातील सहकारी क्षेत्रातील अग्रणी बँक
'आदित्य' सौरऊर्जा कर्ज योजना व सोनेतारण कर्ज योजना, व्याजदर फक्त ९%
सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा उपलब्ध
अध्यक्ष
उपाध्यक्ष
मान्यवर संचालक वृंद


शुभ दिपावली
सर्व वर्धा वासियांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
जिल्हाध्यक्ष
संजय गजानन गाते
भाजपा - वर्धा जिल्हा


शुभ दीपावली
कॅप्टन मोहन गुजरकर
अध्यक्ष, प्रहार समाज जागृती संस्था, वर्धा
एनसीसी अधिकारी जिल्हा आयुक्त (रोव्हर स्काऊट), वर्धा
राज्य समन्वयक (रोव्हर) महाराष्ट्र भारत स्काऊट गाईड
कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना


सर्व नागरिकांना
दिपोत्सवाच्या
हार्दिक शुभेच्छा
e^ANHS
मा. श्री. समीरभाऊ
कुणावार
आमदार
हिंगणघाट-समुद्रपूर-सिंदी (रे.) विधानसभा मतदार क्षेत्र


मे. श्रीकृष्ण जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी
A-5, M.I.D.C.
प्रो. महेशबाबू अग्रवाल,
मे.मोहन ट्रेडिंग कंपनी
जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी
प्रो. नरेशबाबू अग्रवाल मो 9422671111
मे. गोयल कार्पोरेशन, देवळी
प्रो. दिनेश अग्रवाल
मोहनबाबू अग्रवाल
श्यामसुंदर मन्नालाल अग्रवाल
धर्मशाला देवली
सभी सुविधाओके साथ किफायती दर मे उपलब्ध
संपर्क 7218198225


ग्रामपंचायत पिपरी(मेघे) तर्फे
समस्त नागरीकांना हार्दिक शुभेच्छा
दिपावली
- शुभेच्छुक -
वैशाली अजय गौळकर
अजय गौळकर